◆ एप्रिल २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक चौथा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार कार्यक्रम** | ३० |
| **सुधा मूर्ती - मुलाखत** | ३३ |
| **श्री. ना. पेंडसे यांना श्रद्धांजली** | ४० |
| **पुस्तक परिचय** | |
| **ए कॉल टू ऑनर** : अनु.अशोक पाध्ये | ४४ |
| **चिकनसूप फॉर द सोल :** अनु.उषा महाजन | ५३ |
| **गोल्डफिंगर :** अनु. माधव कर्वे | ६२ |
| **हद्दपार** : ह.मो.मराठे | ६९ |
| **ब्लॅक अँड व्हाईट** : संजय चुरमुरे | ७७ |
| **गर्विष्ठ सूर्यफूल /बदकाचे बुट :** मिनाक्षी सरदेसाई | ८५ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ८९ |
| **पुरस्कार** | ९५ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०० |
| **श्रद्धांजली** | १०२ |
| **बालनगरी** | १०४ |

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षाची ३५०रु. पाच वर्षाची ५००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# तसलिमा नासरिन यांना भारतीय नागरिकत्व द्या

तसलिमा नासरिन यांच्यावरील संभाव्य हल्ल्याची टांगती तलवार अजूनही दूर झालेली नाही. त्यामुळे त्यांना भारतीय नागरिकत्व मिळण्याच्या मार्गातही अडचण येत आहे.

'लज्जा' या पहिल्याच कादंबरीमुळे बांगलादेशी लेखिका तसलिमा नासरिन यांना कट्टर मुस्लिमांचा रोष पत्करावा लागला; आणि त्यांना ठार मारणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला दहा लाख रुपये बहाल करण्यात येतील असा फतवा काढला गेला.बांगलादेशमधून तसलिमा नासरिन यांना बहिष्कृत केले गेले; भारताने आपल्याला आश्रय द्यावा अशी विनंती त्यांनी केली. परंतु मुस्लीम राष्ट्रांची त्यामुळे भारतविरोधी प्रतिक्रिया प्रकट होईल या शंकेमुळे भारताने तसलिमा नासरिन यांना आश्रय देण्याबाबत असमर्थता दर्शविली. त्यामुळे त्यांनी युरोपमध्ये काही काळ घालवला. फ्रान्समध्ये स्थिर व्हावे असा प्रयत्न त्यांना केला. तेथील एका व्यक्तीबरोबरही काही काळ त्यांनी घालवला. ('फरासि प्रेमिक' या त्यांच्या कादंबरीतील काही तपशील आत्मचरित्रात्मक आहे असे मानायला हरकत नाही.) युरोपियन भटकंतीच्या काळातही आपले लेखन त्यांनी चालू ठेवले; मूळ बंगाली भाषेतच लिहिण्याचा सराव असल्याने इंग्रजी वा अन्य भाषांत लेखन करण्याचा मोह त्यांनी टाळला. परदेशातील खर्चिक वास्तव्य केवळ लेखनाच्या मानधनाच्या बळावर सुसह्य करणे अवघड जाते; तसेच आपल्या मूळ भाषेपासून, मूळ संस्कृतीपासून दूर राहून लेखन करीत राहणे हेही कठीण ठरते. त्यामुळे अधूनमधून त्या भारतात येत राहिल्या. त्यांना घरच्यासारखे वाटणे हे स्वाभाविकच होते... पण भारत सरकार भारतीय नागरिकत्व त्यांना द्यायला तयार नाही. त्यामुळे भारतात त्यांना मोकळेपणाने हवे तेथे फिरता येत नाही. कलकत्त्यातही त्यांना सुरक्षाव्यवस्थेतच वावरावे लागते. कारण त्यांच्याबाबत दहा-पंधरा वर्षांपूर्वी काढला गेलेला मृत्युदंडाचा फतवा कधी कोणा कट्टर मूलतत्त्ववादी-दहशतवादी अतिरेक्याच्या हिंसाचाराला भाग पाडेल– याचा अंदाजच लागू शकत नाही. मध्यंतरी हा फतवा काहीसा विस्मरणात गेल्यासारखे वाटत होते; परंतु प्रसारमाध्यमांतून तसलिमांना भारतीय नागरिकत्व द्यावे अशा प्रकारचे मतप्रदर्शन होऊ लागले आणि हे फतवावाले कट्टरपंथीय मुस्लीम पुन्हा सक्रिय झाले असे दिसते.



शनिवार दि. १७ मार्च रोजी लखनौच्या ऑल इंडिया इत्तेहद कौन्सिलचा अध्यक्ष तकी रझा खान याने तसलिमा नासरिन यांची कत्तल (हत्या) करणाऱ्या व्यक्तीला पाच लाख रुपयांचे इनाम देण्याचा फतवा काढला. आपल्या या फतव्याला ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्ड (जदिद) चा पूर्ण पाठिंबा आहे असेही तकी रझा खान याने म्हटले आहे. ''ये औरत बेहद बदजुबान है और शरियतपर हमला करती रही है'' असा त्याने आरोप केला आहे. मुस्लीम शरीयतवर टीका करणाऱ्या आणि तिखट वाणीच्या तसलिमा नासरिनला भारतीय नागरिकत्व देण्याचा विचार हा अल्लाला घाबरणाऱ्या सर्व मुसलमानांना अस्वीकारार्ह आहे; उद्विग्न करणारा आहे; या बाईला दहा दिवसांच्या आत भारतातून हाकलून दिले नाही. तर आम्ही येथे नरकसदृश परिस्थिती निर्माण करू अशी धमकीही देण्यात आली आहे. त्याचबरोबर बरेलीच्या सुमारे दीडशे मुसलमान उलेमा, वकील, डॉक्टर्स, प्राध्यापक, अधिकारी यांच्या एका संघटनेने शुक्रवार दि. १६ मार्च २००७ रोजी तसलिमा नासरिन यांना भारतीय नागरिकत्व देण्याच्या कल्पनेला भारत सरकारने अजिबात थारा देऊ नये; तिला भारतातून हद्दपार करावे असा ठराव मंजूर करून, तो प्रसिद्धीमाध्यमांकडे पाठवला होता. उत्तरप्रदेशात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत, त्यामुळे तेथील मुस्लीम मतदारांच्या एकगठ्ठा मतदानावर डोळा असलेल्या राजकीय पक्षांना अशा ठरावाला कचऱ्याची टोपली दाखवणे शक्य होणार नाही अशीही काळजी या फतव्याची वेळ साधताना मुस्लीम संघटनांनी घेतली आहे असे म्हणावे लागेल.

तकी रझा खान याने या मृत्युदंडाच्या घोषणेबरोबर तसलिमा नासरिनला माफी मागण्याची संधीही 'उदारमताने' देऊ केली आहे. ''तसलिमाने सर्व मुस्लिमांची क्षमा मागावी, आपली सर्व पुस्तके जाळून टाकावी आणि तोंड काळे करावे'' असे त्याचे आवाहन आहे. ई-मेल व फोन याद्वारे अनेक लोकांनी मला पाठिंबा दर्शविला आहे असेही तकीने म्हटले आहे.

अर्थात हे आवाहन किंवा मृत्युदंडाचे हे फर्मान सर्वच मुसलमानांना मान्य आहे असे समजून चालण्याचे कारण नाही. ऑल इंडिया शिया पर्सनल लॉ बोर्डाचे सरचिटणीस यासूब अब्बास यांनी तकी रझा खानच्या या फर्मानाला विरोध करताना म्हटले आहे, ''आपण एकविसाव्या शतकातील भारतात राहत आहोत; एखाद्या छोट्या मध्ययुगीन संस्थानात नाही. आपल्याला पाखंडी वाटणारी काही मते मांडली म्हणून या बाईला फारतर बहिष्कृत करा आणि भारतातून तिची हकालपट्टी करा. पण तिचा शिरच्छेद करा अशी मागणी करणे हे अवास्तव आणि क्रौर्यपूर्ण आहे. आपण सहिष्णू आहोत; तसलिमाकडे मोठ्या मनाने डोळेझाक करायला हवी.'' ज्या लखनौतून तकी रझा खानने तसलिमाचे डोके उडवणाऱ्या पाच लाख बक्षीस देण्याची घोषणा केली, त्याच लखनौतून शिया पर्सनल

बोर्डाच्या सरचिटणीसाने असे करणे असहिष्णुपणाचे ठरेल असे मत व्यक्त केले जावे– याचा अर्थ काही प्रमाणात तरी मुस्लीम समाजात मूलतत्त्ववाद्यांचा एकछत्री अंमल आता नसावा हे सूचित करते. मुस्लीम समाजात सुधारणेचे विचार अजून फारसे मूळ धरताना दिसत नाहीत; फतव्यांचे दिवसही अजून सरलेले दिसत नाहीत. पण त्याविरोधी क्षीण प्रमाणात काही आवाज उमटतो आहे ही स्वागतार्ह बाब आहे.

मुस्लीम महिलांचे याबाबत काय मत आहे हे लखनौच्या शाइस्ता अंबर यांच्या वक्तव्यावरून ध्यानात येईल. त्या ऑल इंडिया मुस्लीम वुमेन पर्सनल लॉ बोर्डाच्या अध्यक्ष आहेत. त्या म्हणतात, ‘‘तसलिमा नासरिन या आपल्या शरियतच्या संबंधातील पाखंडी मतांबद्दल आणि प्रेषिताच्या विरोधाबद्दल बदनाम आहेत, हे आपण गेली काही वर्षे बघत आलो आहोत. पण असे प्रतिपादन करणारी ती काही एकटीच स्त्री नाही. तेव्हा तिच्या पुस्तकांवर बहिष्कार टाका, तिला ठार मारून तिला हुतात्मा बनवू नका. तिच्याकडे दुर्लक्ष करा.’’

तसलिमाच्या आधीही सलमान रश्दी यांच्या ‘दि सॅटॅनिक व्हर्सेस’ या कादंबरीत पैगंबराची बदनामी केल्याच्या आरोपावरून इराणच्या अयातुल्ला खोमेनी याने मृत्युदंडाचा फतवा काढला होता. त्यामुळे गेली अठरा वर्षे सलमान रश्दी मृत्युदंडाच्या सावटातच देशोदेशी काहीशा गुप्ततेने राहत आहेत.

गेल्या वर्षी एका डॅनिश वृत्तपत्राने पैगंबरांची काही व्यंगचित्रे काढून ती प्रसिद्ध केली, तेव्हा त्याविरुद्ध अनेक देशांत निदर्शने करण्यात आली; भारतातही या घटनेचे लहानमोठ्या गावी हिंसक पडसाद उमटले. उत्तर प्रदेशातील एक मंत्री याकूब कुरेशी यांनी त्या डॅनिश व्यंगचित्रकाराला ठार मारणाऱ्या व्यक्तीला दहा लाखांचे इनाम देण्याची घोषणा केली. मंत्रीपदी असणाऱ्या व्यक्तीने एखाद्या माणसाला मारण्याची अशी सुपारी देणे ही कृती कायद्याच्या दृष्टीनेही अश्लाघ्य आहे; या अपराधाबद्दल खरे तर या मंत्र्याची उचलबांगडी व्हायला हवी होती आणि त्याला न्यायालयात उभे करायला हवे होते. परंतु भारत सरकार तसे काही करू शकत नाही हे आपल्याला ठाऊक आहे. त्यामुळे अशा धमक्या देणाऱ्या मूलतत्त्ववादी प्रवृत्तींवर कुठलाच अंकुश राहत नाही. केवळ मुस्लीम मूलतत्त्ववादीच कायदा व घटना धाब्यावर बसवतात असे नाही, इतर धर्मपंथांचे व संघटनांचे लोकही अशाच कृती करीत असतात आणि त्यापुढे सरकार नरमाईने वागते. त्यामुळे अतिरेकी विचारांचा आणि बेजबाबदार हिंसक घटनांचा दबाव वाढत जातो. मृत्युदंडाचे फतवे वगैरे काढणाऱ्या व्यक्तींना भारतीय हिंसाचाराला प्रोत्साहन दिल्याबद्दल आणि जातीजमातीत संघर्ष निर्माण करण्याबद्दल दंडसंहितेप्रमाणे जरब बसवायला हवी.

तसलिमा नासरिन यांना भारतीय नागरिकत्व द्यायला हवे, त्यांच्या लेखनाला



पोषक वातावरण हवे असे आम्हाला वाटते. काही संस्था वा व्यक्ती त्यांच्या विरोधात आवाज उठवतात म्हणून त्यांच्या नागरिकत्वाच्या इच्छेला डावलता कामा नये. बंगाली भाषेतील एक आंतरराष्ट्रीय ख्यातीची प्रतिभावान लेखिका म्हणून तसलिमा नासरिन यांचे स्थान अजोड आहे. बांगलादेशातील अराजकसदृश निर्नायकी स्थितीला वेसण घालण्यासाठी नोबेल पुरस्कार विजेते मोहमद युनुस (मॅक्रो-क्रेडिट बचतगटाचे प्रवर्तक) यांच्याप्रमाणे तसलिमा नासरिन यांचे नेतृत्वही नवी दिशा देणारे ठरू शकेल.



## तसलिमा नासरिन यांची मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **लज्जा** (कादंबरी)<br>(राज्य पुरस्कार १९९३-९४) | अनु. लीना सोहोनी | १२५ |
| **फेरा** (कादंबरी) | अनु. मृणालिनी गडकरी | ७० |
| **फरासि प्रेमिक** (कादंबरी) | अनु. सुप्रिया वकील | २०० |
| **निर्बाचित कलाम** (लेख)<br>(मातृपितृ पुरस्कार) | अनु. मृणालिनी गडकरी | १५० |
| **नष्ट मेयेर नष्ट गद्य** (लेख) | अनु. मृणालिनी गडकरी | १२० |
| **निर्बाचित कबिता** (कविता) | अनु. मृणालिनी गडकरी | ७० |
| **आमार मेयेबेला** (आत्मचरित्र)<br>(जी.ए.कुलकर्णी पारितोषिक २०००) | अनु. मृणालिनी गडकरी | २०० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

# साहित्यवार्ता

## * बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन जूनमध्ये

अमेरिकेच्या विविध भागांत स्थायिक झालेल्या मराठीजनांना एकत्र आणणारा सोहळा म्हणजे 'बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळा'चे अधिवेशन! गेली चौदा वर्षे ही परंपरा सुरू आहे. त्यानिमित्त अमेरिकेत विखुरलेली मराठी माणसे एकत्र येतात, सांस्कृतिक कार्यक्रमात समरसून भाग घेतात, विचारांचे आदान-प्रदान होते. मुख्य म्हणजे भारतातून आलेले कलाकार आणि सहृदय यांच्या भेटीगाठी होतात. अमेरिकेच्या सिॲटल शहरात २८ जून ते १ जुलै या कालावधीत हे अधिवेशन होणार असून सिॲटल, सॅन होजे आणि शिकागोतील महाराष्ट्र मंडळ यांनी संयुक्तपणे कार्यक्रमाची रूपरेषा ठरवली आहे. डॉ. जब्बार पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशन भरेल.

अमेरिका आणि कॅनडातील ४५ मंडळांच्या पाच विभागांतून एकांकिका स्पर्धा होतील. यापैकी दोन उत्कृष्ट एकांकिका अधिवेशनात सादर होतील.

प्रख्यात अर्थतज्ज्ञ व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, अशोक सराफ, निवेदिता सराफ, नाना पाटेकर, संजय मोने, अश्विनी भिडे, झेलम परांजपे, उस्ताद झाकीर हुसेन, सचिन व सुप्रिया पिळगावकर अधिवेशनास उपस्थित राहतील. 'ऐलतीर-पैलतीर' या कार्यक्रमात मुंबईकर कलाकार सहभागी होतील, पण वाद्यवृंद मात्र अमेरिकेतील असेल. अश्विनी भिडे, झेलम परांजपे आणि विजया राजाध्यक्ष यांचा 'स्त्री रंग' हा कार्यक्रम होईल. अभिनेते सचिन आणि सुप्रिया पिळगावकर ही जोडी मराठी ऑर्केस्ट्रा सादर करेल. संजय मोने यांनी लिहिलेले आणि अशोक व निवेदिता सराफ यांचा सहभाग असलेले विनोदी नाटकही आकर्षक ठरेल.

या कार्यक्रमांव्यतिरिक्त अर्थ आणि आरोग्य या विषयांवर चर्चासत्रही असेल. अधिवेशनात सहभागी होण्यासाठी www.bemm2007seattle.org या वेबसाईटवर ऑनलाइन नोंदणी करता येईल.

## * भारतात २ कोटी १० लाख नेटिझन्स

इंटरनेट वापरणाऱ्यांची (नेटिझन्स) संख्या भारतात झपाट्याने वाढत असून, गेल्या वर्षी वाढीचे प्रमाण जगभरात सर्वाधिक, म्हणजे ३३ टक्के होते. जगभरातील



या वाढीचे प्रमाण दहा टक्के होते. भारताचा या क्षेत्रातील वाढीचा वेग अमेरिका, चीन, जपान यांना मागे टाकणारा ठरला.

'कॉमस्कोअर नेटवर्क्स' या संस्थेने या संदर्भात गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारीत संपलेल्या वर्षात भारतात पंधरा वर्षांवरील 'नेटिझन्स'ची संख्या २कोटी १० लाख होती. त्याआधीच्या वर्षात ही संख्या १ कोटी ६० लाखाच्या घरात होती. वर्षात ती ५० लाखांनी वाढली. तरुणांचे सर्वाधिक प्रमाण हे भारतातील 'नेटिझन्स'चे वैशिष्ट्य; मात्र 'जगभरातील सर्वाधिक नेटिझन्स असणारा देश' हे बिरुद अमेरिकेने टिकविले असून, तेथील 'नेटिझन्स'ची संख्या १५ कोटी ३० लाखांच्या घरात आहे. गेल्या वर्षभरातील वाढीचे प्रमाण दोन टक्के आहे. चीनचा क्रमांक दुसरा असून, तेथे 'नेटिझन्स'ची संख्या ८ कोटी ६८ लाख आहे. जपान तिसऱ्या क्रमांकावर (५ कोटी ३६ लाख) आहे आणि जर्मनी (३ कोटी २० लाख) आणि ब्रिटन (३ कोटी) हे देश 'नेटिझन्स' संख्येत पहिल्या पाच क्रमांकात आहेत. भारताचा क्रमांक आठवा आहे. 'नेटिझन्स'च्या संख्येबाबत भारताने कॅनडा, इटली, ब्राझील, रशिया आणि मेक्सिको या देशांवर आघाडी घेतली आहे. जगभरातील 'नेटिझन्स'ची संख्या ७४ कोटी ४७ लाखांच्या घरात आहे.

## * डॉ. श्रीरंग संगोराम स्मृती समिती

हिंदीचे गाढे अभ्यासक आणि दिवंगत संगीत समीक्षक डॉ. श्रीरंग संगोराम यांची स्मृती जपण्याच्या हेतूने स्मृती-व्याख्यानमाला सुरू करण्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.

डॉ. संगोराम यांच्या निधनाला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्याकरिता कायमस्वरूपी व्यासपीठ स्थापन करण्याच्या कल्पनेला 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिती'च्या भवनात झालेल्या बैठकीत तिला अंतिम स्वरूप देण्यात आले. समितीच्या अध्यक्षपदी संत नामदेव अध्यासनाचे डॉ. अशोक कामत आहेत. श्री. मुकुंद आणि मिलिंद संगोराम हे समितीचे सदस्य राहतील.

## * अमेरिका अस्वस्थ; पण ज्ञानोपासनेसाठी प्रयत्नशील

अमेरिकेचे खरे सामर्थ्य हे त्यांच्याकडे असणाऱ्या विध्वंसक शस्त्रांपेक्षाही वैचारिक पातळीवरील अवाढव्य कामातून दिसते. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी झगडणारा अमेरिकन माणूस अस्वस्थ, अस्थिर आणि धास्तावलेला दिसत असला तरी ज्ञानोपासनेसाठी जगभरातील पुस्तके, तज्ज्ञ आणि संशोधन यंत्रणाही मोठ्या शक्तीने उभारताना दिसतो, असे निरीक्षण महाराष्ट्र टाइम्सचे माजी संपादक गोविंद तळवलकर यांनी नोंदवले.

भारतीय ज्ञानवर्धिनीतर्फे 'दृष्टीआडची अमेरिका' यावर त्यांचे पुण्यात भाषण झाले.

आपल्या मिळकतीपलीकडे जगणाऱ्या अमेरिकन माणसात क्रेडिट कार्डामुळे

कर्जबाजारीपण, विम्याचे संरक्षणासंबंधीची धास्ती दिसते. ज्योतिष तसेच कुंडलीवर विश्वास वाढला आहे. कुटुंबासाठी मानसोपचारतज्ज्ञ तेथे सर्वात जास्त असून चेटक्यांवरही काही जणांचा विश्वास आहे. एकीकडे व्यक्तिस्वातंत्र्यवाद टोकाला गेला असला तरी दुसरीकडे त्यावर कायद्याचे बंधन असल्यामुळे अमेरिकन माणसाचे वर्तन नियंत्रित राहायला मदत होते. येल विद्यापीठासह अनेक ठिकाणी अनेक पातळ्यांवर सुरू असणारे संशोधन, समृद्ध वाचनालये आणि सेझपॅन सारख्या माहितीपूर्ण दूरदर्शन वाहिन्यांमुळे जगभरातील ज्ञान मिळते, असेही त्यांनी सांगितले.

अमेरिकेतील डेमॉक्रॅटिक तसेच रिपब्लिकन पक्षांतील राजकारणावर प्रकाशझोत टाकतानाच दुसरीकडे तेथील वृत्तपत्रे, चर्च, वित्तीय तसेच शेअर बाजाराची माहिती सांगणाऱ्या संस्था यांची विश्वासार्हता गेल्या पाच वर्षांपासून घसरणीला लागली असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत महिलांना दुय्यम स्थान, तसेच मुख्य दोन पक्षांमधील भयावह चढाओढ, सदोष मतदानयंत्रे, तसेच मतदानासाठी कृष्णवर्णीयांना अटकाव हे पाहिले की आश्चर्य वाटते, असे त्यांनी नमूद केले.

### * सापेक्षतावादाचे कोडे भारतीय शास्त्रज्ञाने सोडविले

प्रकाशाच्या वेगाने एखाद्या वस्तूने वाटचाल केल्यास वेळ स्थिरावतो, या अल्बर्ट आइनस्टाइन यांनी मांडलेल्या सापेक्षतावादातील सिद्धांताचे कोडे सोडविल्याचा दावा सुभाष काक या भारतीय वंशाच्या प्राध्यापकाने केला आहे. आइनस्टाइन यांनी १०० वर्षांपूर्वी मांडलेला हा सिद्धांत खुद्द आइनस्टाइन यांच्यासह कोणालाही अद्यापपर्यंत सिद्ध करता आलेला नाही.

मूळचे जम्मू आणि काश्मीर येथील असलेले काक एलएसयू या विद्यापीठात विद्युत अभियांत्रिकी शाखेचे मानद प्राध्यापक आहेत.

काक केवळ शास्त्रज्ञच नसून ते विधिज्ञही आहेत. त्यांनी दिल्लीच्या आयआयटीतून १९७० मध्ये पीएच.डी. मिळविली असून, लंडनच्या इम्पीरियल कॉलेज, बेल लॅबोरेटीज, टाटा मूलभूत संशोधन संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले आहे. क्वांटम भौतिकशास्त्रात इन्फर्मेशन मेट्रिक्सचा वापर त्यांनी जगाला सर्वात प्रथम करून दाखविला असून, त्यांचा 'काक न्यूरल नेटवर्क' सिद्धांत जगप्रसिद्ध आहे.

आइनस्टाइन यांचा सिद्धांत सोडविताना दोन वस्तूंमधील संबंध प्रस्थापित करण्याऐवजी विश्वातील ताऱ्यांना आधारबिंदू मानून त्यांनी तो सिद्ध करून दाखविला आहे. विश्वाचे गुणधर्म सर्व ठिकाणी समान आहेत, हे प्रमेय गृहीत धरूनच हा आइनस्टाइनचा सिद्धांत सोडविला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रमेयाचा आधार घेत आइनस्टाइन यांचा सिद्धांत सोडविण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला नाही.

सापेक्षतावाद सिद्धांत मांडताना आइनस्टाइन यांनी प्रकाशाचा वेग विश्वात सर्वाधिक असल्याचा दावा केलेला आहे. त्यासाठी त्यांनी दोन जुळ्या मुलांचा



आधार घेतला होता. एका जुळ्या मुलाला अवकाशात स्थिर ठेवले आणि त्याच्या भावाने प्रकाशाचा वेग असलेल्या अंतराळयानात बसवून विश्वात मार्गक्रमण केल्यास स्थिर असलेला भाऊ अगोदर वयोवृद्ध होईल, असा सिद्धांत आइनस्टाइन यांनी मांडला होता. त्याला अद्यापपर्यंत कोणीही आव्हान देऊ शकलेले नाही. वेगाने धावणाऱ्या वस्तूच्या बाबतीत वेळ मंदावत जातो; ही बाबा प्रयोगाअंती सिद्ध झालेली असली तरी हे असे का होते, हे सिद्ध करणे जमलेले नाही.

काक यांचे संशोधन क्वाँटम कम्युनिकेशन आणि संगणकासाठी वरदान ठरणार आहे. अंतराळातील दळणवळण अधिक कार्यक्षमतेने करणे त्यामुळे शक्य होणार आहे.

### * आइनस्टाइनच्या मेंदूचं कोडं

सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडणारा प्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आइनस्टाइन हा अत्यंत बुद्धिमान होता. अनेक गणिती कूट प्रश्न तो लीलया सोडवीत असे. अणूचे गूढ उलगडणाऱ्या या महान वैज्ञानिकाचा मेंदूही अभ्यासासाठी जतन करण्यात आला. लॉसेन विद्यापीठाच्या काही वैज्ञानिकांनी अलीकडेच आइनस्टाइनच्या मेंदूचं जे संशोधन केलं आहे, त्यानुसार सर्वसाधारण पुरुषांपेक्षा आइनस्टाइनच्या मेंदूत विशिष्ट प्रकारच्या पेशी जास्त प्रमाणात तयार होत होत्या. या पेशींमुळे आइनस्टाइनच्या मेंदूतील न्यूरॉनच्या सर्किट्सना जास्त ऊर्जा मिळत गेली असावी. त्यामुळेच्या त्याच्या मेंदूची रचनाही गुंतागुंतीची होती. अँड्री व्होल्टेरा यांच्या नेतृत्वाखालील पथकाने 'ग्लायल' नावाच्या मेंदूतील पेशींचा अभ्यास केला. या पेशी न्यूरॉन्सना एकत्र बांधून ठेवतात, या पेशी वेगळे काम करीत नाहीत, असे समजून गेली काही वर्षे त्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. आइनस्टाइनच्या मेंदूच्या कार्यक्षमतेचे रहस्य याच पेशींमध्ये दडलेले असावे, असे शास्त्रज्ञांना वाटत आहे.

'ग्लायल' पेशी या आजूबाजूच्या न्यूरॉन्समध्ये कॅल्शियमचे वहन व मेंदूतील संदेशांचे नियंत्रण करतात. १९८५ मध्ये बर्कलेतील कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या वैज्ञानिकांनी आइनस्टाइनच्या मेंदूतील 'स्लीव्हर' या भागाचे शरीर शास्त्रीय विश्लेषण केले होते. त्याच्या मेंदूतील विविध पेशींची मोजदादही करण्यात आली आहे.

१९५५ मध्ये त्याच्या मृत्यूनंतर अवघ्या सात तासांतच आइनस्टाइनचा मेंदू काढून घेण्यात आला होता. आपला मेंदू हा विज्ञान संशोधनासाठी वापरला जावा अशी इच्छा त्याने व्यक्त केली होती. हॅन्स अल्बर्ट आइनस्टाइन या त्याच्या मुलाने मेंदू काढण्यास परवानगी दिली ती विज्ञान संशोधनाच्या अटीवरच. त्या मेंदूचे २४० भागांत विभाजन करून ते भाग फार्मालिनच्या मदतीने जपून ठेवले आहेत.

## * कविवर्य मंगेश पाडगावकर : वय वर्षे ७८

ओठावरले हसू असो, की डोळ्यांतील आसू; सुख-दु:खांच्या अशा क्षणांमध्ये साथ देणाऱ्या गाण्यांचे शिल्पकार ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांच्या ७८ व्या वाढदिवसानिमित्त 'अजय धोंगडे प्रॉडक्शन्स'च्या वतीने 'माझे जीवनगाणे' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन १० मार्च रोजी पुण्यात करण्यात आले होते. 'आयडिया सेल्युलर'चे माजी उपाध्यक्ष संजय जोशी यांच्या हस्ते श्री. पाडगावकर यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी अरुण नूलकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. ''माणूस समजावून घेणे आणि व्यक्त करण्यासाठी भाषेच्या नवनव्या सर्जनशक्ती शोधत जाणे, हेच आपण आपले ध्येय मानले,'' असे श्री. पाडगावकर म्हणाले. ''वात्रटिका हा आकृतिबंध इंग्रजीतील 'नॉन्सेन्स पोएम'मधून घेतला. त्यानंतर त्यातील विविध शक्यता शोधत गेलो. त्याचा शोध हीच माझ्या जीवनाची यात्रा ठरली,'' असे त्यांनी सांगितले.

या वेळी श्री. पाडगावकर यांनी 'तिनं लाजून होय म्हटलं', 'याचं असं का होतं कळत नाही', 'विरळा', 'गोष्ट', 'तृप्ती' अशा कविता सादर केल्या, तसेच 'भावनांचा तू भुकेला रे मुरारी', 'अशी पाखरे येती', 'कुठे शोधिसी रामेश्वर' अशी अनेक गाणी आणि त्यांच्याशी निगडित आठवणींच्या या प्रवासाला रसिकांनी मनसोक्त दाद दिली.

## * डेक्कन कॉलेज पदवीदान समारंभ

''ऐतिहासिक दस्तऐवजांचे महत्त्व जाणून ते भविष्यातील पिढ्यांकरिता टिकवून ठेवण्याची मानसिकता तयार करण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्याची वेळ आली आहे,'' असे मत ज्येष्ठ इतिहास संशोधक व लेखिका प्रा. रोमिला थापर यांनी व्यक्त केले.

पुण्यातील डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाच्या चौथ्या पदवी प्रदान समारंभात विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांचे दीक्षांत भाषण झाले. 'आर्किऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया'चे माजी संचालक व ज्येष्ठ पुरातत्त्वतज्ज्ञ एम. एम. देशपांडे यांना या वेळी 'डी.लिट.'ने सन्मानित करण्यात आले. चाळीस विद्यार्थ्यांना या वेळी पदवी प्रदान करण्यात आल्या. डेक्कन कॉलेजचे संचालक डॉ. के. पदय्या, अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर हे या वेळी उपस्थित होते. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रा. थापर म्हणाल्या, ''अलीकडच्या काळात इतिहास, परंपरा व प्राचीन दस्तऐवजाकडे काहीसे दुर्लक्ष होत असल्याचे जाणवते. वास्तविक हा ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो. मात्र, नव्या पिढीमध्ये तशी मानसिकता तयार करण्याचे आव्हान आहे. आर्थिक सुधारणांच्या काळात औद्योगिक विकास अपरिहार्य आहे.''



प्रा. पदय्या यांनी डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संशोधन संस्थेच्या विविध उपक्रमांची व संशोधन प्रकल्पांची माहिती दिली.

## * श्री राजा शिवछत्रपती पुस्तकाचे प्रकाशन

श्री राजा शिवछत्रपती या गजानन भास्कर मेहेंदळे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे पुन:प्रकाशन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते करण्यात आले.

'डायमंड पब्लिकेशन'च्या वतीने शिवचरित्राचे हे दोन खंड प्रकाशित करण्यात आले आहेत. या प्रसंगी लेखक मेहेंदळे, ज्येष्ठ पत्रकार गोपाळराव पटवर्धन, प्रकाशनाच्या वतीने दत्तात्रेय पाष्टे, मुद्रक स्वाती जोशी, गिरीश जोशी, चित्रकार श्याम भालेकर आदी उपस्थित होते.

## * समांतर रंगभूमीवरील नाटके दीर्घ खंडानंतर परदेशात

समांतर रंगभूमीवर गाजलेली आणि व्यावसायिक रंगभूमीवरही 'हाऊसफुल' झालेली दोन नाटके अमेरिकेत जाणार आहेत. 'माकडाच्या हाती शॅम्पेन' आणि 'फायनल ड्राफ्ट' ही 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर' निर्मित नाटके अकरा मार्चला अमेरिकेस रवाना होत आहेत. 'घाशीराम कोतवाल'नंतर समांतर रंगभूमीवरची परदेशी जाणारी हीच मराठी नाटके आहेत.

''या नाटकांचा अमेरिका दौरा ४० दिवसांचा आहे. त्या दरम्यान लॉस एंजेलिस, सॅनफ्रॅन्सिस्को, पोर्टलंड, सॅनहोजे, डलास, रॅले, न्यूयॉर्क, न्यू जर्सी अशा अनेक ठिकाणी प्रयोग होणार आहेत.

'घाशीराम'ने लोकप्रियता आणि समीक्षकांची दाद मिळवली. तसाच प्रकार या दोन नाटकांच्या बाबतीतही घडला आहे. 'घाशीराम'नंतर अनेक मराठी व्यावसायिक नाटके परदेशी पोचली; पण ज्यांचा जन्म प्रायोगिक आणि समांतर रंगभूमीवर झाला त्या नाटकांनी मिळवलेले हे यश उल्लेखनीय आहे. तरुण पिढीतील नव्या प्रतिभेला आणि नव्या सादरीकरणाला मिळालेली ही दाद आहे.

## * आठवे राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन

राजकारणाने अनेक साहित्यिकांना राजकारणी बनवले असून, त्यामुळे साहित्य क्षेत्राची मोठी हानी झाली, अशी खंत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केली. वाचकाचा धाक असल्याशिवाय चांगले साहित्य निर्माण होणार नाही, असे मत त्यांनी आठव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, संमेलनाध्यक्ष भाई वैद्य, डॉ. रावसाहेब कसबे, स्वागताध्यक्ष डॉ. संजय चोरडिया आदी उपस्थित होते.

प्रा. जाधव म्हणाले, यापुढे साहित्यसंमेलनात मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांचा वापर करावा लागणार आहे. या तीन भाषांशिवाय जगता येणार नाही.

अनेक जीवनमूल्ये मलिन झाली असताना 'बंधुता' राष्ट्राला आणि संस्कृतीला तारू शकेल. माणुसकी धर्माचे भान सतत ठेवले पाहिजे. सामाजिक संघटनांनी साहित्याचे क्षेत्र आपलेसे केले आहे.

भाई वैद्य म्हणाले, जागतिकीकरणामुळे 'वसुधैव मार्केटम्' ही संकल्पना रूढ झाली आहे. ज्यांनी सामाजिक जाणिवा चेतवायच्या, ती माध्यमे आता विदेशी गुंतवणूकदारांची बटिक बनण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे साहित्यिकांपुढे मोठी जबाबदारी आहे, मातृभाषेचे भवितव्यही अडचणीत आहे. पुणे-मुंबई येथे मराठी शाळांची संख्या कमी होऊन इंग्रजी शाळांची संख्या वाढत आहे. मराठी भाषेला खो देऊन तिची जागा इंग्रजी भाषा घेणार असल्याने विचार करावा लागेल.

## * दिवाळी अंक सशक्त होण्यासाठी अर्थकारण महत्त्वाचे

मराठीतील दिवाळी अंकांची परंपरा सशक्त होण्यासाठी तिचे अर्थकारणही जाहिरातीच्या माध्यमातून वाढायला हवे. जाहिरात आणि मजकुराचे प्रमाण यांचा समतोल साधला तर ही परंपरा कायम ठेवता येईल, असा विश्वास ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केला.

मसापच्या दिवाळी अंक स्पर्धा २००६ चे पारितोषिक वितरण परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झाले. उत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धेत शं. वा. किर्लोस्कर पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'ला मिळाला. संपादक भारतकुमार राऊत यांनी यावेळी विजेत्यांच्या वतीने विचार मांडले.

'साधना', 'शब्ददर्वळ', 'विपलश्री', 'तारका' आणि 'जडणघडण' या दिवाळी अंकांना अनुक्रमे अ. स. गोखले रत्नाकर पारितोषिक चंद्रकांत शेवळे पुरस्कृत विविध ज्ञानविस्तार आणि बाल विभागासाठी विशेष पुरस्कार देण्यात आले.

दर्जेदार दिवाळी अंकासाठी जाहिराती अंकात असणे कमीपणाचे वाटता कामा नये, हा मुद्दा मांडताना भारतकुमार राऊत म्हणाले की, दिवाळी अंक हा व्यवसाय आहे, हे ते काढणाऱ्यांनी स्वत:शी आधी मान्य करायला हवे. अंकाची किंमत कमी ठेवूनही दर्जेदार मजकुरासह देखणा अंक काढणे शक्य असते. जाहिरातीतून महसूल मिळवून कसदार अंक काढता येईल. अन्यथा कागद, शाई, वितरण खर्च याऐवजी मजकुराच्या बाबतीत तडजोड करावी लागेल. त्यामुळे दिवाळी अंक संस्कृतीला गालबोट लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

## * 'कीचकवधा'ची शंभरी!

'कीचकवध' या ऐतिहासिक नाटकाचा पहिला प्रयोग २२ फेब्रुवारी १९०७ रोजी पुण्यातल्या विजयानंद थिएटरमध्ये झाला. 'कीचकवधा'च्या प्रथम प्रयोगास नुकतीच १०० वर्षे पूर्ण झाली.



विजयानंद थिएटर आता बंद झाले आहे; पण कीचकवधाने निर्माण केलेल्या आठवणींचा रोमांच मात्र तितकाच थरारक आहे. ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठाव करण्याशिवाय तरणोपाय नाही, हा थेट संदेश देणारे हे क्रांतिकारक नाटक महाडच्या महाराष्ट्र नाटक मंडळीने तेव्हा सादर केले. तो प्रयोग २३ फेब्रुवारी रोजी पहाटे संपला. त्यात कीचकाची भूमिका भागवत आणि भीमाची भूमिका त्र्यंबकराव प्रधान यांनी साकारली होती.

त्या प्रयोगावर तसेच संहितेवर जानेवारी १९१० मध्ये बंदी आली. भारतीय वृत्तपत्र कायद्याच्या कलम १२४ (अ) खाली ही बळी पडलेले हे पहिले नाटक होते.

वैचारिकदृष्ट्या 'कीचकवध' ही सरस वाङ्मयीन कृती असून त्यातून खाडिलकरांची राष्ट्रभक्ती आणि आक्रमकताच स्पष्ट जाणवते. या नाटकातून कीचकाच्या रूपातील कर्झन, भीमाच्या रूपातील लोकमान्य टिळक तसेच सैरंध्रीच्या रूपातील भारतमाताच समकालीन प्रेक्षकांना भावली. ही बंदी १९२६ मध्ये उठली.

## * 'आम्ही मराठीचे प्राध्यापक'

गतिमान युगात सुखाने अध्यापन करता येईल अशी शिक्षणपद्धती राहिली नाही, त्यामुळे मराठीच्या प्राध्यापकांनी या युगाप्रमाणे आता संपूर्ण जीवनाचे भान ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. द. दि. पुंडे यांनी येथे केले.

'अक्षरसारस्वत'च्या वतीने संपादित 'आम्ही मराठीचे प्राध्यापक' पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव, वीणा देव, 'अक्षरसारस्वत'चे बबन मिंडे आणि शिरीष म्हेत्रे याप्रसंगी उपस्थित होते.

प्राध्यापक हा कधीच समूहाने राहू शकत नसल्याने तो कायम अवहेलनेचा विषय ठरला आहे. त्याला विविध कामांसाठी राबविले जाते; तरीही तो शांत राहतो, असे सांगून डॉ. पुंडे म्हणाले, प्राध्यापकांना जो मानसन्मान पूर्वी मिळायचा तो आज मिळत आहे का, याबाबत मनात शंका आहे.

मराठी समाजाचे भले कसे होईल, यावर आधारित अभ्यासक्रम असेल तरच मराठी भाषेचे भले होईल. तसा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी प्राध्यापकांना चिंतन, मनन करावे लागेल. कारण त्यातून वाङ्मयाची ताकद काय आहे हे समजण्यास मदत होत असते, असे डॉ. पुंडे यांनी सांगितले.

## * शोधनिबंधात विद्यापीठे मागे

देशातील विद्यापीठांच्या शोधनिबंधांचे प्रमाणे कमी होत आहे. १९८५-८६ ते २००२ या काळात जगभरातील संशोधनविषयक नियतकालिकांत प्रसिद्ध होणाऱ्या भारतीय शोधनिबंधांत विद्यापीठांचे योगदान ५२ वरून ४६ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. विशेष म्हणजे या काळात 'आयआयटी'; तसेच संशोधन संस्थांमधील शोधनिबंधांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे.

विज्ञान संशोधन क्षेत्रातील भारताच्या कामगिरीबाबत ‘नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड डेव्हलपमेंट स्टडीज’ या संस्थेचे डॉ. बी. एम. गुप्ता आणि एस. एम. धवन यांनी आपला अहवाल केंद्राला नुकताच सादर केला. विद्यापीठांमधून शोधनिबंध प्रसिद्ध होण्याचे प्रमाण कमी झाल्याबद्दल अहवालात चिंता व्यक्त करण्यात आली आहे, ही स्थिती दूर करण्यासाठी आंतरविद्यापीठ केंद्राचा पर्याय सुचविला आहे.

कोणत्या नियतकालिकांत शोधनिबंध प्रसिद्ध होतो, यालाही महत्त्व असते. या अहवालात या नियतकालिकांचे ‘शून्य परिणाम, कमी परिणाम, मध्यम परिणाम आणि अधिक परिणाम करणारे,’ अशा चार टप्प्यांत वर्गीकरण करण्यात आले आहे. भारतीय विद्यापीठांमधील तब्बल ८३.२६ टक्के शोधनिबंध हे कमी परिणाम करणाऱ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

मध्यम परिणाम करणाऱ्या नियतकालिकांमधील शोधनिबंधांचे प्रमाण आहे १०.११ टक्के, तर अधिक परिणाम करणाऱ्या नियतकालिकांतील शोधनिबंधांचे प्रमाण आहे तीन टक्के!

विज्ञान जगतात शोधनिबंधांबरोबरच ‘सायटेशन’लाही महत्त्व आहे. संबंधित विषयाच्या संशोधन कार्यासाठी प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांचा घेतलेला आधार आणि त्याच्या लेखनात या निबंधाचा केलेला उल्लेख म्हणजे ‘सायटेशन’!

या बाबतीतही भारतीय विद्यापीठांच कामगिरी समाधानकारक नसल्याचे अहवालात म्हटले आहे. २००२ मध्ये ४८.५९ टक्के शोधनिबंधांना एकही ‘सायटेशन’ मिळाले नाही. केवळ एक ते चार ‘सायटेशन’ मिळालेल्या शोधनिबंधांचे प्रमाण आहे ४१.१७ टक्के! ९.६० टक्के निबंधांना ५ ते १९ ‘सायटेशन’ मिळाली आहेत. वीसहून अधिक ‘सायटेशन’ मिळविलेल्या निबंधांचे प्रमाण २००२ मध्ये फक्त ०.६४ टक्के होते.

## * चारोळीद्वारे कवी नवे काय देतो?

‘चारोळ्या करताना आपण वाचकांना नवीन काय देत आहोत, हे नवकवींनी तपासावे,’’ असे मत गंगाधर महांबरे यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ कवी सुगंध भोरे यांच्या ‘मायेचा ओलावा’ व ‘मागं वळून पाहताना’, ‘थोडं बोलू का?’ या काव्यसंग्रहांचे प्रकाशन ‘सकाळ’चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले.

‘नवकाव्यातून प्रोत्साहन मिळते. त्यामुळे ते चांगले आहे. मात्र, नवकाव्याच्या नावाखाली जे प्रकार चालतात ते योग्य नाहीत. नवकवींनी समाजाला नवीन देण्याचा प्रयत्न केला पाहिजे’ असे महांबरे म्हणाले.

मालकर म्हणाले,‘भोरे यांच्या या कवितासंग्रहात आईविषयक कवितांचा समावेश आहे. या कवितांमधून मानवी भावनांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न आहे.’



## * मराठी शब्दकोशाचे प्रकाशन

दुसऱ्याच्या भाषिक अज्ञानाबद्दल आनंद होणे ही मनोविकृती असून ती दूर करण्यासाठी मराठी भाषक समाजामध्ये जागृती व्हावी, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी मांडले.

मनोविकास प्रकाशनच्या प्रा. यास्मिन शेख लिखित ‘मराठी शब्दलेखनकोश’ या कोशाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

मराठी भाषा अवघड असल्याचे आपल्याला मान्य करावेच लागेल, असे सांगून प्रा. जाधव म्हणाले, भाषाशास्त्रज्ञांनी याचा मुळापासून अभ्यास करून त्यानुसार शालेय शिक्षण पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. यातूनच मुलांवर भाषाशुद्धीचे संस्कार होतील.

## * विज्ञान मराठीतूनच शिकवा

मुलांचा विज्ञानाचा पाया पक्का होण्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये विज्ञान मातृभाषेतूनच शिकविणे गरजेचे आहे. तरच ते अधिक प्रभावी ठरू शकेल, असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले.

मराठी अभ्यास परिषदेतर्फे झालेल्या ‘विज्ञानाची मराठी किती पुढे किती मागे?’ या विषयावरील चर्चासत्रात डॉ. नारळीकर यांच्यासोबत डॉ. बाळ फोंडके, डॉ. पंडित विद्यासागर, अनुवादक अशोक पाध्ये सहभागी झाले होते. काळानुरूप प्रत्येक भाषेतच परिवर्तन होत असते. नव्या उपयुक्त शब्दांचा भाषेत समावेश करणे हे भाषेवरील आक्रमण मानता कामा नये. उलट त्यामुळे भाषा अधिक समृद्ध होते. मराठी भाषेचा अधिकाधिक वापर वाढविण्यासाठी भाषा आणि आधुनिकता यांची सांगड घातली पाहिजे, असे मत यावेळी डॉ. नारळीकर यांनी व्यक्त केले.

विज्ञानाचा मराठीतून वापर वाढण्यासाठी विज्ञान आणि भाषातज्ज्ञांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मत डॉ. बाळ फोंडके यांनी व्यक्त केले. नवीन शब्द रूढ करताना त्याचे प्रमाणीकरण व्हायला हवे. तसेच अधिक उत्तम प्रतिशब्द स्वीकारण्याची ठराविक पद्धत निश्चित करायला हवी, असे त्यांनी सांगितले. विज्ञानाच्या परिभाषा आणि संकल्पनांना मराठीत शब्द रूढ होण्याची गरज आहे, सरकारची धोरणेही नवीन शब्द प्रचलित होण्याच्या आड येतात, असे अशोक पाध्ये यांनी सांगितले.

मराठीचा वापर वाढविण्यासाठी तिची उपयुक्तता पटवून देणे आवश्यक आहे. इंग्रजी भाषेने काही मराठी शब्द स्वीकारले असताना आपण इंग्रजी स्वीकारण्यात काही गैर नाही. मराठीतून विज्ञान शिकविण्यासाठी आणि वाचण्यासाठी प्रथम भाषेची आवड निर्माण होणे गरजेचे आहे, असे मत विद्यासागर यांनी व्यक्त केले.

## * कुसुमाग्रजांची 'कुसुम'

'मी जन्मानं पुणेकर, नावानं शिरवाडकर, पण वास्तव्यानं आणि अंत:करणानं सर्वस्वी नाशिककर,' असे उद्‌गार ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांनी काढले असले तरी पुणेकरांचेही त्यांच्यावर तितकेच प्रेम होते, यात शंका नाही. शिरवाडकरांच्या कनिष्ठ भगिनी कुसुमताई सोनवणे. यांच्या नावावरून शिरवाडकरांनी कुसुमाग्रज हे टोपणनाव धारण केले. ८० वर्षांच्या कुसुमताई सध्या पुण्यातील सहकारनगरमध्ये वास्तव्यास आहेत.

तात्यांचा जन्म २७ फेब्रुवारी रोजी निंबाळकर तालीमजवळील लिमये वाड्यात झाला, अशी आठवण कुसुमताईंनी सांगितली. पुढे पिंपळगावात बालपण गेल्यावर नाशिकच्या एचपीटी कॉलेजात शिकत असताना तात्यांनी कविता करायला सुरुवात केली ती माझे नाव लावूनच. तेव्हा ती दहा-बारा वर्षांची होते, असे सांगून कुसुमताई म्हणाल्या की, रविकिरण मंडळात गोविंदाग्रज हे राम गणेश गडकऱ्यांनी धारण केलेले नाव तात्यांना अतिशय आवडले आणि त्यातूनच 'कुसुमाग्रज' या तरुण प्रतिभावान कवीचा जन्म झाला!

कॉलेजच्या काळात नाशिकमध्ये त्यांचे 'ध्रुव' नावाचे मंडळ होते, त्यामध्ये सर्व कवी एकत्र जमून कविता म्हणत असत. 'जीवनलहरी' हा त्यांचा पहिला छोटा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर 'विशाखा' आला आणि 'कुसुमाग्रजां'नी पुढे इतिहासच घडवला! 'पृथ्वीचे प्रेमगीत' आणि 'गर्जा जयजयकार' या दोन कविता सर्वात जास्त आवडतात. 'पृथ्वीचे प्रेमगीत'मधल्या 'नको क्षुद्र शृंगार तो दुर्बलांचा, तुझी दूरता त्याहूनि साहवे' या ओळी कुसुमताईंना खूप भावतात.

'गर्जा जयजयकार' ही कविता कुसुमाग्रजांनी पुण्यात पत्रकार म्हणून काम करताना पेरुगेट पोलिस चौकीजवळ असणाऱ्या एका खोलीत लिहिली आहे, अशी आठवण कुसुमाग्रजांचे बंधू के. रं. शिरवाडकर यांनी 'तो प्रवास सुंदर होता' या पुस्तकात लिहून ठेवली आहे. सात भावंडांत मी एकटीच असल्यामुळे तात्यांचा माझ्यावर खूप जीव होता, असे कुसुमताई म्हणाल्या.

## * बंडखोर लेखिका कमला दास पुण्यात राहणार

भारतातील आघाडीच्या इंग्रजी लेखिका कमला दास उर्फ कमला सुरय्या या आपले उत्तरायुष्य पुण्यात व्यतीत करणार आहेत.

बंडखोर लेखिका ही आपली ओळख कायम ठेवणाऱ्या श्रीमती दास यांनी आपले कोची येथील घर सोडून नुकतेच पुण्यात आगमन केले. 'आपण महाराष्ट्रातील या सुंदर शहरात कायम राहण्यासाठी जात आहोत,' असे त्यांनी केरळ सोडण्यापूर्वी सांगितले. त्यांचे सर्वांत धाकटे चिरंजीव जयसूर्या पुण्यात स्थायिक आहेत.

श्रीमती दास यांना साहित्याचा वारसा आई-वडिलांकडून मिळाला. त्यांच्या



मातु:श्री बालमनीसम्मा या तर मल्याळी कवितेच्या जननी म्हणून ओळखल्या जातात. इंग्रजीतून अत्यंत प्रभावी लेखन करणाऱ्या मोजक्या भारतीय लेखिकांमध्ये कमला दास यांचे स्थान फार वरचे आहे. 'समर इन कलकत्ता', 'माय स्टोरी' हे आत्मकथन ही दास यांच्या भांडारातील काही रत्ने! तनमनातील उर्मींचे चित्रण करणारे दास यांचे लेखन वेळोवेळी वादग्रस्त ठरले आहे; तसेच त्यांचे जीवनही. कमला दास यांनी रिझर्व्ह बँकेचे माजी संचालक माधवन दास यांच्याशी विवाह केला. बराच काळ त्या मुंबईत होत्या. माधवन यांचे निधन झाल्यावर आठ वर्षांपूर्वी त्या केरळमध्ये परतल्या होत्या.

१९९९ मध्ये वयाची साठी उलटल्यावर 'बुरखा घालण्यातच स्त्रीची सुरक्षितता आहे,' असे म्हणत त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारून सुरय्या हे नाव धारण केले.

## * सिडनी विद्यापीठात हिंदू धर्म अभ्यास विषय

जगातील सर्वात जुन्या धर्मांपैकी एक असलेला हिंदू धर्म आता सिडनी विद्यापीठात अभ्यास विषय बनला आहे. धर्म अभ्यास विभागाचे प्राध्यापक ज्युलियन ड्रुगन हिंदू धर्माची व्यावहारिक माहिती देण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये घेऊन जातात. त्यांच्या मते हिंदुत्वाचे जग जिवंत, प्रगतिशील आणि वैविध्यपूर्ण राहिले आहे. येथे सर्वांना आपल्या मतानुसार देव-देवतांची पूजा करण्यात मुभा आहे. हिंदू धर्माची पूजा पद्धती, अनुष्ठान पद्धतीबरोबर हिंदू स्थापत्य शैलीची आणि धार्मिक प्रतीकांची माहितीही विद्यार्थ्यांना सांगितली जाते.

## * 'भांडारकर'साठी दोन कोटी रुपये

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या 'डिजटायझेशन' प्रकल्पासाठी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीतून संस्थेच्या ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखितांचे जतन शक्य होणार आहे.

विविध कार्यक्रमांसाठी अर्थमंत्री पी. चिदंबरम २ डिसेंबर २००६ रोजी पुण्यात आले होते, तेव्हा डॉ. विजय भटकर यांच्या विनंतीवरून त्यांनी संस्थेला भेट दिली होती.

संस्थेचे मानद सचिव डॉ. मा.गो. धडफळे या संदर्भात म्हणाले, ''याच भेटीदरम्यान अर्थमंत्र्यांनी 'डिजिटायझेशन'साठीचा प्रस्ताव पाठवण्याची सूचना केली होती. अर्थसंकल्पातील तरतूद ही या भेटीचे फलित मानावी लागेल. या तरतुदीतून संस्थेच्या ग्रंथालयातील सव्वा लाख पुस्तके, २८ हजार हस्तलिखितांची डाटा एंट्री; तसेच प्राकृत शब्दकोशाच्या सहा लाख स्लिपा, टिपणपत्रिका, महाभारताच्या सांस्कृतिक कोशाची दीड लाख कार्डे यांचे डिजिटायझेशन होणार आहे.''

'डिक्शनरी बिल्डिंग सॉफ्टवेअर'च्या माध्यमातून हे काम होईल. त्याचप्रमाणे

अत्यंत दुर्मिळ अशी चार हजार पुस्तके व चार हजार हस्तलिखिते यांच्या फोटोग्राफिक इमेजेस व स्कॅनिंग हाही या प्रकल्पाचा एक भाग आहे. यासाठी आवश्यक ती तांत्रिक व यांत्रिक मदत 'सी-डॅक'कडून घ्यावी, असेही अर्थमंत्र्यांनी सुचवले आहे. त्यानुसार सी-डॅक सहाय्य करणार आहे, असे श्री. धडफळे यांनी सांगितले. संस्थेच्या सध्याच्या वेबसाईटला 'इंटरॲक्टिव्ह मोड' देऊन ती लवकरच कार्यान्वित केली जाईल.

या प्रकल्पाचा कालावधी दोन वर्षांचा असेल. प्रकल्पासाठी मुख्य संशोधन अधिकारी म्हणून सी-डॅकचे महासंचालक एस. रामकृष्णन, संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय भटकर आणि डॉ. धडफळे काम पाहतील.

### * इंग्रजी-मराठी सचित्र कोश तयार

पुण्यातल्या 'सेंटर फॉर लर्निंग रिर्सोसेस' या संस्थेने 'यंग इंडिया पब्लिकेशन्स' या प्रकाशन संस्थेच्या मदतीने 'माय वर्ल्ड माय वर्डस्' हा एक हजार इंग्रजी-मराठी शब्दांचा सचित्र कोश पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केला आहे.

डॉ. झाकिया कुरियन यांच्या मार्गदर्शनाखाली बनवलेल्या या पुस्तकासाठी पुणेकर भाषातज्ज्ञ वर्षा सहस्रबुद्धे तसेच अविनाश पंडित यांनी संपादनसहाय्य केले आहे. राज्य सरकार, औरंगाबादची स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश फॉर महाराष्ट्र आणि रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीने उपयुक्त संदर्भ पुस्तक म्हणून 'माय वर्ल्ड'ची शिफारस केली आहे. सरकारच्या नवीन अध्यादेशानुसार आता इंग्रजी शाळांमधून मराठी विषय हा सक्तीचा झाला आहे. म्हणून हे पुस्तक नक्कीच उपयोगी ठरेल, असे 'यंग इंडिया पब्लिकेशन्स'चे कार्यकारी संचालक दिलीप लाठी यांनी सांगितले.

मुलांच्या मानसिकतेचा विचार करून त्यांच्या विश्वातील विषयांना पूरक अशाच शब्दांची यामध्ये निवड केली आहे. तसेच पुस्तकामधील चित्रांमधून आपल्या देशातली विविधता, स्त्री-पुरुष समानताही चित्रमय पद्धतीने मांडली आहे. आदिवासी भागात काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका, मुलांसाठी व्यंगचित्रे आणि हस्ताक्षर सुंदर मार्गदर्शक पुस्तके, आजचे 'आयडॉल्स' उद्योजक धीरूभाई अंबानी, अझीम प्रेमजी तसेच मायक्रोसॉफ्टचे बिल गेटस् यांची चरित्रे, मुलांमधील एकाग्रता आणि सर्जनशीलता वाढवण्यासाठी पुस्तके आणि सीडी असे उपक्रमही सुरू होत आहेत.

इंग्रजी अभ्यासासाठी 'सेंटर फॉर लर्निंग', पर्यावरणासाठी पुण्यातल्या 'सेंटर फॉर एन्व्हायरमेंटल एज्युकेशन', तत्त्वज्ञानासाठी 'तेज ग्यान फाउंडेशन' आणि 'नवभारत राष्ट्रीय विद्यापीठ' यामधील तज्ज्ञांची मदत घेऊन पुस्तके काढण्यात येत आहेत. 'यंग इंडिया पब्लिकेशन'च्या या कामाची दखल 'युनिसेफ'ने घेतली आहे.



### * 'एक पूर्ण– एक अपूर्ण'चे प्रकाशन

'एक पूर्ण– एक अपूर्ण' ही केवळ आईची मनोव्यथा सांगणारी कथा नसून, मतिमंद मुलांच्या जीवनाकडे कोरडेपणाने पाहणाऱ्या संपूर्ण समाजाचे डोळे उघडणारी एक जीवनगाथा आहे. त्यामुळे प्रत्येकाने आवर्जून ही कथा वाचली पाहिजे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

राज्याच्या वनविभागाच्या सचिव नीला सत्यनारायणलिखित 'एक पूर्ण– एक अपूर्ण' (वन फूल- वन हाफ) या मराठी व इंग्रजी भाषेतील पुस्तकाचे प्रकाशन 'क्रॉसवर्ड' येथे कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते.

डॉ. जाधव म्हणाले, ''नीला सत्यनारायण यांनी कथेतून आईच्या मनाची अवस्था, त्यातील संघर्ष अत्यंत सुंदर रीतीने मांडले आहेत. ज्या खुलेपणाने त्यांनी हे लेखन केले आहे, ते आपले सर्वांचेच डोळे उघडणारे आहे. 'विशेष प्रकारचे आयुष्य' जगणाऱ्या मुलांच्या पालकांसाठी व प्रत्येक आईसाठी हे पुस्तक खूप प्रेरणादायी आहे.''

नीला सत्यनारायण पुस्तकाविषयी म्हणाल्या, ''संकटामुळे एखादी बाई मोडून पडू शकते; परंतु जेव्हा ती आई होते, तेव्हा कोणत्याही आव्हानाचा सामना करू शकेल इतकी सामर्थ्यवान बनते. या पुस्तकातून अशा आईला धीर मिळाला किंवा मुलांना आईवर प्रेम करायला शिकविले, तरी माझे लेखन सार्थक झाले, असे मी मानीन.'' पुस्तकातून रॉयल्टी स्वरूपात मिळणारी सर्व रक्कम अनाथ मतिमंद मुलांचे आयुष्य उभारण्यासाठी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच 'नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड'ने या पुस्तकाचे बोलणाऱ्या पुस्तकात रूपांतर करण्यासाठी परवानगी मागितली आहे. या पुस्तकाचे येत्या काही महिन्यांत गुजराती, हिंदी व बंगाली भाषांतून अनुवाद होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

### * गीत व काव्य यातील फरक चुकीचा

मराठीमध्ये गीत आणि काव्य यांच्यात जो फरक केला जातो, तो चुकीचा आहे. व्यावहारिक पातळीवर तो शक्य आहे, पण कलेच्या प्रांतात तो केला जाऊ नये. काव्यातील सूक्ष्मता आणि तरलता घेऊनच गीत जन्माला येते,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी कल्याण इनामदार यांनी लिहिलेल्या 'गीतरचना- स्वरूप आणि विकास' या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, ''गीत श्रेष्ठ की कविता या प्रश्नावर आतापर्यंत बराच खल झाला आहे. कलाकृती, निर्मिती आणि रसिक यांपैकी नेमक्या कोणाच्या अंगाने हा प्रश्न चर्चिला जातो? गीतरचना हा मराठीचा अनमोल ठेवा आहे. साधारणत: १९३५ पासून गीतकाव्य हिणकस आणि विशुद्ध भावकाव्य श्रेष्ठ अशी विभागणी होऊ लागली. विशुद्ध भावकाव्यापेक्षा गीतकाव्य कनिष्ठ दर्जाचे आहे, असे म्हणणे म्हणजे सोन्याच्या घड्यावर बसून स्वत:ला दरिद्री म्हणवण्यासारखे

आहे. एका प्रकारामध्ये सूक्ष्म अनुभव मिळतो; तर दुसऱ्यात स्थूल, असा गीत आणि काव्य यांतील फरक आहे. दोन्हींत तर-तम करता येणार नाही.''

### * ज्ञानपीठविजेत्या साहित्यिकाच्या लघुकथा आता रुपेरी पडद्यावर

फाळके पुरस्काराने सन्मानित झालेले जागतिक कीर्तीचे दिग्दर्शक अडूर गोपालकृष्णन यांनी एकाच वेळी दोन चित्रपटांची घोषणा करून आपल्या चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे.

अडूर यांनी 'मुन्नू पेन्नगल' (तीन स्त्रिया) आणि 'कलंते माकन' (चोराचा मुलगा) या दोन चित्रपटांसाठी घोषणा केली असून ज्ञानपीठ पुरस्कारविजेते लेखक तकाझी शिवशंकर पिल्लै यांच्या सहा लघुकथांवर ते आधारित आहेत. दूरदर्शनच्या सहकार्याने या चित्रपटांची निर्मिती करण्यात येत आहे.

हे दोन चित्रपट एका वेळी दिग्दर्शित करण्याची कल्पना आपल्याला पिल्लै यांच्या सहा लघुकथांवर दूरदर्शनसाठी पटकथा लिहिल्यानंतर सुचली असे अडूर यांनी सांगितले. ते म्हणतात, ''या सगळ्याच कथा माझ्या आवडत्या असून त्यातील कोणतीही एक पटकथा मागे ठेवणे मला रुचले नसते. त्यामुळे या कथांमधून दोन चित्रपट बनविण्याचा विचार मी केला. यातील तीन कथांमध्ये एक समान धागा असून स्त्रियांच्या वेगवेगळ्या छटा त्यामधून दिसून येतात. अन्य तीन कथा सर्वसामान्य जनतेच्या संघर्षाशी निगडित असल्याने त्यांना मी एका पटकथेत गुंफले आहे.''

उत्तम साहित्यकृती रुपेरी पडद्यावर आणण्याचा अडूर यांचा हा तिसरा प्रयत्न आहे. यापूर्वी त्यांनी वायकोम मोहम्मद बशेर यांच्या कादंबरीवर 'मथिलुकल' (भिंती- १९८९) हा चित्रपट बनविला होता व त्यानंतर पॉल झकारिया यांच्या कथेवर 'विधेयान' (१९९३) हा चित्रपट काढला होता. आगामी दोन चित्रपट म्हणजे एका दिग्दर्शकाने एका थोर लेखकाला दिलेली मानवंदना असेल, असे सांगून अडूर म्हणाले की, या कथा पन्नास वर्षांपूर्वीच्या असल्या तरी त्यांना आजच्या काळाचे संदर्भ आहेत.

### * दलित-ग्रामीण साहित्याचा शब्दकोश

दलित व ग्रामीण जीवनातील अपरिचित म्हणी, शब्द, संज्ञा, वाक्यप्रयोग नवीन पिढीपर्यंत प्रभावीपणे पोचविण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेने शब्दकोश व सूची तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. सव्वादोन हजार पुस्तकांतून तीस हजार शब्दांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. हा प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे.

मराठी साहित्यातील दलित आणि ग्रामीण या महत्त्वाच्या प्रवाहांच्या संदर्भातील हा शब्दकोश अभ्यासकच नव्हे, तर नव्या पिढीसाठीही महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. दलित-ग्रामीण साहित्यातील अनेक शब्द, संज्ञा, संकल्पना, म्हणी, वाक्प्रयोग



आजही अपरिचित आहेत. हे सर्व बऱ्याच प्रमाणात वाचकांच्या अभ्यासकांच्या दृष्टीने दुर्बोध राहिले आहे. नव्या पिढीला तर या वारशाबाबत फारशी माहितीच नाही. लोकजीवनाच्या वेगवेगळ्या अंगाशी निगडित अशा ग्रामीण, दलित साहित्यातील शब्दांचा नेमका अर्थ सापडेल, असा शब्दकोश आज मराठीत सहज उपलब्ध होत नाही. या साहित्यात जे नवनवीन आणि अपरिचित शब्द मिळतात ते प्रमाण मराठीत येणे आवश्यक असल्याने असे शब्द विविध साहित्यकृतींमधून निवडून त्याचे अर्थ, व्याकरणाच्या तपशिलासह या कोशात दिले जाणार आहेत. यामध्ये विशिष्ट शब्द असलेले मूळ वाक्यही वाचकांच्या संदर्भासाठी त्या त्या नोंदीमध्येच दिलेले असेल.

आतापर्यंत सव्वादोन हजार पुस्तकांचा अभ्यास झाला असून, त्यातून तीस हजार शब्दांच्या नोंदी करून झाल्या आहेत. वाङ्मयातील पाच हजार पुस्तकांची प्राथमिक वर्णनात्मक सूची जवळपास तयार झाली आहे.

### * १७५ शाळा ग्रंथपाल पूर्णवेळ होणार

शिक्षण संचालकांनी नुकताच एक आदेश काढून १७५ पदांना पूर्णवेळ करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे आता राज्यातील एकूण पूर्णवेळ ग्रंथपालांची संख्या ४७७ होणार आहे. तर आणखीन ४७७ ग्रंथपाल न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

यापूर्वी राज्य शासनाने ३ ऑगस्ट २००६ रोजी एक आदेश देऊन चिपळूणकर समितीच्या निकषानुसार पात्र शाळांमधील ९२४ अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करावे, असे नमूद केले होते. परंतु या आदेशात १ एप्रिल २००६ पूर्वी ज्या शाळांची विद्यार्थी संख्या मागील तीन वर्षांत हजारांच्या वर आहे, अशा ग्रंथपालांनाच पूर्णवेळ करण्याचे आदेशात नमूद केले होते.

याबाबत वरिष्ठ पातळीवर चुकीची माहिती पुरविली गेल्यामुळे ९२४ अर्धवेळ ग्रंथपालांपैकी ३०२ ग्रंथपालांनाच पूर्णवेळ मान्यता देण्यात आली. या आदेशात १ एप्रिल २००६ पासून ज्या शाळांची विद्यार्थी संख्या मागील तीन वर्षांपासून हजारांच्या वर असावी, असा उल्लेख आहे. परंतु चिपळूणकर समिती व माध्यमिक शाळा संहिता १९८१ च्या तरतुदीनुसार १९९४ पासून पुढे एक हजारांची संख्या ओलांडलेल्या राज्यातील ४४७ शाळांतील अर्धवेळ ग्रंथपाल निकषानुसार पूर्णवेळ ठरतात. त्यामुळे विद्यार्थी संख्येची अट शिथिल करून या ४४७ अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ मान्यता द्यावी, अशी मागणी मराठवाडा शाळा ग्रंथपाल संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### * १९९२ पासून ५८० पत्रकार शहीद

जगभरातील पत्रकारांना असलेला धोका वरचेवर वाढत चालला असून २००६ मध्ये प्रत्यक्ष वार्तांकन करताना ५५ पत्रकार मरण पावल्याचे पत्रकारांच्या संरक्षणाशी

संबंधित एका समितीला आढळून आले आहे.

जगभरातील वृत्तपत्रस्वातंत्र्यास स्वत:ला वाहून घेतलेल्या या समितीचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे. या समितीचे दक्षिण आशियाशी संबंधित समन्वयक बॉब डायत्झ यांनी ही माहिती दिली. याच काळात अन्य २७ पत्रकारांचाही मृत्यू झाला आहे. त्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचा समितीतर्फे तपास सुरू आहे. अशा घटनांत २००५ मध्ये ४७ पत्रकार मरण पावले होते. ही आकडेवारी पाहता पत्रकारांना वाढलेल्या धोक्याची जाणीव झाली आहे.

प्रत्यक्ष काम करताना १९९२ पासून आतापर्यंत ५८० पेक्षा जास्त पत्रकार मरण पावले आहेत. यंदा मात्र या समितीने पत्रकारांवरील हल्ल्याचा सविस्तर तपशील ठेवण्यास प्रारंभ केला आहे. गेल्या पंधरा वर्षांत प्रथमच अशा प्रकारचा सर्वंकष अभ्यास केला गेला आहे. सरकार, लष्कर आणि विरोधी राजकीय कार्यकर्ते यांना न रुचलेल्या बातम्या प्रसिद्ध झाल्याबद्दल पत्रकार आणि संपादक यांच्या हत्या करण्यात आल्याचे या अभ्यासात निष्पन्न झाले आहे.

हे पत्रकार रणांगणावर चुकून गोळी किंवा तोफगोळा लागून मरण पावले नसून दहापैकी सात जणांना लक्ष्य करून ठार मारण्यात आल्याचे आढळून आले आहे.

विशेषत: युद्धांच्या बातम्यांचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांच्या बातम्या सरकार आणि लष्कर छाननी करून प्रसिद्ध करते. तरीही या पत्रकारांच्या हत्या होण्याचे प्रमाण वाढले आहे. सरकार आणि लष्करी अधिकारी कट रचून या हत्या घडवून आणत असल्याचे या समितीला दिसून आले आहे.

## पनवेल येथे ग्रंथमहोत्सव

कर्नाळा स्पोर्टस अ‍ॅकॅडमी व कोमसाप यांच्या सहकार्याने पनवेल येथील स्पोर्टस अ‍ॅकॅडमीच्या भव्य प्रांगणात पनवेल ग्रंथ महोत्सव दि. २७-२८ फेब्रुवारी आणि १-२ मार्च २००७ रोजी आयोजित करण्यात आला. आमदार विवेकानंद पाटील यांच्या प्रेरणेने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्कृती, ग्रंथदालन, नीता बुक एजन्सी, राजा प्रकाशन, साहित्यरुची, सेल्फ डेव्हलपमेंट बुक्स, बालाजी बुक्स एजन्सी, श्री समर्थ बुक एजन्सी, देशमाने एजन्सी वगैरे संस्थांचे स्टॉल होते. भव्य ग्रंथदिंडीने या महोत्सवाचा आरंभ झाला. अरुण टिकेकर यांच्या हस्ते उद्घाटन, वामन होवाळ यांचे कथाकथन, 'प्रलय' या नाटकाचा प्रयोग, परिसंवाद, विठ्ठल वाघ यांच्या अध्यक्षतेखाली झालेले कविसंमेलन वगैरे कार्यक्रमांमुळे हा महोत्सव लक्षवेधक ठरला. शंकर सारडा यांच्या अध्यक्षतेखाली 'सुसंस्कृत पिढी घडवण्यात ग्रंथांचे महत्त्व' हा परिसंवाद झाला. त्यात एल. बी. पाटील, नितीन आरेकर, प्रा. राम कुलकर्णी, प्रशांत देशमुख, राहुल सोनावणे यांचा सहभाग होता. ग्रंथमहोत्सव समितीचे अध्यक्ष एकनाथ मुंबईकर, सरचिटणीस जे. बी. म्हात्रे, कोषाध्यक्ष स्मिता गांधी, उपाध्यक्ष प्रार्थना सदावर्ते वगैरे कार्यकर्त्यांनी



हा महोत्सव यशस्वी व्हावा यासाठी परिश्रम घेतले.

## * ओडिसी इंडिया बुक स्टॉल

'डेक्कन क्रॉनिकल' या इंग्लिश दैनिकाने आंध्रप्रदेशात सात आवृत्त्यांद्वारे आणि चेन्नईत तीन लाख प्रतींचा टप्पा ओलांडून आपले प्रभुत्व प्रस्थापित केले आहे. डिसेंबर २००४ मध्ये या कंपनीचे बाजारातील मूल्य ६०० कोटी रुपये होते ते डिसेंबर २००६ मध्ये ४४०० कोटी रुपये झाले आहे. डेक्कन क्रॉनिकलचे संचालक टी. व्यंकट राम रेड्डी यांनी गेल्या वर्षी ओडिसी इंडिया या पुस्तकविक्री केंद्रांची चेन ६० कोटी रुपयांना विकत घेतली. एका वर्षात या चेनचे मूल्य ३०० कोटी रुपये म्हणजे पाचपट वाढले आहे. पुस्तकांची व्यापक वितरणव्यवस्था केली गेली, तर ग्रंथव्यवहारात झपाट्याने कशी वाढ होऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

## * अक्षरधारा वाचन-संवर्धन अभियान ट्रस्ट

अक्षरधाराच्या रमेश राठिवडेकर यांनी वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी अक्षरधारा वाचन संवर्धन अभियान ट्रस्ट स्थापन केला असून त्याचा शुभारंभ दि. १९ मार्च २००७ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर केला गेला. कविवर्य विं. दा. करंदीकर यांच्या शुभ हस्ते या ट्रस्टचे उद्घाटन झाले.

## * 'नॅशनल नॉलेज नेटवर्क'

देशभरातील सर्व विद्यापिठे, रुग्णालये, ग्रंथालये, वैद्यकिय संशोधन संस्था, कृषी संस्थांचे सामायिक ज्ञानजाळे 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' स्थापन करण्यास केंद्राने तत्त्वत: मान्यता दिली आहे. यासाठी एक अब्ज रुपये खर्च अपेक्षित आहे. वीस-पंचवीस वर्षांनंतर या प्रकल्पाची फळे प्रत्यक्षात दिसतील, असा आशावाद देशातील दूरसंपर्क क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या सॅम पित्रोदा यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे अध्यक्ष म्हणून पित्रोदांनी या नेटवर्कची सूचना केली होती, ती केंद्र सरकारने स्वीकारली आहे, अशी माहिती मुंबईत एका कार्यक्रमात त्यांनी दिली. यासाठी सरकारने मदत देऊ केली तरी त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर घेऊ नये, असे स्पष्ट केले. अर्थसहाय्य करणे ही एक बाजू असली तरी खासगी संस्थांचा सहभाग घ्यायला हरकत नाही. त्याचवेळी प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज असून त्याशिवाय आवश्यक तेवढा विकास साध्य होणार नाही, असे नमूद केले.

## * जपानी शिका : सहज, सुलभतेने!

जपान व भारत यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या प्रकल्पांमध्ये दिवसेंदिवस

वाढच होत आहे. पर्यटन व्यवसायातही जपानी भाषेचे महत्त्व निरंतर वाढते आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्रातून जपानी शिकणाऱ्यांची संख्या तब्बल २५०० पर्यंत पोचली, अशी माहिती २५ वर्षे जपानी भाषा शिकविणारे अ. भा. सोमण यांनी दिली.

जपानी भाषेचे प्रशिक्षण हॉटेल उद्योगात फार महत्त्वाचे ठरते. आयात-निर्यातीच्या कामांमध्येही ते उपयुक्त आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे अनेक जण भारतातून जपानमधल्या कंपन्यांची कामे करू शकतात. जपानीतून भारतीय भाषांमध्ये किंवा उलट प्रकाराने भाषांतराच्या संधीही सतत निर्माण होत असतात. दुभाषी म्हणून काम करण्यास मोठाच वाव आहे.

८ ते ८० वयापर्यंतची कोणीही व्यक्ती मराठी माध्यमाद्वारे जपानी भाषा शिकू शकते. कित्येकदा मराठी वाक्य लिहून नंतर मराठी शब्दांऐवजी जपानी शब्द लिहिले, तरी योग्य प्रकारे लिहिले जाते. हे प्रशिक्षण घरबसल्याही शक्य व्हावे. म्हणून सोमण यांनी 'सुलभ जपानी' हे पुस्तक लिहिले आहे. 'पूर्णिमा ॲण्ड कंपनी'द्वारे प्रकाशित हे पुस्तक ९८५०१८०४७८ या दूरध्वनीवर संपर्क साधून इच्छुकांना मिळविता येईल.

### * आकाशवाणी स्पर्धेत सुमंगला गोखले यांचे यश

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे 'इथे पुस्तके भेटतात' या दर गुरुवारी पुणे आकाशवाणीवर होणाऱ्या कार्यक्रमावर आधारित प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या सौ. सुमंगला गोखले या ग्रंथप्रसाराबाबतही खूप जागरुकपणे काम करीत आहेत.

त्यांना वाचनाची खूप आवड. राम केशव रानडे यांची 'माझी स्वप्ने' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले आणि त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलला. परमेश्वराने माणसाला दुसऱ्याची सेवा, प्रेम करण्यासाठी या जगात पाठवले आहे. प्रत्येकाने स्वत:चा संसार (कर्तव्य) पूर्ण झाल्यावर समाजासाठी काहीतरी केले पाहिजे; तसेच परमेश्वर प्रत्येक कुटुंबात एक 'आई' निर्माण करून तिच्यावर त्या कुटुंबाची सर्व जबाबदारी सोपवतो; कारण तो सगळे संसार सांभाळू शकत नाही. या विचारांनी त्यांच्या मनाची पकड घेतली आणि त्यांच्या मनात विचार आला, की आता 'आई' म्हणून देखील आपली जबाबदारी संपलेली आहे. तेव्हा आता समाजासाठी काहीतरी करून 'दुसऱ्याला देण्यातला आनंद' घेतला पाहिजे.

अनेक वृद्ध स्त्री-पुरुष असे आहेत, की ते घराबाहेर पडू शकत नाहीत; पण पुस्तके वाचून स्वत:चे मन रमवू शकतात; पण त्यांना पुस्तक बदलून आणून कोण देणार? म्हणून मग त्यांनी २००१ मध्ये 'सुमंगल वाचनालय' सुरू केले. वाचनालयाला वर्गणी नाही. पुण्यात वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या वृद्धांना त्या पुस्तके नेऊन देतात आणि प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे मार्गदर्शन करतात. त्यांच्याकडे



२०० सभासद आहेत. जे वृद्ध हिंदू फिरू शकतात, ते स्वत: पुस्तक बदलून आणतात. त्यांना सन २००२ मध्ये साईनाथ प्रतिष्ठानतर्फे, २००३ पुणे महानगरपालिकेतर्फे, तर २००४ मध्ये अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार मिळाले आहेत.

स्पर्धेतील यशाबद्दल त्यांचे अभिनंदन.

### * 'हॅरी पॉटर' : सातव्या पुस्तकाच्या सव्वाकोटी प्रती

जे. के. रोलिंग या जगप्रसिद्ध लेखिकेचे 'हॅरी पॉटर' मालिकेतील सातवे आणि शेवटचे पुस्तक आगामी जुलै महिन्यात बाजारात उपलब्ध होत आहे. या पुस्तकाचे नाव आहे 'हॅरी पॉटर ॲण्ड द डेथली हॅलोज'. या पुस्तकाच्या संदर्भात आधीच सर्वत्र भरपूर प्रचार झाला असल्याने असंख्य वाचकांकडून त्याची प्रतिक्षा केली जात आहे. या पुस्तकाच्या प्रती प्रथमच अमेरिकेत छापण्यात येणार असून त्यांची संख्या एक कोटी २० लाख असणार आहे.

एखादी पुस्तक मालिका वा पुस्तक लोकप्रिय झाले की त्याला वाचकांचा कसा उदंड प्रतिसाद मिळतो त्याचे 'हॅरी पॉटर' हे एक उत्तम उदाहरण आहे. २१ जुलैला 'हॅरी पॉटर'चा सातवा भाग अमेरिकेत प्रसिद्ध होत आहे. पुस्तकाच्या प्रसिद्धीस तीन-साडेतीन महिने बाकी असतानाच त्याची एवढी चर्चा सुरू झाली आहे.

### * सिडनीत मराठी मेळा

मराठी माणसे जगाच्या पाठीवर कुठेही गेली तरी मराठी मातीत रुजलेल्या काही गोष्टी विसरू शकत नाहीत. नाटकाचे आणि वाचनाचे प्रेम, ही अशीच एक गोष्ट! युरोप, अमेरिकेत स्थायिक झालेली मराठी मंडळी वर्षातून एकदा तरी 'संमेलन' भरवतात, नाटक करतात. याच पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियात स्थायिक झालेल्या मराठी मंडळींचेही संमेलन सहा ते आठ एप्रिलदरम्यान सिडनी येथे झाले. पुस्तकप्रेमी सिडनीकरांनी यानिमित्ताने पुण्याच्या 'रसिक साहित्य'कडे थेट सिडनीत मराठी पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्याची मागणी केली.

''मराठी कथासंग्रह, कथाकथन व नाटकांच्या सीडीज यांची मागणी प्रामुख्याने त्यांनी केली. तसेच ललित लेखन, चरित्रे यांचाही समावेश प्रदर्शनात होता.

बंगालीतील रवींद्रनाथ टागोर, शरच्चंद्र चटर्जी यांच्या अनुवादित साहित्यालाही सिडनीकरांची पसंती मिळते आहे. 'काबुलीवाल्याची बंगाली बायको' तसेच भैरप्पा यांच्या 'मंद्र' या पुस्तकाविषयी उत्सुकता आहे. 'ग्रीन ऑस्कर' मिळवणारे डॉ. आनंद कर्वे यांचे 'आधी बीज एकले' हे पुस्तकही चर्चेत आहे. या संमेलनाच्या निमित्ताने 'मराठी जगत विशेषांक'ही प्रकाशित करण्यात आला. त्यात यशस्वी मराठी मंडळींच्या मुलाखतींचा समावेश आहे.

## * आदिलशाहीतील फारसी फर्माने मराठीत

सतराव्या शतकातल्या विजापुरच्या आदिलशाहीची फर्माने ही फारसी भाषेतील शिकस्त लिपीत असल्यामुळे अभ्यासकांना तिचा म्हणावा तिका उपयोग करून घेता आलेला नाही. अशी एकंदर पन्नास फर्माने आता थेट मराठीमध्ये आणण्याचे काम इतिहासाचे अभ्यासक निनाद बेडेकर, शिवचरित्रकार गजानन मेहेंदळे, डॉ. रवींद्र लोणकर यांनी पूर्ण केले आहे. मराठीत अशा प्रकारचे काम प्रथमच होत असून लवकरच ते आता पुस्तकरूपानेही उपलब्ध होणार आहे.

यासंबंधी बोलताना बेडेकर म्हणाले की, भारत इतिहास संशोधन मंदिरात आदिलशाही फर्मानांचा मोठा खजिनाच आहे. फारसीतल्या शिकस्त लिपीचा अभ्यास नसल्यामुळे इतिहासाचे अनेक अभ्यासक या अस्सल फर्मानांमध्ये काय लिहिले आहे याबाबतीत अनभिज्ञ राहिले आहेत. सुरुवातीला पन्नास फर्माने निवडून या कामाला आम्ही तिघांनी सुरुवात केली व सलग चार वर्षांच्या परिश्रमानंतर हे काम पूर्णत्वाला आले. वाचलेल्या या फर्मानांचे स्वतंत्र फोटो काढून त्याचे पर्शियन भाषेतील मूळ मजकूरही पुस्तकामध्येही मुद्दाम आहे तसाच ठेवला आहे. त्याआधारेच सोबतच्या विस्तृत मराठी टीपा प्रत्येक फर्मानासोबत जोडल्या आहेत.

यानिमितने ओळीवार शिकस्त लिपीतले पर्शियन टेक्स्टचा अभ्यास करता येईल. तसेच त्याचा मराठी अन्वयार्थ कसा लावला आहे हेही शोधता येईलच पण त्यापेक्षाही आदिलशाही व्यवस्थापनाची अनेक अज्ञात अंगे दाखवणारी ही फर्माने नव्या माहितीवर तसेच नव्या संशोधनावरही प्रकाश टाकतील अशी आशाही बेडेकरांनी बोलून दाखवली.

## * डॉ. जवळगीकर लिहिताहेत 'वॉटर'च्या आठवणी

कॅनडातर्फे स्पर्धेत दाखल झालेल्या दीपा मेहतांच्या भारतीय 'वॉटर'ला ऑस्कर खेचून आणता आले नाही, तरी या चित्रपटामुळे भारतीयांची मान नक्कीच उंचावली. पण ऑस्करवारी करून आलेला हा चित्रपट पुणेकरांसाठी विशेष जिव्हाळ्याचा ठरणार असून दीपा मेहता, अभिनेते जॉन अब्राहिम, लिसा रे यांच्याप्रामाणेच या सिनेमातील वृद्ध विधवेची भूमिका साकारणाऱ्या पुणेकर अभिनेत्री डॉ. विदुला जवळगीकर यांचेही सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. चित्रपटाच्या अनुभवावर जवळगीकर यांनी 'मी आणि वॉटर' हे आत्मकथनपर पुस्तक लिहिले असून स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे प्रकाशित झाले.

औरंगाबाद येथील निवृत्त प्राध्यापिका डॉ. जवळगीकर यांनी यापूर्वी राजकुमार संतोषी यांच्या 'खाकी'मध्ये अमिताभ बच्चनबरोबर काम केले होते. जानेवारी २००४ मध्ये पुण्यामध्येच आपला इंटरव्ह्यू आणि फोटोसेशनही झाले. बालवयातच विधवा झालेल्या पतीराजी या ८० वर्षाच्या वृद्धेची आव्हानात्मक भूमिका मेहता यांनी आपल्याकडे सोपवली. आयुष्यातील सर्व प्रकारच्या आनंदापासून तोडले गेल्यामुळे निर्माण झालेले मन:स्थितीचे कंगोरे या भूमिकेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आव्हानात्मक भूमिकेमुळेच डोक्यावरील केस कापण्यासही आपण लगेच तयार झालो आणि पती यादव जवळगीकर यांनीही त्याला पाठिंबा दिला, असे त्या म्हणाल्या.

जॉन अब्राहिम, लिसा रे, छुईया अशा अभिनेत्यांप्रमाणे माझ्या छोट्या पण लक्षणीय भूमिकेस समीक्षकांनी दाद दिली. 'ऑस्कर'ला जाण्यापूर्वी गेल्या वर्षीच्या मुंबईतील 'मामी' महोत्सवात तसेच त्यापूर्वी टोरांटो आंतरराष्ट्रीय महोत्सवातूनही माझ्या कामाची दखल घेतली गेली, असे जवळगीकर यांनी सांगितले.

मराठी साहित्यात 'यमुनापर्यटन' या बाबी पद्मनजी आणि 'पण लक्षात कोण घेतो' या ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांमधून विधवांचा प्रश्न मांडला आहे. महात्मा फुले यांनी शंभर वर्षांपूर्वी पुण्यात तेव्हाही विधवांसाठी प्रसूतिगृह काढून एक मोठे धाडसच दाखवले होते. या अभ्यासाचाही जवळगीकरांनी त्यांच्या पुस्तकासाठी उपयोग केला आहे, असे स्नेहवर्धन प्रकाशनच्या स्नेहल तावरे म्हणाल्या.

## * 'पॉप्युलर बुक हाऊस'आता 'कोथरूड'मध्येही

'पॉप्युलर बुक हाऊस' या प्रसिद्ध पुस्तकविक्री केंद्राची कोथरूड शाखा गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नुकतीच सुरू करण्यात आली. पौड रोडवरील 'स्पेंन्सर्स' जवळ हे पुस्तक विक्री केंद्र उघडण्यात आले आहे.

गाजलेल्या मराठी, इंग्रजी व हिंदी पुस्तकांबरोबरच बालवाचकांसाठी स्वतंत्र दालन असणार आहे. मराठी सिनेमा, भावगीते, नाट्यगीतांच्या ऑडिओ सिडीज, व्हि.सी.डीज., डि.व्ही.डीज सह प्रत्यक्ष लेखकांच्या आवाजात लोकप्रिय पुस्तकांच्या सीडीज, कॅसेटस् उपलब्ध असणार आहेत. याबरोबर प्रथमच ई-बुक्स, ऑडिओ-बुक्स तसेच बुकऑन डिमांड अर्थात दुकानात उपलब्ध नसलेली पुस्तकही ग्राहकांच्या मागणीनुसार पुरवण्यात येतील.

लवकरच पुण्यातील औंध, निगडी, बिबवेवाडी, फातिमानगर या भागातही पॉप्युलर बुक हाऊसच्या शाखा सुरू करण्यात येत आहेत असे संचालक सुनील गाडगीळ यांनी सांगितले.

❒

विशेष वार्ता

# अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती' पुरस्कार सोहळा

प्रकाशकाने पुस्तकनिर्मितीबद्दल अधिक सर्जनशील, गंभीर व्हावे या दृष्टिकोनातून अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे दरवर्षी उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार दिले जातात. २००६ या वर्षीचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले व या पुरस्कारांचा वितरण सोहळा पुण्यातील पत्रकारभवनात गेल्या ३ मार्च रोजी पार पडला.

'कल्पना मुद्रणालया'चे चिं. स. तथा अण्णासाहेब लाटकर व ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अण्णासाहेब लाटकर यांनी संपूर्ण मुद्रणप्रक्रियेचा तसेच व्यवसायाचा आढावा घेतला. मुद्रणक्षेत्रातील पूर्वसूरींचा उल्लेख करून ते म्हणाले, 'कर्नाटक प्रेस'चे 'सोन्याबापू ढवळे', 'मौज'चे 'विष्णुपंत भागवत' तसेच 'निर्णयसागर प्रेस'चे 'रावजी राणोजी आरो' या ज्येष्ठांनी मुद्रणक्षेत्रात केलेली कामगिरी ही अपूर्व म्हणावी अशीच आहे.



**मान्यवरांकडून पुरस्कार स्वीकारताना मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. सुनील मेहता**



टाईपाच्या निवडीबाबत या व्यक्ती अतिशय दक्ष असत. तंत्रज्ञानात फारशी क्रांती झालेली नसतानाही यांनी ग्रंथमुद्रण क्षेत्रात आपल्या चोखंदळपणामुळे अमीट ठसा उमटवला.'

'पूर्वी ग्रंथमुद्रण हे एकछत्री होत असे, मात्र सध्या ते राहिले नाही, अशी खंत व्यक्त करून अण्णासाहेब म्हणाले, 'डी.टी.पी.चा शोध लागल्यानंतर गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मुद्रण व्यवसायात दुसरी क्रांती झाली, त्यानंतर मराठी पुस्तकांचा दर्जा वाढणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. डी.टी.पी.मुळे छपाईच्या दर्जाबाबत गांभीर्य राहत नाही. पूर्वी अक्षराच्या टाईपाची जशी अचूक निवड केली जायची तसा वाव या तंत्रज्ञानामुळे राहिला नाही.'

परदेशी प्रकाशकांच्या वाढत्या स्पर्धेचा आढावा घेताना ते म्हणाले, 'परदेशी प्रकाशकांमुळे स्पर्धा नक्कीच वाढली आहे. या गोष्टीचा परिणाम मराठी प्रकाशन व्यवसायावरही होईल. एक प्रकारचे संकुचन होण्याची भीती यामुळे निर्माण झाली आहे. सरकारकडून मुक्त व्यापार आणि व्यवसायाला प्रोत्साहन मिळत आहे. मात्र पाठ्यपुस्तकनिर्मिती क्षेत्राचा ताबा अजूनही सरकारकडेच असल्यामुळे या क्षेत्रात त्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. पूर्वी पाठ्यपुस्तकनिर्मितीचा व्यवसाय खासगी प्रकाशकांकडे होता, त्यामुळे प्रकाशक, मुद्रक आणि लेखकांची संख्या वाढली होती. मात्र सरकारच्या हस्तक्षेपामुळे मराठी प्रकाशनव्यवसायावर परिणाम झाला. सरकारची ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठी प्रकाशक संघाने दबाव आणावा, यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे,' असे मत त्यांनी मांडले.

ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे म्हणाले,'सध्याचे सामाजिक आणि राजकीय जीवन उद्ध्वस्त होण्यामागे 'सौंदर्यदृष्टीचा अभाव' ही बाजू काही प्रमाणात कारणीभूत आहे. कोणत्याही निर्मितीमागे जर सौंदर्यदृष्टी नसेल तर ती निर्मिती ॠक्ष ठरू शकेल आणि त्यात संवेदनशीलता राहणार नाही. पुस्तकनिर्मिती करताना प्रकाशकांनी या बाबीचा विचार जरूर करावा. लावण्य आणि सौंदर्य निर्मितीमूल्य वाढवते हेही लक्षात घ्यायला हवे. काही प्रकाशक याकडे गांभीर्याने पाहतात. हे गांभीर्य सर्व प्रकाशकांमध्ये असणे आवश्यक आहे.''

या कार्यक्रमात एकूण ११ प्रकाशकांना विविध वाङ्मयप्रकारासाठी १७ पुरस्कार देण्यात आले. पुरस्कारांकरिता परीक्षक म्हणून अविनाश पंडित, मुकुंद टांकसाळे तसेच मंदार ठाकूरदेसाई यांनी काम पाहिले. मुकुंद टांकसाळे यांनी पुरस्कारार्थ निवडलेल्या पुस्तकांची निरीक्षणे नोंदवली.

प्रकाशनसंस्था आणि पुरस्कारविजेते पुस्तक पुढीलप्रमाणे

| वाङ्मयप्रकार | प्रकाशनसंस्था | पुस्तक |
|---|---|---|
| ललित साहित्य (प्रथम) | मौज प्रकाशन | सिनेमाचे दिवस पुन्हा |
| ,, (द्वितीय) | मॅजेस्टिक प्रकाशन | सहप्रवासी |
| ललितेतर (प्रथम) | मॅजेस्टिक प्रकाशन | एक असतो बिल्डर |
| ,, (द्वितीय) | ग्रंथाली ज्ञानयज्ञ | ताठ कणा |
| संदर्भग्रंथ | श्रीविद्या प्रकाशन | अरण्यवाचन |
| उपयुक्त छंदविषयक (प्रथम) | रोहन प्रकाशन | योगासने मुलांसाठी |
| ,, (द्वितीय) | राजहंस प्रकाशन | नादवेध |
| प्रौढ वाङ्मय (प्रथम) | मौज प्रकाशन | इजिप्तायन |
| ,, (द्वितीय) | मेहता पब्लिशिंग हाऊस | केतकरवहिनी |
| विज्ञानविषयक (प्रथम) | कॉन्टिनेंटल प्रकाशन | लहरी हवा |
| ,, (द्वितीय) | राजहंस प्रकाशन | नभ आक्रमिले |
| शिशुसाहित्य | ज्योत्स्ना प्रकाशन | आमची शाळा |
| बालसाहित्य | मेहता पब्लिशिंग हाऊस | संपूर्ण संच (एकूण १८ पुस्तके) |
| कुमारसाहित्य | उर्जा प्रकाशन | डेनिसच्या गोष्टी |
| बोधचित्र | ज्योत्स्ना प्रकाशन | बागडणारी गाणी |
| प्रचार साहित्य (प्रथम) | रोहन प्रकाशन | लो कॅलरी खासियत |
| ,, (द्वितीय) | अभिजात प्रकाशन | आरोग्यं धनसंपदा |

***या सर्व प्रकाशनसंस्थांचे आणि संबंधित सहकाऱ्यांचे 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे हार्दिक अभिनंदन!***

❒





**प्रख्यात कन्नड लेखिका, इन्फोसिस फौंडेशनच्या अध्यक्षा 'सुधा मूर्ती' यांची १३ मार्च रोजी नाशिकच्या 'कालिदास कला मंदिरात' प्रकट मुलाखत झाली. 'पुण्यभूमी भारत या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशनही त्यानिमित्ताने झाले. 'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे आयोजित या कार्यक्रमास नाशिककरांनी अलोट, उत्स्फूर्त उपस्थिती लावली.**

**या मुलाखतीत सुधा मूर्तींनी आपल्या वाटचालीतील महत्वाच्या घटना, घडामोडींचा पट उलगडून दाखवला. यानिमित्ताने उपस्थित रसिक वाचकांना सुधा मूर्तींमधल्या सिद्धहस्त लेखिकेचे, दक्ष गृहिणीचे, प्रेमळ शिक्षिकेचे तसेच तळमळीच्या समाजसेविकेचे दर्शन घडले.**

**खास 'ग्रंथजगत'च्या वाचकांसाठी ही मुलाखत दोन भागात प्रस्तुत करत आहोत. त्या मुलाखतीतील हा पहिला भाग.**

**१. सुधाताई , तुमची मुलाखत ऐकण्यासाठी इतक्या प्रचंड संख्येने आलेल्या सर्व मराठी वाचकांना पाहून काय वाटलं?**

खूप आश्चर्य...! इतकी सर्व मंडळी इथे कशास आली..? मी काही ऐश्वर्या राय नाही. मनापासून सांगते... मराठी वाचकांमध्ये माझी पुस्तके इतकी लोकप्रिय असतील, त्यांना भावतील असे मला कधीच वाटले नाही. मराठी वाचकांच्या या उदंड प्रतिसादामुळे मी खरोखरच भारावून गेले आहे.

गेली २० वर्षे मी मराठीपासून दूर असल्याने माझ्या बोलण्यात तितकासा अस्खलितपणा नाही. मी मूळची धारवाडची असल्याने माझी मराठी कानडी वळणाची आहे. ही नाशकात,कोल्हापूरात किंवा इतरत्र चालू शकेल. मात्र पुण्यात चालणार नाही. एखाद्या प्रांताची संस्कृती जाणून घ्यायची असेल, त्याचा हिस्सा व्हायचं असेल तर त्या प्रांताची भाषा आली पाहिजे. त्या भाषेतील साहित्य जाणून घेता आले पाहिजे.तरच तुम्ही तेथील संस्कृतीशी समरस होवू शकता असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**३. पारंपारिक संस्कार, व्यवहारमूल्य जपणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबातून तुम्ही आलात; त्या काळात मुलीनं इंजिनियर होणं हे तसं अवघडचं; असं असूनही मी इंजिनिअरच होईन असा हट्ट तुम्ही का धरला?**

माझे वडील पेशाने डॉक्टर होते.सहाजिकच मी डॉक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा. ते म्हणाले 'तू डॉक्टर व्हावयास हवे, तू चांगली बोलतेस, चांगली expressive आहेस. पेशंट्सना चांगले हाताळू शकशील. पण मला मात्र मनापासून इंजिनिअरिंग फिल्ड आवडत होते. ही गोष्ट त्याकाळात फारशी व्यावहारिक नव्हती. १९६८ साली हुबळी सारख्या तेव्हाच्या लहान गावात ही बाब फारशी शक्य नव्हती. प्राचार्यांनाही मी इंजिनिअरिंग कॉलेजला प्रवेश घ्यावा ही गोष्ट फारशी रूचली नव्हती. कारण कॉलेजमध्ये लेडिज टॉयलेटही नव्हते.अगदी इथपासून सर्व गोष्टी adjest कराव्या लागणार होत्या.

मात्र आयुष्यात काही मिळवावयाचे असेल तर तुमच्या अंगी सहनशीलता, अविरत परिश्रमाची तयारी,प्रत्येक प्रसंगाशी सामोरे जाण्याचे धैर्य तसेच ध्येयाप्रती श्रद्धा असणं आवश्यक आहे.या सर्व गोष्टींसाठी आवश्यक असलेली मूल्यशिकवण मला आई-वडिलांकडून मिळाल्यामुळे मी माझ्या ध्येयाप्रत पोहचू शकले.

**४. आपल्या आणि श्री नारायणमूर्ती यांच्या यशामागे मध्यमवर्गीय मूल्संस्कारांचा हातभार आहे असे आपण म्हणता, मग या संदर्भात काही सांगाल?**

'मध्यमवर्गीय' ह्या शब्दाबाबत काही लोकांना विनाकारण तिटकारा वाटतो काही श्रीमंत मध्यमवर्गीय परिस्थितीतून जरी आले असले तरी ते कबूल करण्यास त्यांना काहीसा कमीपणा वाटतो. 'मध्यमवर्गीय असणे' ही खरे तर asset आहे. परस्परांविषयीचे प्रेम, आपुलकी, विश्वास, त्यागाची सहजभावना, कोणतीही गोष्ट वाटून घेण्याची, share करण्याची सवय लागलेली. या मूल्यांची जपणूक मध्यमवर्गातच होते.

आम्ही चार भावंडे. वडील एकटेच कमावणारे. त्यामुळे घरखर्च, शिक्षण, बचत, भविष्यासाठी तरतूद आदी गोष्टींची लहानपणापासूनच सवय लागली. स्वत:ला adjest करण्यासाठी सवय लागली. अर्थात पैसेही तितकेच आवश्यक असतात. पण पैशांमुळे काही आनंद विकत घेता येत नाही. धनवान असूनही संस्कारांचा पाया भक्कम असेल तर तुमचे पाय कायम जमिनीवर असतील. आम्हाला जे काही स्थान सध्या मिळाले आहे.ते केवळ याचं वैचारिक जडणघडणीतून. त्यामुळे आम्ही एका मध्यमवर्गीय घरातून आलो, मूल्यसंस्कारातून आलो याचा आम्हास कायम अभिमान राहील.

**५. तत्कालिन मध्यमवर्गीय व्यवस्थेतली एक मुलगी नोकरीच्या संदर्भात थेट जे. आर. डी. टाटांना पत्र लिहिते काय.. आणि जे. आर. डी. त्याची दखल घेतात काय.. हे सर्वच आश्चर्यजनक.! त्याबद्दल काहीसे सांगावे.**

१९७४ हे साल होते. 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ़ फ़ंडामेटल रिसर्च' मध्ये मी काही प्रोजेक्ट करत होते. नुकतीच MIT कॉलेजची स्कॉलरशिप मिळाली असल्याने अमेरीकेतील काही विद्यापिठात प्रवेश घेवून Computer Science मध्ये 'पीएच.डी.' करण्याचा विचार होता. मात्र सहज एकदा कॉलेजच्या नोटीस बोर्डवर 'टेल्को'ची जाहिरात पाहिली. इतर जाहिरातींसारखीच नोकरीची जाहिरात होती मात्र त्यातील शेवटच्या दोन ओळींनी माझ लक्ष वेधले. `Women students need not apply' हे वाचल्यानंतर मात्र मी चमकून गेले... हे असे का..? जाहिरातीतील त्या वाक्यामुळे काही दिवस विलक्षण अस्वस्थता वाटत होती.

तेव्हा तरुण होते.वय वर्ष २३.या वयात रक्त सळसळतं असतं. तशातच इन्स्टिट्यूटमध्ये जे.आर.डीं.ना दोन-तीनदा पाहिल्यामुळे यांनाच याचा जाब विचारणारे पत्र लिहावे असा विचार मनात आला आणि पत्र लिहिण्यास घेतले. मजकूर असा होता ---

'स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजतागायत देशाला एक सुस्थापित औद्योगिक घडी घालून देणारा, देशाच्या सर्वांगिण विकासाचा ध्यास घेतलेला, जवळपास सर्व संसाधनांच्या क्षेत्रात व्यापक कार्य उभारणारा हा उद्योग, स्त्रियांच्या संदर्भात असा भेदभाव का करतो..? हे चूक नाही का..? क्षमता असूनही केवळ स्त्रीत्वामुळे डावललं जाणं हे संबंधित संस्थेच्याही दृष्टीनेही अवमानास्पद नाही का...?

असे पत्र लिहून पाठवल्यानंतर मी माझ्या दैनंदिन कामास लागले. माझ्या पत्राची दखल घेतली जाईल असे वाटलेही नाही.माझी भावना कळवण्याचा उद्देश त्यामागे होता.

साधारणत: १५-२० दिवसांनी मला एक ट्रंककॉल आला.

मजकूर असा होता ` You should attend the final interview at Telco, Pune at our expance'.

मजकूर पाहून मला हायसे वाटले.कारण `at our expance' या शब्दांनी मला आकर्षित केले होते. त्यामुळे पुण्याला मुलाखतीसाठी जायचा निर्णय घेतला.

काही मैत्रिणींनी पुण्याला स्वस्तात साड्या मिळतात म्हणून 'येताना साड्या आण' म्हणून फर्माइश केली होती. लक्ष्मी रोडच्या कुंटे चौकाजवळच्या दुकानातून जवळपास वीसएक साड्या आणल्याचे मला आठवते.

तर अशा उद्देशाने मुलाखतीला निघालेली मी, चला बघू तरी काय होतंय म्हणून पुण्याला पोहोचले. टेल्कोच्या ऑफिसमध्ये जाताच लक्षात आले की

मुलाखतीसाठी केवळ मीच उमेदवार होते. इंटरव्ह्यू एकट्याचाच होता, पॅनलवर कुजबूज सुरू होती, टाटांना पत्र लिहीणारी हीच ती मुलगी.

मुलाखतीची औपचारिकता म्हणून माझ्या विषयाशी संबंधित बरीच तांत्रिक माहिती विचारली गेली. अर्थातच त्या विषयात गती असल्याने मी त्याची सर्व उत्तरे बरोबर दिली. मग ते मुळ मुद्यांकडे वळाले, म्हणाले, 'हे पहा मुली, Telco ही मुळातच Locomotive Company अर्थात अवजड वाहन तयार करणारी कंपनी आहे. त्यामुळे अर्थातच पुरुषप्रधान कामांना इथे जास्त वाव आहे. शिवाय पोस्टींग बिहारसारख्या राज्यात होणार असल्याने तुझ्या सुरक्षेचीही जबाबदारी आम्हाला घ्यावी लागेल. शिवाय रात्रपाळीतही काम येण्याची शक्यता आहे. यासर्व बाबींचा विचार करता मुलगी म्हणून तुला कामावर घेणे अवघड आहे. अर्थातच एखाद्या बुद्धिमान मुलाकडे असावे असे सर्व तांत्रिक कौशल्य तुझ्याकडे आहे मात्र याबाबतीत आमचा नाईलाज आहे.''

या त्यांच्या उत्तरानंतर मात्र मी त्यांना काही प्रतिप्रश्न केले. त्यांना विचारले, 'सर, आपण सर्व विवाहीत आहात का?' ते म्हणाले 'हो'. 'मग आपली पत्नी आपल्या समवेतच राहत असेल ना?' उत्तर आले 'हो, पत्नी समवेत असणारच.'

'मग माझ्या विवाहानंतर मी माझ्या पतीसमवेतच राहीन असे आपल्याला का वाटत नाही? शिवाय दुसऱ्या एखाद्या कंपनीने थोड्या जास्त पगाराची ऑफर दिली म्हणून पहिली कंपनी सोडून जाणाऱ्यांपैकीही मी नाही. केवळ एक स्त्री आहे म्हणून मला डावलले जाणं हे अयोग्य आहे असे आपणास वाटत नाही का?

अर्थातच माझ्या या युक्तीवादावर त्यांच्याकडे उत्तर नव्हते.

'आपणास विचार करुन कळवू.' असे मोघम उत्तर त्यांनी दिले आणि मी ऑफिसच्या बाहेर पडले.

हुबळीला, गावी परतल्यावर मी ही गोष्ट वडिलांच्या कानावर घातली अर्थातच ते रागावले, म्हणाले 'जेआरडीं सारख्या मोठ्या व्यक्तिला पत्र लिहीताना तू किमान सावधगिरी बाळगणे आवश्यक होते. पोस्टकार्डवर मजकूर लिहिण्यापेक्षा बंद लिफाफ्यात लिहीला असतास तर योग्य ठरला असता. 'तुम्ही चूक आहात' हे शब्द मोठ्या व्यक्तीला वापरणे अयोग्य. तरुणाईच्या जोषात तू घोडचूक केली आहेस. आता यदाकदाचित तुझी निवड झाली तर सामोऱ्या येणाऱ्या सर्व आव्हानांना तू तोंड दिले पाहिजेस.'

वडिलांच्या या उद्गारानंतर मी ही अंतर्मुख होऊन विचार केला 'ज्या कारणासाठी मी या सिस्टीमला जाब विचारला त्याचे फलित मिळाल्यास मी पुढच्या आव्हानांना सामोरे गेले पाहिजे. याबाबत मला खंत बाळगता कामा नये.

यथावकाश मला Telcoत जॉब मिळाला.



या सर्व प्रसंगाचं सार माझ्या लढ्यात वा मला मिळालेल्या यशात नसून जे. आर. डींच्या औदार्यात आहे. आपली चूक खुल्या दिलानं मान्य करुन एका अशा मुलीला जिची कुठलीही पूर्वओळख नाही, पैसा वा सामाजिक स्थान नाही तिला नोकरीवर घेणं हे जे.आर.डींच्या विशाल मनाचं औदार्यच म्हटलं पाहिजे

**६. जे.आर.डींना पत्र लिहून जाब विचारणारी ही धाडसी तेजस्विनी पुण्याला असताना एका अबोल, बुजऱ्या काहीशा अलिप्त राहणाऱ्या तरूणाच्या (नारायणमूर्तींच्या) प्रेमात कशी काय पडली?**

(काहीशा लाजून) 'अगदी सर्व ठिकाणी मला या प्रश्नाबाबत छेडण्यात येतं. वर्गात शिकवत असतानाही विद्यार्थी मूळ विषय बाजूला याबाबत विचारतात. इंटरनेटवरही आमच्याबाबत पहिल्या भेटीपासूनची सगळी कहाणी टाकण्यात आली आहे. माझ्या पुस्तकातही मी याबाबत विस्तृत भाष्य केले आहे, असो.

नारायणमूर्ती हे मूळ कर्नाटकातले. घर अतिशय साधं. वडीलांची नोकरी, पगार बेताचा.नारायणमूर्तींना आय.आय.टीत प्रवेश घ्यायचा होता.पण परिस्थितीमुळे शक्य झालं नाही.

वाचनाची, प्रवासाची नारायणमूर्तींना खूप आवड. टेल्कोतला माझा मित्र प्रसन्न आणि मी रोज टेल्कोत मिळून जात असू. प्रसन्नजवळ कायम कुठले ना कुठले पुस्तक असे. मी ते रोज येता-जाता वाचायची त्या पुस्तकांवर 'नारायणमूर्ती' इस्तंबूल, 'नारायणमूर्ती- पॅरिस, 'नारायणमूर्ती- पेशावर' असे लिहीलेले असायचे. माझे कुतूहल वाढले. मी प्रसन्नला म्हणाले, 'काय रे प्रसन्न, हा तुझा मित्र नारायणमूर्ती `International Bus Conductor' आहे काय?'
तो म्हणाला,'नाही. त्याला वाचनाची, प्रवासाची आवड आहे. बऱ्याच देशात फिरलेला आहे. माझाच रुम-पार्टनर आहे. कधी तरी भेट घालून देईन.'

यानंतर काही ना काही प्रसंगांमुळे नारायणमूर्तींशी प्रत्यक्ष परिचय वाढत गेला. आम्ही परस्परांकडे आकर्षित झालो. एक दिवस त्यांनी मला लग्नाची मागणी घातली, मी ती स्वीकारली. घरातून विरोधही झाला. पण तब्बल तीन वर्षांनी आमचे लग्न झाले. मला काहीजण विचारतात, 'तू मूर्तींमध्ये असे काय पाहिलेस की तू त्यांना निवडलेस?' खरंतर मलाच प्रश्न पडतो, 'जोडीदार निवडताना काय पहावे? त्याचं रूप, रंग पहावं? की जे काही काळानंतर नष्ट होणारं आहे? की त्याचा प्रामाणिकपणा, स्वभाववृत्ती पहावी, निष्ठा, विश्वास, की प्रेम पहावं,बुद्धीमत्ता पहावी? ज्याची खरी गरज आहे.

मला व्यक्तिशः असे वाटत होते की जो प्रामाणिक आहे, खुलून बोलणारा आहे, आणि जो बहुश्रुत, चौफेर वाचक आहे असा पती मिळावा. अर्थातच नारायणमूर्ती या सर्व बाबींना अनुकूल असल्याने मी त्यांना होकार दिला.

एक इथे सांगावसं वाटतं आमच्या दोघांचही पुस्तकांवर खूप प्रेम आहे. आज

नाराणमूर्तींची व्यक्तिगत ग्रंथसंग्रह दहा हजारांच्या घरात आहे. तर माझा पाच हजारांच्या घरात. मला नारायणमूर्तींचे एखादे पुस्तक आवडले तर मी वाचून त्यांच्या लायब्ररीत परत ठेवते. त्यांनाही एखादे माझ्या संग्रहातले पुस्तक आवडले तर ते वाचून परत करतात. परस्परांच्या पुस्तकांबाबत, त्यांना जपण्याबाबत आम्ही दोघेही दक्ष असतो. पुस्तक आवडले तर वाचून परत करतो. ते ठेवून घेत नाही. नारायणमूर्तींची वृत्तीच अध्ययनशील आहे. पैशापेक्षाही या वृत्तीचे मोल मला अधिक वाटले म्हणून मी त्यांच्याशी लग्न केले.

'न कांचनं न धनं न रूपं न यौवनं' या आयुष्यात ना पैसा, ना सोने, ना रुप, ना यौवनं या कोणत्याही गोष्टी कायम राहत नाहीत. राहतो तो परस्परांविषयीचा दृढ विश्वास आणि प्रेम. आपल्या तरुण मुला-मुलींनी हे कायम लक्षात ठेवावं असं मला वाटतं.

(क्रमशः)


## सुधा मूर्ती यांची पुस्तके

| | | मूल्य |
|---|---|---|
| वाइज अँड अदरवाइज | अनु. लीना सोहोनी | १५० |
| गोष्टी माणसांच्या | अनु. लीना सोहोनी | १३० |
| पुण्यभूमी भारत | अनु. लीना सोहोनी | १३० |
| महाश्वेता (कादंबरी) | अनु. उमा कुलकर्णी | १२० |
| डॉलर बहू (कादंबरी) | अनु. उमा कुलकर्णी | १२० |
| अस्तित्व (कादंबरी) | अनु. ए. आर. यार्दी | ८० |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **पोस्टेज खर्च वेगळा**



## नुकतेच.....




# मैत्र जिवाचे

**डॉ. भवान महाजन**

**१००रु.**
**पोस्टेज २०रु.**

*शरीर आजारग्रस्त असलं तरी मनांचं बहुरंगी दर्शन डॉक्टरला अगदी सहजासहजी घडतं. असहाय्य, दुर्बल शरीरात, तग धरून असलेलं मनं, अस्थिपंजर स्थितीतही जपलेल्या अदम्य इच्छा, अशा विविध प्रत्यय देणाऱ्या घटनांचे चलत्‌चित्र डॉक्टरांसमोर सदैव सुरू असते.*

*एका नामवंत शल्यचिकित्सकाच्या या अशाच काही आठवणी .... संवेदनशीलतेनं रोग्यांची ही स्मरणचित्रं वास्तवाला धक्का न लावता चितारली आहेत.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





## मराठी नवकादंबरीचे अग्रदूत : श्री. ना. पेंडसे

गुढीपाडवा दि. १९ मार्च रोजी टिळक स्मारक मंदिरात 'हाक आभाळाची' या श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीचे प्रकाशन कविवर्य विंदा करंदीकर यांच्या हस्ते झाले. वयाच्या ९४व्या वर्षी श्रीनांनी लिहिलेली ही कादंबरी - हे एक आश्चर्यच! त्यावेळी ते स्वत: उपस्थित राहू शकले नाहीत म्हणून चित्रफितीद्वारे त्यांचे मनोगत दाखवण्यात, ऐकवण्यात आले. लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर कादंबरी हे एक आव्हानच, ते त्यांनी कसे झेलले याबद्दल त्यांनी आपली भूमिका मांडली. त्यानंतर तीन-चार दिवसांनी म्हणजे दि. २३ मार्च रोजी त्यांच्या निधनाची बातमी आली. त्यामुळे अधिकच हळहळ वाटली.

मराठीत नवकथा व नवकाव्य या संकल्पनांचा एकोणिसशे पन्नासच्या आगेमागे मोठाच दबदबा होता. त्यांचे पुरस्कर्ते मोजकेच होते; पण विरोधक भयंकर आक्रमक होते. नवकथा-नवकाव्य हे दुर्बोध, बिंदुस्त्रावी, क्षणजीवी, अश्लील, बीभत्स आहे, शब्दांची, शैलीची तोडफोड करणारे आहे, वगैरे आरोप त्यावेळी सर्रास केले जात. कथेशिवाय कथा, वृत्त-जाती-छंद यमक याशिवाय काव्यरचना करण्याचा हा प्रयत्न कुचेष्टेचा विषयही बनवला गेला. त्या तुलनेने नवकादंबरी असा काही प्रकार रूढ झाला नाही. खरे तर श्री. ना. पेंडसे यांनी १९४९ मध्ये लिहिलेली 'एल्गार' ही हिंदु-मुसलमान दंग्यावरील कादंबरी, १९५० मध्ये प्रसिद्ध झालेली 'हद्दपार' ही शिक्षकाच्या जीवनावरची कादंबरी, आणि १९५२ मध्ये सर्व वाचकांचे लक्ष वेधून घेणारी 'गारंबीचा बापू' ही कादंबरी यांना 'नवकादंबरी' म्हणून एक 'नव्या' लेखनदालनाचे पुढारपण श्री. ना. पेंडसे यांना मिरवता आले असते; परंतु 'गारंबीच्या बापू'ने खांडेकर-फडके यांच्याच कादंबरीचे एक नवे रूप वाचकांपुढे ठेवले असे त्यावेळच्या बहुतेक रसिकांनी व समीक्षकांनी मानले आणि 'गारंबीच्या बापूचे' कौतुक केले. गंगाधर गाडगीळ यांनी अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर आणि पु. भा. भावे यांसारख्या भिन्न भिन्न प्रकृती-प्रवृत्तीच्या कथाकारांना जवळ घेऊन 'नवकथाकार' चौकूटाचा गाजावाजा सुरू केला; त्याला



समीक्षकात्मक अधिष्ठान व वेगळेपण दिले. मर्ढेकर, य. द. भावे, शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी नवकाव्याची ध्वजा उंच उभारली; तसे श्री. ना. पेंडसे (एल्गार, हद्दपार, गारंबीचा बापू) गो. नी. दांडेकर (शितु,पडघवली), विभावरी शिरूरकर (बळी), बा. भ. बोरकर (भाळीण), वसंत कानेटकर (घर), श्री. रा. बिवलकर (शुभा, सुनीता), मर्ढेकर (पाणी, रात्रीचा दिवस), व्यंकटेश माडगूळकर (बनगरवाडी), या सर्वांना एकत्र गुंफून नवकादंबरीचा सवता सुभा त्यावेळी प्रस्थापित होऊ शकला असता. गंगाधर गाडगीळ किंवा मर्ढेकर यांच्यासारखा



एखादा समर्थ, आक्रमक समीक्षक कादंबरीला त्यावेळी लाभला असता तर नवकाव्य, नवकथा यांच्या पंक्तीतच नवकादंबरीलाही एक वेगळी ओळख मिळाली असती. अर्थात अशा वाङ्मयीन चळवळी वा लेबले एकदोन दशकांपुरताच आपला दिमाख दाखवू शकतात; पुढे त्यांची धार कमी होऊ लागते; नवीन कुठलातरी प्रतिभावंत या चळवळींना धक्का देऊन नव्या दालनाचा उद्घोष सुरू करतो.

श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीमुळे मराठी कादंबरी नव्याने कलात्मक होऊ लागली. आणि तिच्या आकलनात निर्भेळपणा, स्वयंभूपणा दिसू लागला. महायुद्धोत्तर काळातले सर्वात मोठे व महत्त्वाचे प्रतिनिधी म्हणून श्री. ना. पेंडसे यांचचं नाव समोर येत असे. साक्षेपी समीक्षक प्रा. नरहर कुरुंदकर यांनी आपल्या 'धार आणि काठ' या ग्रंथात 'कथानकाच्या चौकटीतून मोकळी झालेली पहिलीच कादंबरी' असा त्यांनी 'गारंबीचा बापू'या कादंबरीचा विशेष सांगितला आहे.

'निसर्गवर्णने आणि प्रादेशिकता हे जणू स्वतंत्र कलामूल्य आहे आणि प्रादेशिक उर्फ ग्रामीण कादंबरी हा ऐसपैस करता येण्याजोगा प्रकार आहे.' असा ग्रह त्यावेळी तेजीत होता... नवकथा-नवकाव्य यांनी जीवनाच्या दर्शनाला जे गुंतागुंतीचे आणि चिंतनाचे परिमाण दिलेले होते, त्यात शिरण्याचा प्रयत्न न करता प्रादेशिकतेवर, ग्रामीण वातावरण आणि निसर्ग चित्रण यावर भर देऊन पेंडसे यांच्यावर मात करण्याची जिद्द काही कादंबरीकारांनी दाखवली; त्यामुळे 'नवकादंबरी' असे समृद्ध दालन होण्याच्या प्रक्रियेला खीळ बसली असे कुरुंदकरांनी सूचित केले आहे.

खरे तर या कादंबरीचे वेगळेपण अधोरेखित करण्याचे काम श्री. ना. पेंडसे यांनी त्यावेळी करता आले असते. गंगाधर गाडगीळ, मर्ढेकर, य. द. भावे,

मुक्तिबोध यांनी समीक्षात्मक लेखनाद्वारे आपल्या योगदानाचे वेगळेपण दाखवण्याचा चंग बांधला. तसे श्री. ना. पेंडसे यांनी त्यावेळी केले नाही. नंतर चाळीस वर्षांनी ते काम त्यांनी केले. नवोदित कादंबरीकारांशी एक मुक्त संवाद साधण्याच्या निमित्ताने. कादंबरी या वाङ्मय प्रकाराची आपल्या परीने एक सर्वंकष चिकित्सा त्यांनी या मुक्तसंवादाच्या माध्यमांतून केली आहे. डोस्टोवस्की हा त्यांना सर्वात मोठा कादंबरीकार वाटतो; आणि 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक कादंबरीच्या रूपाने श्री. ना. पेंडसे यांनी डोस्टोवस्कीच्या 'दि ब्रदर्स कारामाझव्ह' या कादंबरीच्या जवळ जाण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न केला आहे. तुंबाडचे खोत ही १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली कादंबरी १४०० पृष्ठांची असून १८४८ ते १९४८ अशा शंभर वर्षाच्या काळातील तुंबाडच्या खोत घराण्याच्या चार पिढ्यांतील घटना क्रमाची नोंद घेणारी नाट्यपूर्ण कहाणी पेश करते. श्री. ना. पेंडसे यांची वयाच्या पंचाहत्तरीत ही प्रचंड कादंबरी लिहावी हेच एक अप्रूप आहे. या कादंबरीचे स्वागत तितक्याच अपूर्वाईने व्हायला हवे होते; परंतु तिच्यावर नामवंतांनी टीकाच जास्त केली. त्यामुळे पेंडसे नाऊमेद झाले असे नाही. त्यांची लेखणी चालूच राहिली. गारंबीची राधा (१९९३), एक होती आजी (१९९५), कामेरू (१९९७), या त्यांच्या कादंबऱ्याही ऐंशीच्या टप्प्यावरच्या आहेत. तेवढ्यावरच पेंडसे थांबले नाहीत. परवा १९ मार्च रोजी गुढी पाडव्याला त्यांच्या 'हाक आभाळाची' या कादंबरीचे प्रकाशन झाले. ९५ व्या वर्षी लिहिली गेलेली ही कादंबरी लोकमान्य टिळकांच्या जीवनाचा एक वेगळाच अन्वयार्थ लावणारी आणि लोकमान्य आणि महात्मा गांधी यांच्या जीवनप्रेरणातील तसेच राजकीय कार्यपद्धतीतील मूलभूत भेद स्पष्ट करणारी आहे. लोकमान्यांच्या आयुष्यातील दोन खटल्यांच्या कालखंड घेऊन त्यांच्या एकूण जीवनकार्याला त्याद्वारे समर्थपणे गवसणी घालण्याचा हा प्रयत्न अंतर्वेधक आहे. डोस्टोवस्कीच्या जवळपास जाणारा आहे.

श्री. ना. पेंडसे यांच्या लेखनात कोकण आणि मुंबई या दोन भूप्रदेशांना केंद्रस्थान आहे. एल्गार (१९४९), हद्दपार (१९५०), गारंबीचा बापू (१९५२), हत्या (१९५४), यांना कोकणची पार्श्वभूमी आहे. 'रथचक्र' (१९६२) या कादंबरीतील कृष्णाबाई ही व्यक्तिरेखा त्यावेळी खळबळ माजवणारी ठरली. याच कादंबरीला साहित्य अकादमीचा १९६३ चा पुरस्कार मिळाला. वासनेची अतृप्ती दूर करण्यासाठी रथचक्रमधील कृष्णाबाई गारंबीच्या यशोदेप्रमाणे कोणाशीही जवळीक करीत नाही; रतिसुखासाठी परपुरुषाकडे मन वळवत नाही, तिच्या निबरपणात व्यवहारीपणा आहे; नवरा बारा वर्षांनी घरी परत येतो. तेव्हा त्याच्या साधुत्वाची, साधनेची सारे गावकरी पूजा बांधतात; त्याच्या पुण्याईची सावली कृष्णाबाईवर सातत्याने असल्याची भावनाही गावकरी जपतात. कृष्णाबाईच्या व्यक्तिमत्त्वातले दुभंगलेपणही पेंडसे दाखवू पाहतात. 'रथचक्र'च्या पुरस्कारामुळे कृष्णाबाईच्या संदर्भातील वादळ फारसे



झंझावाती ठरले नाही हे नक्की!

'रथचक्र'नंतर पेंडसे मुंबई महानगराच्या व्यामिश्रतेकडे वळले. 'बेस्ट'मध्ये ते १९४२ पासून नोकरीला होते. १९६८ साली सेवानिवृत्त झाले. मुंबईच्या बहुढंगी जीवनाची नाना रूपे त्यांनी न्याहाळली. लव्हाळी (१९६६), ऑक्टोपस (१९७२) या कादंबऱ्यांमध्ये मुंबईची वेगवेगळी सांस्कृतिक-सामाजिक रूपे ते दाखवतात, लव्हाळी ही केवळ डायरीतल्या नोंदीतून उभी राहते तर ऑक्टोपस केवळ पात्रांच्या संवादातून साकार होते. तंत्रविषयक प्रयोगांचे आकर्षण पेंडसे यांना अखेरपर्यंत वाटत होते.


त्यानंतर दीर्घकाळ पेंडसे यांचे लेखन जणू थांबलेले होते. डोस्टोवस्कीसारखे काहीतरी हातून लिहून व्हावे ही ओढ त्यांना अस्वस्थ करीत होती. 'तुंबाडचे खोत'द्वारे ती इच्छा त्यांनी प्रत्यक्षात आणली. त्या दरम्यान 'लेखक आणि माणूस' हे आत्मचरित्रात्मक लेखन त्यांच्या हातून झाले. आपला परिसर, आपले जीवन आणि आपले लेखन यांची नाळ तपासून बघण्याचा हा प्रांजल शोध होता. गारंबीची राधा, एक होती आजी, कामेरू या त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्या जुन्या विषयांनाच नवे परिमाण देऊ पाहत होत्या. त्यांत नवे व वेगळे असे काही नव्हते. ऐंशी- नव्वदीच्या घरात असूनही पेंडसे लिहीत राहिले याचेच काहीसे आश्चर्य आणि कौतुक वाटत होते.

'हाक आभाळाची ' या कादंबरीच्या रूपाने आपल्या उतारवयातील प्रतिभेचे दर्शन त्यांनी घडवले-वयाच्या ९५व्या वर्षी एखाद्या कादंबरीकाराची नवी वेगळ्या विषयावर कादंबरी प्रसिद्ध व्हावी- ही गिनेस बुक मध्ये नोंदवण्यासारखीच घटना आहे.

श्री. ना. पेंडसे यांच्या निधनाने मराठी कादंबरीला, प्रादेशिक चित्रणाला एक नवे वळण देणारा प्रतिभावंत हरपला आहे. मराठी कादंबरीक्षेत्रातील त्यांची नाममुद्रा अखंड तळपत राहील.

**शंकर सारडा**
ई-१० पाटील रिजन्सी
१५ एरंडवणे, पुणे ४
फोन : २५४२२२२३/९८२३२६१०२३

**पुस्तक परिचय**




## वाजपेयी मंत्रिमंडळाच्या काळातील उच्चस्तरीय राजकारणाचे अंतःस्थ

# ए कॉल टू ऑनर

**जसवंतसिंग**

**अनु. अशोक पाध्ये**

राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना सत्तास्थानावरून अनेक पेचप्रसंगांना तोंड द्यावे लागते आणि त्यावेळी त्यांच्या नेतृत्वगुणांचा, धैर्यधाडसाचा, वैयक्तिक सचोटीचा कस लागतो. प्रतिकूल वातावरण असताना विरोधाची धार बोथट करीत देशहिताच्या दृष्टीने काही निर्णय घेऊन ते राबवावे लागतात; त्यात यश आले, ते यश मिळेपर्यंत त्या सत्तापदावर राहता आले तर त्याचा दबदबा वाढतो; त्याचा पुढचा मार्ग सुकर होतो; नाहीतर त्याने केलेल्या कार्याचा लोकांना विसर पडायला वेळ लागत नाही. नेतृत्वाला काळाचा संदर्भ असतो; विशिष्ट काळात विशिष्ट नेतृत्वगुणांची गरज असते. बांगलादेशमधील मुक्तिवाहिनीच्या उठावामुळे पूर्व बंगालमध्ये बांगलादेशीय निर्वासितांचे लोंढे येऊ लागले; तेव्हा बांगलादेशच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतीय सैन्याला मुक्तिवाहिनीच्या मदतीला पाठवले आणि पाकिस्तानला धडा शिकवला. इंदिराजींच्या नेतृत्वाच्या कसोटीचा हा एक भव्योदात्त क्षण होता. पुढे बांगलादेशने भारताबाबत कृतज्ञता दाखवली नाही किंवा पाकिस्ताननेही अतिरेक्यांमार्फत भारताला त्रास देणे थांबवले नाही, हे खरे असले तरी काळाच्या त्या विशिष्ट टप्प्यावर इंदिराजींनी जो निर्णय घेतला, तो त्यांच्या नेतृत्वाचा कणखरपणा प्रकट करणारा होता यात शंकाच नाही... अशा कसोटीच्या क्षणांबद्दल संबंधित व्यक्तींनी काही लिहिले तर ते वस्तुस्थितीची नेमकी कल्पना देणारे ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महत्त्वपूर्ण ठरते... राजकीय नेत्यांनी आपल्या जीवनातील अशा घटनाप्रसंगांबद्दल लिहून भावी इतिहासकारांची सोय करणे ही काळाची एक गरज असते. दुर्दैवाने आपल्याकडे राजकीय व्यक्ती फारसे लिहीत नाहीत. पी. व्ही. नरसिंहराव यांच्यासारख्या लेखनाचे अंग असणाऱ्या



व्यक्तीलाही सरळ सरळ आत्मचरित्र लिहिण्याऐवजी 'अन्तःस्थ' (इनसायडर) सारखी 'कादंबरी' लिहून अत्यंत सावधपणे आपल्या जीवनाबद्दल लिहावे लागते. अनेक राजकीय नेते आपली आत्मकथने लिहितात; परंतु स्वसमर्थन करण्याच्या नादात, वादग्रस्त बाबींवर एकांगी लिहितात किंवा अडचणीत आणणारे प्रसंग व उल्लेख टाळतात. तरीही राजकीय नेत्यांनी आपल्या जीवनातील घटनाप्रसंगांवर लिहीत राहावे असा आग्रह धरायलाच हवा.

'ए कॉल टू ऑनर' या माजी केंद्रीय मंत्री जसवंतसिंग यांच्या आत्मकथनाचे म्हणूनच स्वागत करायला हवे. मूळ इंग्रजीतले हे पुस्तक बेस्टसेलर ठरले; आता ते मराठीत आले आहे.

भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने १९९८ ते २००४ या सहा वर्षांत भारतावर राज्य केले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणखाते, परराष्ट्रखाते आणि अर्थखाते यांचा कारभार पाहण्याची संधी जसवंतसिंग यांना मिळाली.

**भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने १९९८ ते २००४ या सहा वर्षांत भारतावर राज्य केले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणखाते, परराष्ट्रखाते आणि अर्थखाते यांचा कारभार पाहण्याची**

या कालावधीत अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. पोखरण येथे भारताने केलेल्या अणुस्फोटामुळे उद्भवलेला पेचप्रसंग, अमेरिकेने भारतावर लादलेले आर्थिक निर्बंध (मे १९९८), कारगिलवर पाकिस्तानी घुसखोरांनी केलेले आक्रमण (१ मे १९९९), जम्मूकाश्मीर विधानसभेवर अतिरेक्यांचा हल्ला (१ ऑक्टोबर २००१), संसदभवनावर दहशतवाद्यांचा हल्ला (डिसेंबर २००१), आग्रा येथील मुशर्रफ-वाजपेयी बैठक (जुलै २००१), कालचुक कँपवर अतिरेक्यांचा हल्ला (२००२), जबरदस्त भूकंप (२००१), तीस वर्षांतील सर्वात भयंकर दुष्काळ (२००२ व २००३), दुसऱ्या गल्फ युद्धामुळे उद्भवलेली खनिज तेलाची टंचाई (२००३) अशा आपत्तींशी सामना करीत रालोआ सरकारने आधीच्या पी. व्ही. नरसिंहराव सरकारने सुरू केलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना देत, टेलिकॉम, इन्फोटेक क्षेत्राचा विकास केला. परकीय चलनाच्या साठ्यात भर घातली, राष्ट्रीय उत्पन्न निर्देशांक ८.४ वर नेला. परराष्ट्रीय धोरणालाही नवी दिशा दिली. पाकिस्तानशी संबंध सुधारण्याकरिता

**पाकिस्तान, चीन, अमेरिका या तीन देशांबरोबरच्या आपल्या संबंधांतील अनेक आणीबाणीचे आणि कसोटीचे प्रसंग या सहा वर्षांत आले आणि त्यात असणारी कोंडी फोडण्यात जसवंतसिंग यांना आपल्या सत्तास्थानाबरोबर**

लाहोरपर्यंत बस सुरू केली. समझोता एक्सप्रेसही दिल्लीहून धावू लागली.

यातील अनेक घटनांशी जसवंतसिंग यांचा जवळून संबंध आला होता आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग होता. कारण संरक्षणखाते, परराष्ट्रखाते आणि अर्थखाते यांच्याशी ते संबंधित होते. 'ए कॉल टू ऑनर'मध्ये वर दिलेल्या अनेक घटनांच्या संदर्भातील आतल्या गोटातल्या हालचालींची माहिती आपल्याला वाचायला मिळते आणि गेल्या दहा वर्षांत इतिहासातील अनेक क्रांतिकारक घटनांची पार्श्वभूमी आपल्या ध्यानात येते.

सकृत्दर्शनी चमत्कारिक आणि अव्यावहारिक वाटणाऱ्या कंदाहार विमान अपहरण प्रकरणासारख्या घटनांच्या वेळी त्यावेळच्या सरकारच्या कृतीमागची विचारधारा वा अगतिकता या पुस्तकावरून उलगडत जाते आणि राजकीय निर्णयप्रक्रियेतील वेगवेगळे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ताणतणाव स्पष्ट होतात. या दृष्टीने या पुस्तकातील उत्तरार्ध फारच महत्त्वाचा आहे.

पाकिस्तान, चीन, अमेरिका या तीन देशांबरोबरच्या आपल्या संबंधांतील अनेक आणीबाणीचे आणि कसोटीचे प्रसंग या सहा वर्षांत आले आणि त्यात असणारी कोंडी फोडण्यात जसवंतसिंग यांना आपल्या सत्तास्थानाबरोबर आपल्या वैयक्तिक चांगुलपणाचा आणि चातुर्याचाही वापर करावा लागला. नेत्यांचे खाजगीतले वर्तन आणि व्यासपीठावरील वर्तन वा वक्तव्य यातील फरकही स्तिमित करणारा असतो. जसवंतसिंग यांनी पाकिस्तानचे त्यावेळचे पंतप्रधान नवाज शरीफ यांचा या संदर्भात उल्लेख केला आहे.(२४६)

राजकीय कोंडी फुटायला काही वेळा साध्या घटनाही निमित्तमात्र होतात. १५ सप्टेंबर १९९८ रोजी युनोच्या ५३ व्या वार्षिक अधिवेशनाला अटलबिहारी वाजपेयी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ उपस्थित होते. २३ सप्टेंबरला हे दोघे दुपारच्या खान्यासाठी एकत्र आले. त्यावेळी नवाझ शरीफ यांनी १९८२ मध्ये भारताला दिलेल्या भेटीच्या आठवणी सांगितल्या. एशियन गेम्स बघण्यासाठी ते आले होते. दिल्लीत त्यावेळी आपण कार चालवत होतो, कारने आग्रा येथे गेलो होतो असे त्यांनी म्हटले; तेव्हा परराष्ट्र खात्यातील एक अधिकारी म्हणाला, ''मग लाहोर-दिल्ली बससेवा सुरू करायला काय हरकत आहे?'' तेव्हा नवाझ



**''आम्ही राजनैतिक कुशलतेने हा संघर्ष युनोच्या सुरक्षा परिषदेकडे जाऊ नये म्हणून धडपडत होतो... या संघर्षात पाकिस्तानची चूक आहे हे अमेरिकेने प्रथमच मान्य केले'' असे जसवंतसिंग म्हणतात. (२८७) या युद्धात व्यूहात्मक**

शरीफ भावनावश होऊन म्हणाले, ''एके काळी तसेही होते. गेले ते दिवस.'' त्यावर परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग म्हणाले, ''दिल्ली ते लाहोर अशी बससेवा तुम्ही सुरू का करीत नाही?'' ती कल्पना नवाझ शरीफ यांना पसंत पडली... वाजपेयींनी पुढे घोडे दामटत विचारले, ''याबाबत काय पाऊल उचलायचे?'' पुढे परराष्ट्रमंत्री म्हणून जसवंतसिंग यांनी ह्या कल्पनेचा पाठपुरावा केला. फेब्रुवारी १९९९ मध्ये ही बससेवा सुरू झाली. त्यावेळी वाजपेयी त्या बसने अमृतसरहून लाहोरला गेले. २१ फेब्रुवारीला लाहोर डिक्लेरेशन या द्विपक्षीय कराराची घोषणा झाली... ''दक्षिण आशियाच्या इतिहासातील हा एक संस्मरणीय क्षण आहे... एकवीस वर्षांनी मी पाकिस्तानी भूमीवर पाऊल ठेवले आहे... दोन्ही देशांच्या संदर्भातील सर्व प्रश्न.... हिंसा टाळूनही... सुटू शकतील यावर माझा पूर्ण विश्वास आहे'' असे उद्गार वाजपेयींनी काढले.

मेजवानीच्या वेळच्या आठवणीतून परस्पर संबंधांतील एक तिढा सहजपणे सुटला याचे हे एक उदाहरण!

एप्रिल १९९९ मध्ये वाजपेयी सरकार कोसळले... पुन्हा लगेच ते सत्तेवर आले...

त्याचवेळी पाकिस्तानी घुसखोरांनी कारगिल भागात धुमाकूळ घातला. २३ मे रोजी जसवंतसिंग यांनी मध्य आशिया, रशिया व फ्रान्स यांना भेटी देऊन भारताची भूमिका समजावून दिली. त्यावेळी संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस होते. १२ जून रोजी जसवंतसिंग चीनला गेले. २० जूनला नागा रेजिमेंटने पिरॅमिड व थम्सअप ही शिखरे जिंकली... पाकचा पराभव अटळ ठरला. पाकिस्तानला पळवाट मिळावी म्हणून नवाझ शरीफना क्लिंटनने भेटीसाठी बोलावले. ९ जुलैला पाकिस्तानने माघार घेण्यास सुरुवात केली... यावेळी भारताने एक इंचही भूमी गमावली नाही; परंतु पाक दहशतवाद्यांची घुसखोरी थांबवण्यात मात्र भारताला यश आले . कारगिल प्रकरणाने दोन महिने देशातील वातावरण प्रक्षुब्ध राहिले. 'आम्ही राजनैतिक कुशलतेने हा संघर्ष युनोच्या सुरक्षा परिषदेकडे जाऊ नये म्हणून धडपडत होतो... या संघर्षात पाकिस्तानची चूक आहे हे अमेरिकेने प्रथमच मान्य केले' असे जसवंतसिंग म्हणतात. (२८७) या युद्धात व्यूहात्मक

**पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांना दूर करून जनरल मुशर्रफ यांनी सत्ता मिळवली. त्यांच्याशी १४ ते १६ जुलै दरम्यान आग्रा येथे भारत-पाक बैठक झाली. या बैठकीनंतर संयुक्त पत्रक निघायचे ते निघालेच नाही.**

आणि राजनैतिकदृष्ट्या भारताची प्रतिमा उजळली... पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांना अज्ञानात ठेवून जनरल मुशर्रफने सर्व सूत्रे हलवली आणि नंतर नवाझ शरीफ यांना पदच्युत करून आपल्या हाती सर्व सत्ता एकवटली– हा पुढचा घटनाक्रम...

२४ डिसेंबर १९९९ रोजी इंडियन एअरलाइन्सच्या फ्लाइट क्र. ८१४ चे अपहरण झाल्यावर अतिरेक्यांच्या मागणीपुढे शरणागती पत्करून टाडा कायद्याखालील तीन आरोपींना सोडण्यासाठी स्वत: परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग कंदाहारला गेले– ही घटनाही अत्यंत वादग्रस्त मानली जाते.

या घटनेची सविस्तर हकीकत या पुस्तकात (पृष्ठ २९० ते ३११) जसवंतसिंग यांनी आपल्या डायरीतील नोंदीच्या आधारे सांगितली आहे.

अपहरणकर्त्यांशी तडजोड करायला प्रथम जसवंतसिंग हे अनुकूल नव्हते; परंतु १६१ निष्पाप स्त्रीपुरुषांचे प्राण वाचवायचे की अपहरणकर्त्या दहशतवाद्यांशी लढायचे? असा नैतिक प्रश्न आपल्यापुढे आहे हे लक्षात आल्यावर तीन अतिरेक्यांची सुटका करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या तीन अतिरेक्यांना घेऊन ते स्वत: विमानाने कंदाहारला गेले. ऐनवेळी अपहरणकर्त्यांनी काही गडबड करू नये म्हणून स्वत:चे प्राण त्यांनी पणाला लावले. २४ डिसेंबर ते ३१ डिसेंबर असे आठ दिवस प्रवासी विमानात बंदिस्त होते आणि आपल्या अटी मान्य न केल्यास हे विमान उडवून देण्याची धमकी अपहरणकर्त्यांनी दिली होती हे लक्षात घेतले तर... जसवंतसिंग यांचा निर्णय मानवतावादी होता हे मान्य करावे लागते. या अपहरणकर्त्यांना अफगाणिस्तानने भारताच्या ताब्यात द्यावे, ही मागणी अमेरिका अजूनही टाळत आहे असे जसवंतसिंग म्हणतात. (३११)

पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांना दूर करून जनरल मुशर्रफ यांनी सत्ता मिळवली. त्यांच्याशी १४ ते १६ जुलै दरम्यान आग्रा येथे भारत-पाक बैठक झाली. या बैठकीनंतर संयुक्त पत्रक निघायचे ते निघालेच नाही. वाटाघाटी फिसकटल्या. जनरल मुशर्रफ यांची नियोजित अजमेरला गरीब नवाझ दर्गा भेटही त्यामुळे होऊ शकली नाही... ''आग्रा शिखर परिषदेनंतर भारत-पाक यांत एकमत झाले अशा अनेक गोष्टी आहेत... पण त्याबद्दल काही सांगणे शक्य नाही'' असे



**अमेरिकेची उक्ती आणि कृती यांत ताळमेळ नाही; एकीकडे लोकशाहीचा घोष, दुसरीकडे हुकूमशहा व लष्करी सत्ताधीश यांची पाठराखण, असा दुटप्पीपणा करण्यात अमेरिकेचा हातखंडा आहे, असे**

जसवंतसिंग म्हणतात. (३२७)

या शिखर परिषदेचा फज्जा कसा उडाला... त्याची सविस्तर माहिती जसवंतसिंग यांनी प्रथमच येथे दिलेली आहे. (पृष्ठ ३१२ ते ३२७)

पाकिस्तानच्या परराष्ट्र सेवेतील अब्दुल सतार आणि जसवंतसिंग या दोघांनी आग्रा शिखर परिषदेतील कराराचा मसुदा तयार केला होता. असे मसुदे तयार करताना येणाऱ्या अडचणींचे स्वरूपही स्पष्ट केले गेले आहे. 'रालोआ सरकारमधील सुसंवादाचा अभाव' किंवा 'परराष्ट्रखात्याच्या चेंगटपणाचे एक उदाहरण' म्हणूनही या मसुद्याचा उल्लेख होतो, तेव्हा जसवंतसिंग यांना साहजिकच दु:ख होते. त्या मसुद्यातील कलमांबाबत नंतर निष्फळ व निष्कारण वाद सुरू झाला; परंतु भारत-पाक वाटाघाटी पुढे जेव्हा होतील तेव्हा आधाराला हाच मसुदा वापरला जाईल असाही आशावाद त्यांना वाटत होता.

अमेरिकेशी त्या काळात भारताचे संबंध काहीसे तणावाचे होते. ११ व १३ मे १९९८ रोजी केलेल्या अणुचाचण्यांमुळे अमेरिकेने भारताला शिक्षा म्हणून आर्थिक निर्बंध लादले. या चाचण्यांची पूर्वकल्पना अमेरिकन हेरखात्याला लागली नव्हती, ही मोठीच नामुष्कीची बाब असे अमेरिकेला वाटत होते. त्यामुळे तिची प्रतिक्रिया संतापाची होती. 'भारताने आमची दिशाभूल केली' असे अमेरिकेचा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार सँडी बर्जर व परराष्ट्रखात्याचा प्रवक्ता जेम्स रॉबिन यांनी म्हटले. हे आरोप बिनबुडाचे आहेत असे सांगून जसवंतसिंग यांनी म्हटले, 'अण्वस्त्र चाचण्या करणार नाही असे आश्वासन भारताने कधीच दिलेले नव्हते.' या अणुचाचण्यांमुळे जागतिक बँकेवर दडपण आणून भारताला आर्थिक मदत मिळणे दुरापास्त करण्यात आले.

अमेरिकेची उक्ती आणि कृती यांत ताळमेळ नाही; एकीकडे लोकशाहीचा घोष, दुसरीकडे हुकूमशहा व लष्करी सत्ताधीश यांची पाठराखण असा दुटप्पीपणा करण्यात अमेरिकेचा हातखंडा आहे असे जसवंतसिंग हेही मानतात. भारत व पाकिस्तान यांत अमेरिका नेहमी पाकिस्तानला झुकते माप देत आली आहे, जसवंतसिंग यांना भाजपबद्दलही अमेरिकेचे मन साफ नाही हे जाणवत होते. 'अमेरिकी राजदूत रिचर्ड सेलेस्टी यांनी भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यावर टीका

**अणुचाचण्यांनंतर अमेरिकेला जसवंतसिंग यांनी ६ जूनला भेट दिली. परराष्ट्रखात्यातील अधिकाऱ्यांचा सल्ला दूर ठेवून आपल्या मनाप्रमाणे हे काम करायचे असा जसवंतसिंग यांचा पवित्रा होता; त्यामुळे**

केली होती– ही अयोग्य गोष्ट आहे' असे परराष्ट्रखात्याच्या प्रवक्त्यानेही म्हटले होते. साऱ्या जगाची पुनर्रचना आपल्या मर्जीप्रमाणे आपणच करायची असे अमेरिका मानते.

त्याबाबत अमेरिकेचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आपण काहीतरी करायला हवे असे जसवंतसिंग यांनी ठरवले. 'भारतीय बाजू व भूमिका परिणामकारकपणे अमेरिकेपुढे मांडून तणावाचे वातावरण कमी करणे यात काही झाले तरी आपण यश मिळवायलाच हवे' असा जसवंतसिंग यांचा मनोमनी निर्धार होता. अणुचाचण्यांनंतर अमेरिकेला जसवंतसिंग यांनी ६ जूनला भेट दिली. परराष्ट्रखात्यातील अधिकाऱ्यांचा सल्ला दूर ठेवून आपल्या मनाप्रमाणे हे काम करायचे असा जसवंतसिंग यांचा पवित्रा होता; त्यामुळे तेथील आपले अधिकारी चक्रावून गेले. परंतु पूर्वीचे सर्व ग्रह-पूर्वग्रह दूर ठेवून ही राजनैतिक कामगिरी पार पाडण्याचे जसवंतसिंग यांनी ठाम ठरवले होते. वॉशिंग्टनच्या हॉटेलमधून बाहेर बघितले तर पोटोमॅक नदीवर संध्याकाळ हळूहळू उतरत होती. वल्हवत जाणाऱ्या नावा, जॉगिंग करणारी मंडळी, सायकलीवरून जाणाऱ्या मुली– सायंप्रकाशातील स्तब्धता... भारावून टाकणाऱ्या त्या शांततेत त्यांचा आत्मविश्वास बळावत गेला. 'मी करणार तेच योग्य ठरणार' असे त्यांना वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी स्ट्रोब टालबोट यांची भेट झाली.

'मी वाटाघाटी करण्यासाठी, देवाणघेवाण करण्यासाठी आलेलो नाही. मला काही मागायचेही नाही. मला फक्त आपल्याशी संवाद साधायचा आहे. गेल्या पन्नास वर्षांतील नुकसानीचा आढावा (डॅमेज ऑडिट) घेऊ या. दोन्ही देशांचा मानसन्मान, मूलभूत स्थिती आणि राष्ट्रीय अस्मिता यांना धक्का न लावता काही समान धागे सापडतात का ते बघू या... त्यात सुसंवाद आणू या. परस्परांचा विश्वास परत निर्माण करायला हवा... मोकळेपणाने बोलू या... एकमेकांची मते आदराने ऐकू... जरूर ती गोपनीयता बाळगू... अडथळे टाळू...'

सुरुवातीलाच जसवंतसिंग यांनी ही भूमिका मांडली. स्ट्रोबने तिला प्रतिसाद दिला. अमेरिकेला अण्वस्त्र प्रसारबंदी, भारत-पाक संबंध, अमेरिका-चीन-भारत हा



चौकोन या बाबींवर बोलायचे आहे असे त्याने म्हटले. त्यावरचे जसवंतसिंग यांचे विचार ऐकून घेतले. 'तुमच्या उच्च पातळीवरच्या विचारांनी मी प्रभावित झालो आहे. आपण दोघे त्या गावाकडे जाणारा रस्ता शोधू या. परस्पर विश्वास व संवाद या द्वारे ते साधू या' असे स्ट्रोबने निरोप घेताना म्हटले. आपले पुस्तक भेट दिले. त्यावर लिहिले, 'टू माय फ्रेंड- ॲट द हायेस्ट प्लेस.'

एका तासाची ही मुलाखत अडीच तास चालली... हा एक टर्निंग पॉइंट ठरला. पुढेही बैठका झाल्या. त्याबद्दल पुस्तकातच वाचायला हवे. (३४०-४४२)


**जसवंतसिंग यांचे मंत्रीपद गेल्यावर, २००५-०६ मध्ये अमेरिका-भारत यांच्या अणुतंत्रज्ञान व अंतराळ संशोधन यातील सहकार्य करार झाला. भारताच्या अणुप्रकल्पांना अमेरिकेने मान्यता दिली. अणुइंधनाचे आश्वासन दिले.**

जसवंतसिंग यांचे मंत्रीपद गेल्यावर, २००५-०६ मध्ये अमेरिका-भारत यांच्या अणुतंत्रज्ञान व अंतराळ संशोधन यातील सहकार्य करार झाला. भारताच्या अणुप्रकल्पांना अमेरिकेने मान्यता दिली. अणुइंधनाचे आश्वासन दिले. जसवंतसिंग यांना हे आपल्या प्रयत्नाचे फलित वाटते. चीनशी संबंध सुधारणे, पाकिस्तानशी संबंध सुधारणे याबाबतही या काळात बरेच काही घडले. त्याबद्दलही जसवंतसिंग यांनी केलेल्या प्रयत्नांची रूपरेखा या पुस्तकात दिसते.

आत्मकथनाच्या अंगाने हे पुस्तक लिहिले गेले आहे. आरंभीची अडीचशे पृष्ठे स्वत:चे बालपण, शिक्षण, लष्करी सेवा, भारताची फाळणी, हिंदुत्व व हिंदू धर्म, काश्मीर संघर्ष, भारत-चीन संघर्ष याबद्दल विवेचन आले आहे. पुढच्या अडीचशे पृष्ठांत रालोआ मंत्रिमंडळातील एक मंत्री म्हणून केलेल्या कामाचा तपशील देण्यात आला आहे. या सहा वर्षांतील सत्ताकारणाचे अनेकविध अज्ञात कोपरे त्यामुळे उजळून निघाले आहेत.

**पृष्ठे: ४९० ● किंमत: ४०० रु. ● सभासदांना: २८० रु. ● पोस्टेज: २५रु.**

# आगामी




## टू सर विथ लव्ह

**ई. आर. ब्रेथवेट**
**अनु. लीना सोहोनी**

**१५०रु. पोस्टेज २०रु.**

मि. ब्रेथवेट....

एका ध्येयानं प्रेरित झालेल्या या शिक्षकानं विद्यार्थ्यांमधील रागाचं, द्वेषाचं, तिरस्काराचं रुपांतर प्रेमात केलं.

पौगंडावस्थेतील बंडखोरीचं रुपांतर आत्मविश्वासात केलं. इतरांच्या दृष्टीकोनातून विचार कसा करावा, हे त्या मुलांना शिकवलं.

हा मि. ब्रेथवेट यांचा विजय होता. एका शिक्षकाच्या तळमळीचा, विद्यार्थ्यांविषयी वाटणाऱ्या कळकळीचा आणि सर्वात महत्वाचं म्हणजे त्यांचा प्रेमाचा...

***शाळेच्या दैनंदिन जीवनावर आधारलेली एक अभिजात साहित्यकृती... प्रत्येकाने वाचावीच अशी.....***


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**मानवामानवातील सौहार्द व सद्भाव यांचे सर्जनशील महत्त्व मनावर बिंबवणाऱ्या कथा**

## चिकन सूप फॉर द सोल

**अनु. उषा महाजन**




'चिकन सूप फॉर द सोल' या नावाने प्रसिद्ध होणारी पुस्तकांची मालिका अमेरिकेत १९९२ पासून बेस्टसेलर्सच्या यादीत स्थिरावलेली आहे.

सामान्य व्यक्तींनी लिहिलेल्या छोट्या छोट्या आशावादी सत्यकथा या मालिकेतील पुस्तकांमधून संकलित केल्या जातात; जीवनाकडे सकारात्मक दृष्टीतून बघण्याचा संदेश त्या देतात; निराश मनाला उभारी देतात, चांगुलपणावरचा विश्वास दृढ करतात; जगात निरपेक्ष, निर्हेतुक मदत करणारी खूप माणसे आहेत; दुष्टपणापेक्षा चांगुलपणा हा अधिक आनंददायी ठरतो, आपल्या जवळच्या व्यक्तीच्या जीवनात आनंद निर्माण करण्याची छोटीशीही संधी खूप मोलाची ठरते; सामान्य माणसेही असामान्य कामे करून जातात; छोट्या छोट्या घटनाही आपल्या जीवनात मोठा बदल घडवून आणतात, आपल्या नात्यांची जपणूक करण्यात समाधान–सुखाचे बीज असते; भाऊ-बहीण, आई-वडील, पती-पत्नी, काका-मामा अशा नात्यांचेही पावित्र्य आणि सामर्थ्य जाणून घ्या; सद्भावना व सद्गुण समाजाला स्थैर्य देतात... यासारख्या गोष्टी मनावर बिंबवणाऱ्या या प्रत्यक्ष घडलेल्या घटना–माणुसकीवरची आपली श्रद्धा बळकट करतात. आणि सध्याच्या परस्पर संशयाच्या, बेभरवशाच्या, चंगळवादी आपमतलबीपणाच्या वातावरणात या मानवतावादी मूल्यांचा विधायक आविष्कार– संस्कार अभावितपणे करून जाणाऱ्या या घटनाप्रसंगांची नवलाई नवा तजेला देणारी आहे असे लक्षावधी वाचकांना जाणवले... त्यामुळे या पुस्तकाचे नवनवे भाग काढत राहणे संपादक-प्रकाशकांना भाग पडले.

परदेशात सर्दी-खोकला-ताप यासाठी वापरण्यात येणारे घरगुती पेय (काढा) म्हणजे चिकन सूप. लगेच आराम देणारे, कणकण दूर करणारे, उत्साह-तरतरी वाढवणारे. आजारपणातून उठल्यावर पुन्हा ऊर्जा वाढवणारे. सहज पचणारे.

> **'चिकन सूप फॉर दि सोल'मध्ये कथांचे वर्गीकरण करताना प्रेम, स्वतःवर प्रेम करायला शिका, पालकत्व, विद्वत्ता, स्वप्रपूर्ती, अडचणींवर मात, वाईटातून चांगले शोधण्याची कला असे सात मुख्य भाग पाडले आहेत.**

सर्वमान्य पेय. त्यामुळे 'तुमच्या आत्म्यासाठी चिकनसूप' ही कल्पना अभिनव ठरली आणि या पुस्तकांना वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळे त्याचे आणखी काही भाग निघाले. त्यांना 'सेकंड सर्व्हिंग ऑफ चिकनसूप फॉर दि सोल' अशी नावे देण्यात आली. तरीही वाचकांची मागणी कायमच. त्यामुळे चिकन सूप फॉर दि मदर, फादर, ब्रदर, सिस्टर, डॉटर, सन, हजबंड, वाइफ अशी नातेदर्शक नावे पुढच्या पुस्तकांना देण्यात आली. तेवढ्यानेही भागेना, तेव्हा आणखी वेगळी नावे देण्यात आली. चिकन सूप फॉर दि टीचर्स सोल, फॉर टीनएजर्स, फॉर पेरेंटस्, फ्रेंडस् ईत्यादी.

या सर्व पुस्तकांमागची संपादकीय भूमिका एकच होती. वाचकांनी आपल्या आयुष्यातील वेचक घटना दोनतीन पृष्ठांच्या मर्यादेत लिहून पाठवायच्या. त्या सत्यकथा असायला हव्या. त्यांचे पुनर्लेखन, विषय, वर्गीकरण, संपादन करून एकेका पुस्तकात सत्तर-ऐंशी कथा एकत्रित करायच्या. अगदी मोजक्या शब्दांत नेमका आशय पकडायच्या शैलीमुळे वाचकांना या कथा वाचायला वेळ लागत नसे. कुठलेही पान उघडावे आणि वाचू लागावे आणि मग एकापाठोपाठ एक अशा या कथा सहज वाचण्यात गढून जावे– असा संमोहनाचा प्रकार या पुस्तकाबाबत होत राहतो.

जगभर ही पुस्तके लाखोंच्या वाचकांना भुरळ घालणारी ठरली.

मराठीतही आता या पुस्तकांच्या प्रकाशनाला आरंभ झाला आहे. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने 'हेल्थ कम्युनिकेशन्स इंक'कडून या पुस्तकांच्या मराठी अनुवादाचे हक्क मिळवले आहेत. 'चिकन सूप फॉर द सोल' आणि 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल' ही दोन पुस्तके बाजारात आली आहेत.

'चिकन सूप फॉर द सोल'मध्ये कथांचे वर्गीकरण करताना प्रेम, स्वत:वर प्रेम करायला शिका, पालकत्व, विद्वत्ता, स्वप्नपूर्ती, अडचणींवर मात, वाईटातून चांगले शोधण्याची कला असे सात मुख्य भाग पाडले आहेत.

'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल'मध्ये प्रेमासाठी, दृष्टिकोन व आत्मसन्मान, अडथळ्यांवर मात करणे, विवाह, मातृत्व, सोनेरी क्षण, तुमची स्वप्ने जगा, वृद्धत्वाकडे झुकताना, शहाणपण, पिढ्यांचा वारसा अशा दहा मुख्य वर्गीकरणात



बसणाऱ्या कथांचा समावेश आहे.

**प्रेम : सृजनशील शक्ती**

> **"प्रेम ही एक सृजनशील शक्ती आहे. जिथे जाल तिथे प्रेमाचा वर्षाव करा. स्वतःच्या घरापासून सुरुवात करा. आपली मुले, पत्नी, पती, शेजारीपाजारी... प्रत्येकावर प्रेम करा. आपल्याला भेटणारी प्रत्येक व्यक्ती सुखी कशी होईल हे बघा.**

'प्रेम ही एक सृजनशील शक्ती आहे. जिथे जाल तिथे प्रेमाचा वर्षाव करा. स्वत:च्या घरापासून सुरुवात करा. आपली मुले, पत्नी, पती, शेजारीपाजारी... प्रत्येकावर प्रेम करा. आपल्याला भेटणारी प्रत्येक व्यक्ती सुखी कशी होईल हे बघा. तुमचा चेहरा, नजर, हास्य, अभिवादन यातून प्रेमाची प्रचीती येऊ द्या' असे मदर टेरेसा यांचे वचन 'चिकन सूप फॉर द सोल'मधील पहिल्याच लेखाच्या आरंभी देण्यात आले आहे.

एका झोपडपट्टीतल्या २०० मुलांची पंचवीस वर्षांनी काय अवस्था आहे याचा समाजशास्त्राच्या एका प्राध्यापकाने सर्व्हे घेतला. २०० पैकी २० मुले स्थलांतरित; उरलेल्या १८० पैकी १७६ मुले यशस्वी उद्योजक, वकील, डॉक्टर वगैरे बनून संपन्न आयुष्य जगत होती. या यशाचे श्रेय कोणाला जाते या प्रश्नाचे उत्तर देताना त्या सर्वांनी आपल्या शिक्षिकेला पूर्ण श्रेय दिले. त्या शिक्षिकेला विचारले, 'झोपडपट्टीत राहणारी मुलेही उत्तम यश आयुष्यात मिळवू शकली– अशी काय जादू आपण केली' तिने उत्तर दिले, 'जादू कसली? मी या मुलांना खूप माया दिली... प्रेमानं वागवलं...' अशा साध्या उदाहरणातून व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी प्रेमाची, मायेची, पाठराखणीची, उत्तेजनाची कशी गरज असते हे दाखवले आहे.

'तू मला फार आवडतोस...' हे साधे वाक्य... पण ते पिता-पुत्रामध्ये जवळीक निर्माण करते. आपण एकमेकावर प्रेम करतो तेच आणि फक्त तेच प्रेम हे सत्य असते.

'मुन्नाभाई एमबीबीएस'मुळे 'प्रेम की झप्पी दो'ची महती आपल्याला ठाऊक आहे. ली शॅपिरो या न्यायाधीशाचीही तीच ख्याती होती. प्रेमालिंगन देणारा न्यायाधीश अशी त्यांची ख्याती. त्यांनी मिठीची जादू दाखवणारी एक पोतडी तयार केली. त्या पोतडीबाहेर लिहिले, 'एका मिठीला एक हृदय फ्री.' त्या पोतडीत स्टिकर्स होती. आपण दर्शविणाऱ्या प्रेमभावनेने दु:खी रुग्णाच्या वेदनेवर मायेची फुंकर घातली जाते. लाळ गळणाऱ्या एका रुग्णाला त्या न्यायाधीशाने मिठी मारल्यावर तो रुग्ण हसू लागतो हे बघून इतर सर्व पेशंट टाळ्या वाजवतात. का? तेवीस वर्षांनंतर तो रुग्ण पहिल्यांदाच हसला म्हणून!

प्रेमभराने आलिंगन देण्यात, मिठीमध्ये अभूतपूर्व शक्ती असते. स्मितहास्य हा दोन व्यक्तींना जोडणारा नैसर्गिक दुवा असतो. स्मितहास्यामुळे राग-द्वेष-शत्रुत्व या भावना कमी होत जातात.

प्रेमभराने आलिंगन देण्यात, मिठीमध्ये अभूतपूर्व शक्ती असते.

बसमध्ये एका वृद्धाजवळ सुंदर पुष्पगुच्छ असतो; त्याकडे एका तरुणीचे पुन:पुन्हा लक्ष जात असते. उतरताना तो वृद्ध तो गुच्छ त्या तरुणीला देऊन म्हणतो, 'मी हा गुच्छ तुला दिला हे कळल्यावर माझ्या पत्नीला खरोखर आनंद वाटेल.' ती तरुणी तो गुच्छ घेते. तो वृद्ध तिला बसमधून उतरून दफनभूमीकडे जाताना दिसतो– अशीही एक कथा यात येते.

तू फारच कौशल्यपूर्ण टॅक्सी चालवतोस असे पॅसेंजरने टॅक्सी ड्रायव्हरला म्हटले; तर न्यूयॉर्कची हरवलेली प्रेमाची भाषा पुन्हा नागरिकांना गवसेल; त्या कौतुकामुळे त्या टॅक्सी ड्रायव्हरचा संपूर्ण दिवस छान जाईल; आपल्या पॅसेंजरशी तो प्रेमाने, नम्रपणे बोलेल– असे आर्ट बुकवल्ड या विनोदी लेखकाने एका लेखात म्हटले आहे.

**स्मितहास्य**

स्मितहास्य हा दोन व्यक्तींना जोडणारा नैसर्गिक दुवा असतो. स्मितहास्यामुळे राग-द्वेष-शत्रुत्व या भावना कमी होत जातात.

व्हॅलेंटाइन डे च्या दिवशी नवरा पत्नीचे दोष काढण्याऐवजी तिचे कौतुक करतो, 'तू किती काळजी घेतेस माझी... एवढे कष्ट घेतेस... मस्त जेवण बनवतेस... घर टापटीप ठेवतेस... गोड दिसतेस...' आणि त्या कौतुकाने पत्नीच्या वागण्यातही बदल होतो. ती म्हणते, 'लॅरी, तू सर्वांसाठी किती कष्ट करतोस. पैसे मिळवण्यासाठी दिवसरात्र राबतोस. तुझं कौतुक वाटतं मला!...'

मुलं ही मांजरासारखी असतात. दिवसातून एकदा तरी आंजारून-गोंजारून त्यांचे लाड करायला हवेत. मुलांना प्रेमाची उत्स्फूर्त गरज असते.

स्वत:वर प्रेम करणं हीही गोष्ट आवश्यक असते.

**आत्मप्रेम, आत्मविश्वास**

जग बदलायची स्वप्नं आपण तरुणपणी रंगवतो. पण जग बदलणं हे आपल्या हातात नाही हे वय वाढतं तसं लक्षात येऊ लागतं. आणि मृत्यू समीप आल्यावर कळतं की, अरे, सगळ्यात आधी आपण स्वत:मध्येच बदल घडवून



आणायला हवा होता... आपला आदर्श बघून इतरांनाही कदाचित बदलावंसं वाटलं असतं.

जॉर्ज बर्नार्ड शॉने जगासाठी आणि मानवासाठी सर्वात मोठे सामाजिक कार्य कोणते या प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले, ''आपल्या कुटुंबाच्या भरणपोषणाचे काम करणे- हेच आपले सर्वात मोठे समाजकार्य होय.''

स्वत:च्या कर्तृत्वावर, मूल्यांवर विश्वास हवा.

एका मुलीला विचारले,'तू कसले चित्र काढते आहेस?'

'मी देवाचे चित्र काढतेय.'

'पण देव कसा दिसतो ते तर कोणालाच ठाऊक नाही.'

'माझं चित्र पूर्ण होऊ द्या. मग कळेल तो कसा दिसतो ते!'

एका चिमुरड्या मुलीला वाटणारा हा स्वत:बद्दलचा विश्वास!

जॉर्ज बर्नार्ड शॉने जगासाठी आणि मानवासाठी सर्वात मोठे सामाजिक कार्य कोणते या प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले, 'आपल्या कुटुंबाच्या भरणपोषणाचे काम करणे– हेच आपले सर्वात मोठे समाजकार्य होय.'

कुटुंबासाठी प्रत्येक सदस्याने काम करायला हवे. मुलांसाठी सुरक्षित घरकुल हा मुलांना मिळणारा सर्वात मोठा वारसा होय. आदर्श पालक आपल्या मुलांना उत्कृष्ट मुळं आणि पंख देतात. आपलं घर कुठं आहे लक्षात राहण्यासाठी मुळं आणि दूर उंच झेप घेण्यासाठी पंख...'' जगभर हिंडून झालं की परतायला हक्काचं घर हवंच!

निष्पाप, प्रेमळ स्पर्श व्यक्तीव्यक्तीच्या मैत्रीत जादू करू शकतो.

माझं खूप प्रेम आहे तुझ्यावर असं म्हणून मुलांना जवळ घ्या. त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

आपल्या भावना शब्दांतूनही व्यक्त करायचे कौशल्य कमवावे लागते.

'तू जसा आहेस तसाच मला खूप खूप आवडतोस.' असं म्हणायलाही प्रयास पडतात!

**आत्मप्रतिमा सुधारा, यश मिळवा**

एखाद्या मुलीची आत्मप्रतिमा सुधारू लागली की त्याच्या यशाच्या प्रमाणातही सुधारणा होते. तो मुलगा अधिक कार्यक्षमतेने व हुशारीने काम करू लागतो. अवघड कामेही करण्यात रस घेऊ लागतो.

आपल्या वर्गातील प्रत्येक मुलाचं नाव लिहून त्याच्या एखाद्या गुणाबद्दल एक वाक्य लिहा असं एक शिक्षिका विद्यार्थ्यांना सांगते.

प्रत्येक आईला आपला मुलगा परिपूर्ण वाटतो. आईने तू परिपूर्ण आहेस म्हटले की मुलाला तसे आहोत हे सिद्ध करण्याची उर्मी आतूनच जाणवते. "तू आहेस तसा मला प्रिय आहेस. मला आवडावे म्हणून तू बदलण्याची गरज नाही."

तास संपल्यावर प्रत्येक मुलगा म्हणतो, 'थँक यू बाई, आज खूप नवं शिकलो.'

ती शिक्षिका प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गुणवर्णनाचा कागद देते...

'मी एवढा आवडतो– माझ्यात हे गुण आहेत हे आजच मला कळले.' अशी प्रत्येकाची प्रतिक्रिया.

'...त्या वर्गाच्या वागणुकीत, अभ्यासात, हुशारीत एकदम फरक जाणवतो.

ती मुलं आपल्या गुणवर्णनाचे ते कागद अखेरपर्यंत जपून ठेवतात...

स्वत:ची प्रतिमा बदलली तरीही जीवनात नवा आनंद येतो.

मातृदिनाला जिनी आपल्या आईला इमेज कन्सल्टेशनसाठी घेऊन जाते.

इमेज कन्सल्टन्ट तरुणी आईला वेगळी वेषभूषा, वेगळी केशरचना सुचवते. लिपस्टिक लावते... आणि आरशापुढे उभे करते. 'अरे, ही बाई किती सुंदर दिसतेय...' आपलीच ही प्रतिमा हे तिला आधी जाणवतच नाही... स्वत:चेच रूप तिला अनोखे वाटते. मुलगी तिला म्हणते, 'आई, तू सुंदर दिसते आहेस. आणि नेहमीच सुंदर दिसतेस.' (खरे सौंदर्य)

## मुलांना स्वातंत्र्य द्या

मुलांना स्वत:ची मते बनवण्याचे स्वातंत्र्य हवे.

कुठलीही गोष्ट नाकारण्याचे; स्वीकारण्याचे... स्वातंत्र्य हवे. नकार दिला तरी तुम्ही मला प्रियच आहात असा विश्वास वाटण्याचे.

प्रत्येक आईला आपला मुलगा परिपूर्ण वाटतो. आईने तू परिपूर्ण आहेस म्हटले की मुलाला तसे आहोत हे सिद्ध करण्याची उर्मी आतूनच जाणवते. 'तू आहेस तसा मला प्रिय आहेस. मला आवडावे म्हणून तू बदलण्याची गरज नाही.' हे आईचे उद्‌गार गायक बिली ज्यो याला प्रेरक ठरले.

आपण स्टॅनफोर्डमध्ये शिकू शकलो नाही, पण आपल्या मुलीने स्टॅनफोर्डला शिकायला हवे असे हॅरीने ठरवले. १९५२ मध्ये स्टॅनफोर्डमधून वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाली... १९८० मध्ये सँड्रा ही अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाची पहिली न्यायाधीश ठरली.

पांगळा पाय आणि लोखंडी पट्ट्या अशी अपंग दरिद्री मुलगी. डॉक्टरांनी ही जन्मभर पांगळीच राहणार असे स्पष्ट सांगितलेले.... पण तिची आई खंबीर... 'तू धैर्य धर, चिकाटी ठेव. प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर तू हवं ते करू शकशील' असं आई म्हणे... आणि नवव्या वर्षी कुबड्या टाकून ती पायानं चालू लागली. तेराव्या वर्षी शाळेतल्या धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊ लागली. तिचे पडवळासारखे पाय बघून मुले हसत... पण एकदा ती शेवटून दुसरी आली. तिचा उत्साह वाढला... आणि ती प्रत्येक शर्यतीत पहिली येऊ लागली. तिचे नाव विल्मा रुडॉल्फ... १९६० च्या ऑलिंपिक शर्यतीत ती १०० मीटर स्पर्धेत पहिली आली. २०० मीटर स्पर्धेत पहिली आली. ४०० मीटर स्पर्धेत तिच्या टीमला यश मिळाले. तीन सुवर्णपदके मिळवणारी ती पहिली धावपटू ठरली.

वैवाहिक आयुष्य हेच सर्वस्व मानून जगताना नवऱ्याचा जुलूम सहन करणारी कॉरी वॉलड्रान आपण जीवनसुखासाठी दुसऱ्या कोणावर अवलंबून राहता कामा नये, स्वतःचे सुख स्वतःच मिळवायला हवे, असे ठरवते. आपली स्वतंत्र ओळख प्रस्थापित करते.

## वैवाहिक जीवनातील आनंद

वैवाहिक आयुष्य हेच सर्वस्व मानून जगताना नवऱ्याचा जुलूम सहन करणारी कॉरी वॉलड्रान आपण जीवनसुखासाठी दुसऱ्या कोणावर अवलंबून राहता कामा नये, स्वत:चे सुख स्वत:च मिळवायला हवे, असे ठरवते. आपली स्वतंत्र ओळख प्रस्थापित करते. आपल्या दोन वर्षाच्या मुलाला घेऊन दोन दिवस भावाकडे जाते. आपले हे मूल आणि आपण– नवे आत्मबळ तिला लाभते. समुपदेशकाकडे जाते. आपले सुख आपल्याच हातात आहे हे तिला जाणवते. आपल्या आयुष्याची सूत्रे ती आपल्या हातात घेते. स्वत्वाच्या ओळखीनंतर दुसऱ्या व्यक्तीचे सान्निध्य व प्रेम याचा खरा आनंद घेण्याची क्षमता तिच्यात येते.

## मनुष्यत्वाचे दहा नियम

मनुष्यत्वाचे दहा नियमही चेरी कान्टर-स्कॉटने दिलेले आहेत.

१. तुम्हाला एक शरीर मिळेल. तुम्हाला आवडो न आवडो, ते जन्मभर तुमचंच राहणार आहे.

२. तुम्ही आयुष्याच्या शाळेत रोज नवे शिकत राहणार आहात.

३. चुका होणार; पण चुका दुरुस्त करता येतील. रोज नवा धडा शिकायला मिळेल.

४. जोपर्यंत पाठांतर होत नाही तोपर्यंत उजळणी करीत रहा.

कधी मन उदास असले, मनाविरुद्ध काही घडत राहिले, अपेक्षित यश दुरावले गेले, तर ही पुस्तके हातात घ्या. कुठलेही पान उघडा. वाचू लागा... आपली उदासीनता, आपली मरगळ कधी गेली हे लक्षातही

५. शिकायला अंत नाही.

६. ह्या गोष्टीपेक्षा ती चांगली, असं काही घडत नाही.

७. समोरची व्यक्ती म्हणजे तुमचेच प्रतिबिंब.

८. आपल्या आयुष्याचं काय करायचं हे सर्वस्वी आपल्याच हातात असतं.

९. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आपल्या मनाच्या गाभाऱ्यातच दडलेलं असतं.

१०. वरील सर्व गोष्टी आपण विसरणार! मनुष्यस्वभावच तसा आहे ना!

कधी मन उदास असले, मनाविरुद्ध काही घडत राहिले, अपेक्षित यश दुरावले गेले, तर ही पुस्तके हातात घ्या. कुठलेही पान उघडा. वाचू लागा...

आपली उदासीनता, आपली मरगळ कधी गेली हे लक्षातही येणार नाही.

**पृष्ठे: २३२ ● किंमत: १६० रु. ● सभासदांना: १२० रु. ● पोस्टेज: २५रु.**


**www.mehtapublishinghouse.com**

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आत्तापर्यंत १,५०००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.




# आगामी




## विमुक्त

**दादासाहेब मोरे**

**१३०रु. पोस्टेज २०रु.**


**जातीला काळं फासून, जातपंचायतीचा अपमान केल्याच्या आरोपाखाली 'धमन्या व लच्छी'ला पंचायत गावातून हद्दपार करते.**

**निर्णय ऐकताच मात्र लच्छी व धमन्या या जोडप्याच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज चमकू लागते. सारं चंबुगबाळं उचलून ते कच्च्याबच्च्यासह शहराकडं चालू लागतात...**

**.....जातीजमातीच्या आदिम परंपरांपासून, दुष्ट रूढींपासून, कायमचे मुक्त होऊन, माणूस म्हणून जगण्यासाठी.........**

**पण लच्छी आणि धमन्यानं असं केलं तरी काय....?**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




**अभेद्य फोर्ट नॉक्सवर हल्ला करून अब्जावधी डॉलर्सचे सोने पळवण्याचा अफलातून उद्योग**

# गोल्डफिंगर

**इयान फ्लेमिंग**

**अनु. माधव कर्वे**

'गोल्ड फिंगर' ही जेम्स बाँड या नायकाच्या हुशारीचा एक दैदीप्यमान पैलू दाखवणारी थरारकथा. अमेरिकेचा सोन्याचा साठा ज्या अभेद्य इमारतीत आहे, ज्याच्या संरक्षणासाठी घोडदळापासून चिलखती दळाशी संबंधित सैन्याच्या तुकड्या आणि हजारो माणसे तैनातीत आहेत, त्या 'फोर्ट नॉक्स'वर हल्ला चढवून तेथील पंधरा अब्ज डॉलर्स किमतीच्या सोन्याच्या विटा हस्तगत करून त्या सुरक्षितपणे तेथून बाहेर काढण्याचा एक अफलातून कट गोल्डफिंगर रचतो आणि त्यात जेम्स बाँडलाही तो जबरदस्तीने सामील करून घेतो– त्या कटाची अफलातून महत्त्वाकांक्षी कहाणी... जागतिक सुवर्ण व्यवहाराच्या अंगोपांगाची यथार्थ कल्पना देणारी आणि अमेरिकेने जगातील सर्वात मोठ्या सुवर्ण संचयाच्या संरक्षणासाठी उभारलेली कडेकोट यंत्रणा समजावून देणारी ही कहाणी वाचकाची मती गुंग करते.

हा गोल्डफिंगर कोण आहे? जेम्स बाँडची आणि त्याची गाठ कशी पडते? गोल्डफिंगरच्या हुशारीला आणि चातुर्याला जेम्स बाँड कसा पुरून उरतो? हे सगळे तपशील या थरारकथेत मोहक रंग भरतात. उत्कंठा वाढवतात.

जेम्स बाँड न्यूयॉर्कला जाण्यासाठी मियामी विमानतळावर येतो; पण ते विमान रद्द झाल्याची घोषणा होते. लाउंजमध्ये ड्रिंक घेत बसलेल्या जेम्स बाँडपुढे 'तुम्ही मला ओळखलं नसेल– पण आपण भेटलोय आधी...' असे म्हणत गुलाबी वर्ण, तुळतुळीत दाढी, भारदस्त सूट, सिल्क शर्ट, चौकटीचा टाय, तपकिरी बूट अशा अवतारातला पन्नाशीतला धनाढ्य अमेरिकन उभा राहतो आणि आधीच्या भेटीचे स्मरण देतो. एवढेच नव्हे तर जेम्स बाँडला एक ऑफर देतो, 'आज रात्री मियामीतच राहून माझा पाहुणचार घ्या... एका समस्येबाबत



मला मार्गदर्शन हवयं. पत्त्यांमध्ये तुम्हाला दुहेरी कॅनॅस्टा हा गेम आवडतो का?... बरोबरीच्या भिडूमध्ये बरीच बरोबरी राहू शकेल असा हा गेम... पण त्यात मला एका आठवड्यात २५ हजार डॉलर्सचा गंडा बसला.... माझ्या भिडूकडून माझी फसवणूक होतेय असे मला वाटते. ही फसवणूक कशी होतेय हे मला कळत नाही.'

**गोल्डफिंगर तसा बुटकाच... पाच फूट उंची जेमतेम असेल... जाडजूड, ओबडधोबड देह.त्यावर थेट खांद्यांमध्ये बसवलेले भलेमोठे गोलाकार डोके. त्याचं शरीर हा एक विनोदी प्रकार आहे असे जेम्स बाँडला वाटते.**

जेम्स बाँड विचारतो, 'हा भिडू कोण आहे?'

'ऑरिक गोल्डफिंगर... ब्रिटिश... नॉसॉचा पासपोर्ट... बेचाळीस वय... अविवाहित. ब्रोकरचा व्यवसाय... खूप श्रीमंत असावा. सोन्याच्या व्यवहारात तो पैसा गुंतवतो. सोनं जगभर फिरवतो. जगातल्या धनाढ्य व्यक्तीत त्याची गणना होते... पण तरी त्याने मला २५ हजार डॉलर्सला गंडा का घालावा हे मला कळत नाही... तुम्ही ते शोधून काढा. त्यासाठी येथे रहा. ते तुम्ही शोधले तर मी तुम्हाला दहा हजार डॉलर्स देईन.'

'तुमचा प्रस्ताव आकर्षक आहे. उद्या रात्री मला न्यूयॉर्कला पोचणे भाग आहे. तुम्ही उद्या सकाळी व दुपारी गोल्डफिंगर बरोबर नेहमीसारखं खेळा... मला तुमच्या प्रश्नाचं उत्तर शोधायला बराच वेळ मिळेल.'

दुसऱ्या दिवशी कॅबॅना क्लबवर गोल्डफिंगर आणि ड्यू पॉंट यांचा गेम सुरू होतो. ड्यू पॉंट जेम्स बाँडची 'न्यूयॉर्कमधील मित्र' म्हणून ओळख करून देतो. गोल्डफिंगरची एक्स रे सारखी नजर आपला आरपार वेध घेते आहे असे जेम्स बाँडला वाटते.

गोल्डफिंगर तसा बुटकाच... पाच फूट उंची जेमतेम असेल... जाडजूड, ओबडधोबड देह. कसलेच प्रमाण नसलेले पाय. त्यावर थेट खांद्यांमध्ये बसवलेले भलेमोठे गोलाकार डोके. त्याचं शरीर हा एक विनोदी प्रकार आहे असे जेम्स बाँडला वाटते. गोलाकार चेहरा, उंचावलेले कपाळ... मोठे निळे डोळे, त्यावर विरळ काळसर भुवया... थेट टोकदार नाक– गालाची उंचावलेली हाडे... ताणलेले गाल... यावरून हा चेहरा विचारवंताचा, शास्त्रज्ञाचा आहे; निर्दयपणा, सुखलोलुपता, निग्रही वृत्ती आणि खंबीरपणा यांचं अजब रसायन त्यात असणार... असा जेम्स बाँड आडाखा बांधतो... त्याच्यातील सुप्त शक्ती जाणवत राहते. हा आपली

**''मी जेम्स बाँड बोलतोय... ड्यू पाँटला तुम्ही आत्तापर्यंत खूप लुबाडलंय. आता तुमचा खेळ संपलाय...**

प्रचंड सुप्त उर्जा कशात वापरत असणार? श्रीमंत होण्यात? लैंगिक सुखात? सत्ता संपादनात? की या तीनही गोष्टींमध्ये? असा प्रश्न जेम्स बाँडला पडतो.

काही वेळ तो दुरून निरीक्षण करतो. गोल्डफिंगरला त्याच्या जागेवरून काय दिसत असेल असा प्रश्न तो स्वत:लाच विचारतो... समोरच त्याची हॉटेलमधली रूम असते... बाल्कनी... दार...

आणि जेम्स बाँड गोल्डफिंगरच्या त्या खोलीत प्रवेश मिळवतो. कॅमेरा बरोबर असतो.

तेथे दुर्बिण घेऊन बसलेली एक तरुणी दिसते... ती दुर्बिणीतून ड्यू पाँटच्या हातातले पत्ते बघून काही सूचना देत असते... जेम्स बाँड तिचे फोटो काढतो... तिला सांगतो, 'मी तुला काही करणार नाही. तुला घाबरवल्याबद्दल सॉरी... तू गोल्डफिंगरला पत्ते सांगणे थांबवलेस तर तो काय करील? खेळ बंद करील?'

'नाही. प्लग निघाला किंवा काहीतरी झाले तर संपर्क तुटतो. तोपर्यंत तो थांबून राहतो.'

गोल्डफिंगरला मग जेम्स बाँड त्या मायक्रोफोनवरून सांगतो, 'मी जेम्स बाँड बोलतोय... ड्यू पाँटला तुम्ही आत्तापर्यंत खूप लुबाडलंय. आता तुमचा खेळ संपलाय... इथली तरुणी, दुर्बिण, मायक्रोफोन, श्रवणयंत्र– सर्व फोटो मजजवळ आहेत. ते मी एफबीआय वा स्कॉटलंड यार्डला पाठवणार नाही... चेकबुक काढा. त्यावर पन्नास हजार डॉलर्स आकडा लिहा... पस्तीस हजार डॉलर्स तुम्ही ड्यू पाँटकडून मिळवलेले... दहा हजार माझी फी... पाच हजार ड्यू पाँटचा वेळ वाया घालवला म्हणून. चेक व्यवस्थित वटेल असे बघा... रात्रीचे माझे न्यूयॉर्क हॉटेलमधले बुकिंग करा... काही गडबड केली तर हे सर्व फोटो व बातमी जगजाहीर होईल... मी माझ्याबरोबर ओलीस म्हणून या तरुणीला माझ्याबरोबर न्यूयॉर्कला नेतोय.'

गोल्डफिंगरशी जेम्स बाँडचा झालेला हा पहिला सामना.

दुसरा सामना होतो गोल्फ कोर्सवर. फक्त एकाच आठवड्याने. त्यातही गोल्डफिंगर जेम्स बाँडला फसवू पाहतो. पण जेम्स बाँड त्याला रंगेहाथ पकडतो.

तिसरा सामना होतो तो जेम्स बाँडला बँक ऑफ इंग्लंडकडून गोल्डफिंगरच्या



**''जगातल्या कुठल्याही शहरात, गावात सहजपणे विकली जाईल अशी सर्वात मौल्यवान वस्तू म्हणजे सोने... सोन्याचा शोध घेणे जवळजवळ अशक्य...**

सोन्याच्या खरेदीच्या संबंधातील व्यवहाराची चौकशी करण्याची कामगिरी सोपवल्यावर! त्यानिमित्ताने जागतिक सुवर्ण व्यवसायाची व्याप्ती, वैशिष्ट्ये बँक ऑफ इंग्लंडचा कर्नल स्मिदर्स उलगडून दाखवतो. 'जगातल्या कुठल्याही शहरात, गावात सहजपणे विकली जाईल अशी सर्वात मौल्यवान वस्तू म्हणजे सोने... सोन्याचा शोध घेणे जवळजवळ अशक्य... सोने वितळवता येते... त्यामुळे सोन्याच्या व्यवहारावर व ठावठिकाणावर लक्ष ठेवणे कठीण ठरते. सोन्यावर आधारलेलं चलन आणि सोन्याचा साठा यावर आपल्या चलनाची बाजारातील पत अवलंबून असते... सोन्याचे स्मगलिंग मोठ्या प्रमाणावर होते... वगैरे तपशील देऊन गोल्डफिंगर हा गावोगावी दुकाने काढून स्वस्त दागिने विकणे व जुने सोने विकत घेणे या व्यवसायातून प्रचंड श्रीमंत झाला आहे. तो दरवर्षी भारताला भेट देतो... जहाजावरून रासायनिक खते आणतो... भारतात विकतो... त्याच्या कारखान्यावर छापे घातले तर त्यात आक्षेपार्ह काही सापडले नाही... पण त्याच्या एका बुडालेल्या जहाजातील खताच्या पावडरचे विश्लेषण केले असता ती पावडर एक हजार अंश सेंटिग्रेड तापमानावर सोन्यात रूपांतरित होते असे आढळून आले. त्यामुळे सोन्याच्या चोरट्या व्यवहारात तो गुंतलेला असावा असा बँक ऑफ इंग्लंडला संशय आला आहे. त्याबाबत गुप्तहेर जेम्स बाँडने शोध घ्यावा' म्हणून कर्नल स्मिदर्स त्याला गळ घालतो.

जेम्स बाँड त्या कामगिरीवर असताना गोल्डफिंगरच्या निवासस्थानाला भेट देतो; तेथील कोरियन व जर्मन सुरक्षा कर्मचाऱ्यांना न्याहाळतो... त्या ठिकाणी असणाऱ्या प्रयोगशाळेला भेट देतो... त्या प्रयत्नात गोल्डफिंगर त्याला पकडतो... त्याला ठार मारण्याचा विचार रद्द करून, फोर्ट नॉक्समधील सोन्याचा प्रचंड साठा पळवण्यासाठी उपयोग करून घेण्यासाठी त्याचा वापर करण्याचा घाट घालतो. त्यासाठी डेट्रॉइट, मियामी, शिकागो, लासवेगास, सिसिली येथील प्रमुख माफिया टोळ्यांची मदत घेतो... तुम्हाला एकेक अब्ज डॉलर्सचे सोने मिळेल; अशी ऑफर देतो. 'ऑपरेशन ग्रँडस्लॅम' असे या प्रकल्पाला नाव देतो.

जेम्स बाँड ती योजना ऐकून म्हणतो, 'तू पाण्यात जीबी हे द्रव्य मिसळून फोर्ट नॉक्स परिसरात राहणाऱ्या साठ हजार लोकांना मारणार... पाचशे टन सोने

**मी युरोपातला माझा कारभार गुंडाळलाय... अमेरिकेचं सोनेरी हृदय घेऊन मी स्थलांतरित होणार... ह्या बोंगाड्या गुंडांची त्यांच्या बंदुका-माणसांसकट मला गरज आहे... ते चुका करतील...**

ट्रेनने रशियन युद्धनौकेपर्यंत नेणार... शुद्धीवर आहेस का?...'

गोल्डफिंगर म्हणतो, "गेली पाच वर्षे या मोहिमेवर मी विचार करतोय. आता प्रत्यक्ष कामगिरीची वेळ आलीय... मी युरोपातला माझा कारभार गुंडाळलाय... अमेरिकेचं सोनेरी हृदय घेऊन मी स्थलांतरित होणार... ह्या बोंगाड्या गुंडांची त्यांच्या बंदुका-माणसांसकट मला गरज आहे... ते चुका करतील... त्यांचा सोन्याचा वाटा वाहून नेताना त्यांना अडचणी येतील. काहीजण पकडले जातील. काही मरतील... ते सगळे एक्स्ट्रॉ कलाकार आहेत... हे नाटक संपल्यावर त्यांचं काय होतं यात मला कसलंही स्वारस्य नाही..."

आश्चर्य म्हणजे सकृतदर्शनी अत्यंत अवघड व गुंतागुंतीची वाटणारी ही योजना प्रत्यक्षात येते. जेम्स बाँडला क्षणभरही मोकळे ठेवले जात नाही... त्याच्यावर ऑडजॉब हा गोल्डफिंगरचा राक्षसी ताकदीचा हरकाम्या कोरियन ड्रायव्हर कायम लक्ष ठेवून असतो...

गोल्डफिंगर एखाद्या युद्धाच्या मोहिमेप्रमाणे जय्यत तयारी करतो.

पहिले पथक– सबमशीनगन घेतलेले चढाई पथक.

दुसरे पथक– तिजोरीच्या जागेतून पहारेकरी व कर्मचारी यांना बाहेर काढण्यासाठी स्ट्रेचर वाहून नेणाऱ्यांचे.

तिसरे पथक– फोर्ट नॉक्सच्या सोन्याच्या तिजोरीच्या संरक्षक भिंती फोडण्यासाठी छोटा 'स्वच्छ' अणुबाँब उडवणारे पथक.

चौथे पथक– संरक्षक गणवेश घालून सोन्याच्या विटा ट्रक्सपर्यंत नेणारे पथक.

गोल्डफिंगर हा एक प्रतिभावंत कलाकार होता... गुन्हेगारीतला शास्त्रज्ञ...

फोर्ट नोक्सवर दरोडा घालण्याची त्याची ही अफलातून योजना कोणालाही भयचकित करावी अशीच होती.

जेम्स बाँड ही मोहीम त्याच्यावरच उलटवतो. "तू इंग्लिश माणसांना फार कमी लेखतोस. त्यांची गती मंद असेल पण ते पोहोचायचं तिथं पोहोचतात. रशियात तू सुरक्षित राहशील असं तुला वाटतंय... पण मला नाही तसं वाटत."

गोल्डफिंगर ज्या विमानातून रशियाकडे निघाला आहे, त्यात जेम्स बाँडही असतो. त्याच्यावर लक्ष ठेवणारा कोरियन ऑडजॉबही असतो आणि त्या मोहिमेत सामील झालेली बायकांची गँग चालवणारी पुसी गॅलोरही असते... त्या विमानात तीन टन सोन्याच्या विटाही असतात...

जेम्स बाँड त्या विमानातून सुटण्यासाठी अफलातून युक्ती लढवतो. विमानाच्या एका खिडकीची काच फुटावी अशी क्लुप्ती लढवतो. त्यामुळे येणाऱ्या वाऱ्याच्या झोतात ऑडजॉब खेचला जातो.

...त्या विमानातून जेम्स बाँड लंडनच्या गॅन्डर नियंत्रण केंद्राशी आणीबाणीचा संपर्क साधतो, "आयडलवाइल्ड या ठिकाणी जी-एएलजीवाय स्पीडबर्डचं अपहरण झालं. ह्या अपहरणाला जबाबदार असणाऱ्या माणसाला मी मारलंय. केबिनमधला हवेचा दाब घालवून विमान अंशत: निकामी केलंय... बंदूक दाखवून विमानातल्या कर्मचाऱ्यांना शरण आणलंय... गूज बे पर्यंत पोचण्याएवढं इंधन आमच्याकडे नाही... जवळ उतरावं लागेल. समुद्रात आमचे विमान कोसळेल...'

'रडार वर आमचे लक्ष राहील... तुमच्या स्वागतासाठी आम्ही तयार असू' असा प्रतिसंदेश येतो.

आणि जेम्स बाँड अखेर जायबंदी होऊन का होईना पण मिस पुसी गॅलोरबरोबर सुरक्षित स्थळी अवतरतो.

फोर्ट नॉक्सवरील महत्त्वाकांक्षी दरोड्याची ही अफलातून योजना वाचताना (किंवा चित्रपटात बघताना) वाचक त्यात पार गुंतून जातो. जेम्स बाँडच्या एकूणच थरारकथांमध्ये गोल्डफिंगर सोन्यासारखीच झगमगीत, चकचकीत वाटते.

**भारतीय वाचकांना गोल्डफिंगर विशेष आवडते; गोल्डफिंगर सोन्याच्या पत्र्याची कार घेऊन दरवर्षी भारतात येत असे आणि ती येथे विकून परत जात असे.**

भारतीय वाचकांना गोल्डफिंगर विशेष आवडते; कारण १९६० च्या सुमाराला भारतात सोन्याची चोरटी आयात मोठ्या प्रमाणावर होत असे. गोल्डफिंगर सोन्याच्या पत्र्याची कार घेऊन दरवर्षी भारतात येत असे आणि ती येथे विकून परत जात असे. त्याच्या कारचे हे रहस्य त्यावेळी कस्टमला उलगडले नव्हते. गोल्डफिंगर आणि भारत यांचे नाते विशेष होते हे मात्र खरे!

**पृष्ठे : २४० ● किंमत : १८० रु. ● सभासदांना : १३५रु. ● पोस्टेज : २५रु.**

**यशोधरा काटकर**

# थर्ड पर्सन




| १६०रु. | पोस्टेज २५रु. |
|---|---|

या कथा महानगरीय तरुण स्त्रीमनाचे भावविश्व यशस्वीपणे रेखाटणारी शब्दशिल्पे झाली आहेत. स्वत:चेच एक स्वतंत्र कलात्म विश्व निर्माण करणाऱ्या अशा ह्या कथा इतर बहुतेक तरुण स्त्रीवादी लेखिकांच्या कथांपेक्षा एकदम वेगळ्या आणि दर्जेदार वाटतात. कारण त्यांना कुठल्याही वादाचे, अभिनिवेशाचे, पुरुष-विरोधी धोपट रागालोभाचे तत्त्वज्ञान माहित नाही. त्या निरभिनिवेश असल्याने अधिक प्रभावी वाटतात.

***-डॉ. आनंद यादव***




**मध्यमवयातील पत्नीवर आपल्याच घरातून हद्दपार होण्याची पाळी आली तर-**

# हद्दपार

**ह. मो. मराठे**




'हद्दपार' ही ह. मो. मराठे यांची कादंबरिका. 'कथाचक्र' म्हणून तिचा उल्लेख स्वत: ह.मों.नीच केला आहे. तीच पात्रे घेऊन तीन कथांच्या किंवा टप्प्यांच्या रूपात आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या कथावस्तूची पेशकश करण्याचा प्रयोग ह.मों.नी केला आहे. अर्थात सलग वाचल्यानेही काही फरक पडत नाही. तीन प्रकरणांची कादंबरिका असे तिचे स्वरूप आहे असे म्हटले तरी चालेल. १९७६-७७ मध्ये ही कादंबरिका प्रथम दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. १९८० मध्ये ती पुस्तकरूपात आली. तिची तिसरी आवृत्ती आता 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे बाजारात आली आहे. ही कादंबरिका लिहिली तेव्हा भारतात जनता पक्षाची राजवट होती. त्या काळातील संदर्भ प्रारंभी येतात.

शीला ही अर्थशास्त्राची बी.ए., तिचा नवरा पिंपुटकर अर्थशास्त्राचा एम.ए. बँकेत अधिकारी. (त्याला पृष्ठे प्राध्यापकही म्हटले आहे) (पृष्ठ ४८, ५९) नोकरी करायची असे तिच्या मनात असते; परंतु नवऱ्याचे मत असते की ''लग्नानंतर पहिले वर्ष-दीडवर्ष बायकोनं नवऱ्याला फक्त सर्व प्रकारची सुखं मनसोक्त द्यावीत. नंतर हवं तर एम.ए. वगैरे करावं.'' त्यामुळे ती संसारात गुरफटते. बँकेतील नोकरीबरोबर नवरा लेख लिहू लागतो. त्याचा पाचवा लेख प्रसिद्ध होतो तेव्हा विनयचा जन्म होतो. त्याचं पहिलं पुस्तक प्रसिद्ध होतं तेव्हा त्याची दुसरी मुलगी रांगत असते आणि त्याची पहिली कादंबरी लिहून होते तेव्हा तिसरी मुलगी घरात येते... बँकेतील नवऱ्याचे करियर झेपावत राहते; ती मात्र मुले, स्वयंपाकपाणी, घराची आवराआवर यात गुंतत जाते. नवऱ्याचे आणि तिचे जग वेगवेगळे होते. ती फक्त एक बायको... तीन मुलांची आई... दळणाकांडणाची काळजी करणारी एक सामान्य संसारी बाई... आपली ही प्रतिमा

**''मिसेस घाटे अतिशय बुद्धिमंत स्त्री आहे. म्हणून ती मला आवडते. तिच्याशी गप्पा मारणं हा एक बौद्धिक आनंद आहे. नाहीतर तू! संसारी. अजागळ काकूबाई नुसती!...''**

आपल्याला वेडावून दाखवत आहे असे तिला जाणवे. नवऱ्याचा आपल्यातील, घरातील इंटरेस्ट कमी होत आहे असे तिला जाणवते.

अशी वीस वर्षे उलटतात आणि या दांपत्याच्या जीवनात पहिले वादळ येते.

बँकेतच काम करणाऱ्या मिसेस घाटे यांच्याशी नवऱ्याची घसट वाढत जाते. तो त्याबद्दल पत्नीला स्पष्टच सांगतो, 'मिसेस घाटे अतिशय बुद्धिमंत स्त्री आहे. म्हणून ती मला आवडते. तिच्याशी गप्पा मारणं हा एक बौद्धिक आनंद आहे. नाहीतर तू! संसारी. अजागळ काकूबाई नुसती!...'

तेव्हा ती म्हणते, ''वीस वर्षांपूर्वी... मी म्हणत होते, मी पुढला अभ्यास करते. तर तुम्हीच म्हणालात ना, की काही नको अभ्यास वगैरे इतक्यात. आणि मग एकामागोमाग एक पोरं कोणी बांधली माझ्या गळ्यात? मला संसाराच्या रामरगाड्यात कोणी गुंतवून ठेवलं?...''

मुलांदेखत भांडण नको म्हणून तो तिला आर्ट फिल्मला घेऊन जातो.

मिस्टर अँड मिसेस घाटे हे देखील आर्ट फिल्मला आलेले असतात.

परत येताना रिक्षातच वाद सुरू होतो.

''तुम्हाला आवडला ना सिनेमा?''

''तुला आवडला का? अर्थात समजला तर आवडणार म्हणा!''

''समजायला मी काय मिसेस घाटे थोडीच आहे? मी आहे एक निर्बुद्ध, संसारी काकूबाई. गावंढळ. पोरा-संसारात बुडालेली.''

शेवटी ती म्हणते, ''तुम्ही घटस्फोट घ्या माझ्याशी. मुलांची काळजी घ्या. माझी काळजी करू नका. मी तुम्हाला साजेशी उरलेली नाही. तुम्ही खूप पुढं गेला. मी खूप मागं राहिले.''

आपल्याच जगातून आपल्याला हद्दपार केलं गेलं आहे असं शीलाला वाटतं. काल-परवापर्यंत तिचं स्वत:चं जग होतं. नवरा, मुलं, घर, भांडीकुंडी, सामानसुमान यांनी भरलेलं स्वत:चं जग होतं. नवऱ्यावर प्रेम असणारी. त्याचा अभिमान बाळगणारी अशी ती पत्नी होती.

पण आता ते जग 'तिचं' राहिलं नव्हतं. ती त्या जगातून बाहेर फेकली



गेली होती.

यापुढं या दोघांचे मार्ग वेगळे होणार हे नक्की! त्यासाठी काही काळ लागणार!

शीला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचे ठरवते. टेलिफोन ऑपरेटिंगचा कोर्स करते. रिसेप्शनिस्ट, फायलिंग, पर्सनल सेक्रेटरी– काहीतरी जॉब त्यामुळे मिळेल. इन्स्टिट्यूटचा संचालक वर्मा तिला धीर देतो. तिच्या वेषभूषेत, टापटिपीत फरक पडतो.

''रिअली, ममी, यू लूक सो स्मार्ट! तू किती बदलली आहेस गेल्या वर्षभरात...'' तिला कॉलेजात जाणारा मुलगा विनय म्हणतो.

**''माझ्या बाबतीतला तुमचा अंदाज चुकला, पिंपुटकर. वुई आर फ्रेंडस्... माझे पुढचे प्लॅन्स आधीच ठरले आहेत. एका बंगाली माणसाबरोबर लग्न ठरवलंय मी.**

इकडे तिचा नवरा पिंपुटकर मिसेस घाटे यांना सांगतो, ''येस, आय लव्ह यू. तुमच्यात मी गुंतलोय. खोलवर... तुमच्या व्यक्तिमत्त्वानं मी प्रभावित झालो. नंतर दिपून गेलो. मग गुंतत गेलो... प्लीज, मिसेस घाटे, माझ्याशी लग्न करा.''

मिसेस घाटे विचारते, ''आणि तुमच्या बायको-मुलांचं काय?''

''मी सांगून टाकलंय तिला– माझा तुझ्यातला इंटरेस्ट संपला. मी तुझ्याशी घटस्फोट घेईन. दुसरं लग्न करीन– मनात आणलं तर– तुमच्याशी–''

''माझ्या बाबतीतला तुमचा अंदाज चुकला, पिंपुटकर. वुई आर फ्रेंडस्... माझे पुढचे प्लॅन्स आधीच ठरले आहेत. एका बंगाली माणसाबरोबर लग्न ठरवलंय मी. तो अमेरिकेत असतो... मलाही एखाद्या अमेरिकेतील युनिव्हर्सिटीत जॉब मिळेल... माझ्या आताच्या नवऱ्याला सोडायचं हेही ठरलंय. असल्या नि:सत्त्व माणसाची पत्नी होऊन रहायला माझं मन तयार नाही.''

''तुम्ही अमेरिकेत जाऊन तरी सुखी व्हाल?''

''मला माहीत नाही. कदाचित माझा हाही निर्णय चुकीचा असेल... मला काय हवंय हे माझं मलाच कळत नसेल. कदाचित माझ्यासारख्या बायकांच्या वाट्याला यापुढं फक्त असमाधानाच येणार असेल.''

आपल्याला तिनंही तिच्या आयुष्यातून सहज हद्दपार केलंय हे त्याला कळून चुकतं.

तो पुन्हा आपल्या पत्नीकडे जाऊ पाहतो. ''तू काही गोष्टी फार मनाला लावून घेतल्या आहेस. तेव्हा मी रागाच्या भरात बोललो. तेव्हा मला धुंदी आली होती– मिसेस घाटे माझ्यावर मोहीत झाल्याची... पण आता काही नाही शिल्लक उरलेलं त्यातलं... ती अमेरिकेला चाललीय... इथली सगळी नाती तोडून–

तिथल्या कोणाशी तरी लग्न करतेय... चुकलो मी... तुला फार दुखवलं मी... क्षमा कर मला.''

'झालं गेलं विसर सगळं' असं तो म्हणतो तेव्हा ती काही काळ विचलित होते. पण नंतर म्हणते, ''मी वर्माकडे जातेय... तो नोकरीचं जमवणार आहे... माझं जग मला शोधायलाच हवं.''

वर्माने शब्द टाकल्याने तिला सावंतच्या कारखान्यात नोकरी मिळते. पहिल्या पगारातून ती वर्माला भेटवस्तू घेऊन जाते... वर्माशी तिची घसट वाढते. एकदा ती नवऱ्याला सांगते, ''तुम्ही मला पत्नित्व दिलं, मातृत्व दिलं. पण वर्मांनी मला स्वत्व दिलं. व्यक्तित्व दिलं. अस्मिता दिली. फार कृतज्ञ आहे मी त्यांची!''

**कॉलेजला जाणारा मुलगा विनय घर सोडून जायचे म्हणतो. त्यावेळी तिला सांगतो, ''तू सरळ मिस्टर वर्माशी लग्न करून टाक. तू आमची आई राहिली नाहीस. बाबांची बायको नाही राहिलीस.**

कॉलेजला जाणारा मुलगा विनय घर सोडून जायचे म्हणतो. त्यावेळी तिला सांगतो, ''तू सरळ मिस्टर वर्माशी लग्न करून टाक. तू आमची आई राहिली नाहीस. आमची. बाबांची बायको नाही राहिलीस. तुम्ही बोलता तेव्हा ओरबाडून खाता एकमेकांना. रक्तबंबाळ करता शब्दांचे घाव घालून.''

पण तिचा नवराही एकदा म्हणतो, ''इतकं तुला त्या वर्माविषयी वाटतं तर लग्नच का करीत नाहीस त्याच्याशी?''

मिसेस घाट्यांचा नकार, पत्नीचे कडूजार शब्द, तिरस्कार, पोरांनी दाखवलेला तुटकपणा– यामुळे पिंपुटकर अस्वस्थ होतो. हीनदीन, एकटा... घर म्हणजे तुरुंग वाटतो त्याला.

शीलाला तिचा बॉस एकदा विचारतो, ''एक चांगली परदेशी फिल्म बघायला जाणार आहे... कंपनी देणार का?''

ती होकार देते. चित्रपट तिला आवडतो. त्याविषयी ती बोलू लागते तेव्हा सावंत 'छान छान' पलीकडे काही प्रतिक्रिया देत नाही. तिला नवाच शोध लागतो, ''पुरुषही बऱ्यापैकी बुद्धू असू शकतात.'' (६५) सावंतांना फिल्ममधलं काहीसुद्धा कळत नाही हे तिच्या लक्षात येते.

नवरा म्हणतो, ''शीला, हे फार पुढं चाललंय प्रकरण. मला असह्य झालंय. याला काय संसार म्हणतात? आनंद नाही, सुख नाही... आस्था-विश्वास नाही. एक पोरगा हातून निसटला. मुली आतल्या आत कुढत असतात... थोबाड फोडीन तुझं.''



''ते आता शक्य नाही... कदाचित गेल्या वर्षी शक्य झालं असतं. गेल्या वर्षापर्यंत मी पूर्णपणे तुमच्या अधीन होते. डोक्यावर घेणारे तुम्ही... लाथा घालणारे तुम्ही. आता मी कोणीतरी आहे...'' (६७) शीला हे सांगताना वर्माचे नाव माझ्या आयुष्याशी आता जोडले गेले आहे असेही बोलून जाते.

त्याचवेळी तिच्या कंपनीची मालकी बदलते. तिची नोकरी जाते. नवे मॅनेजर कर्नल भुस्कुटे यांना भेटून ती विनवणी करते, ''माझी परिस्थिती... माझा नवरा घटस्फोट देणार आहे... मी उघड्यावर पडेन... माझ्यासारख्या अडचणीत सापडलेल्या स्त्रीला... आय नीड युवर हेल्प. आय नीड धीस जॉब व्हेरी मच.''

**पण वर्मा स्पष्टच सांगतो, ''मला जमणार नाही. मी लग्न करून सुखी होणार नाही. तुझ्याशी एकनिष्ठ कधीच राहणार नाही... मी लग्न केलं तरी ते एखाद्या तरुण मुलीशी करीन.''**

पण तिच्या विनवणीचा काही उपयोग होत नाही.

ती वर्माकडे जाते... 'माझी नोकरी संपली' म्हणून रडू लागते... ''वर्मा, माझं घराचं, संसाराचं जग संपलं... माझ्यापासून तुटून निघालं. तेव्हा मला दुसरं काहीतरी हवं होतं. ते जग, ते नवं आयुष्य तुम्ही मिळवून दिलं... मला नवा जॉब हवाय.''

वर्मा अडचणी सांगतो, ''या वयात... तुला जॉब हवाय. पण...''

''म्हणजे मी प्रौढ दिसते–''

''प्रश्न माझा नाही शीला; तू मला चांगली तरुण, ॲक्टिव्ह, उत्साही दिसतेस.''

''मग लग्न करा माझ्याशी! कराल?... मी तुम्हाला किती मानते! इतरांनी नाकारलं ते तुम्ही मला दिलं. आय लाइक यू, वर्माजी. मला फार निराधार वाटतंय...''

पण वर्मा स्पष्टच सांगतो, ''मला जमणार नाही. मी लग्न करून सुखी होणार नाही. तुझ्याशी एकनिष्ठ कधीच राहणार नाही... मी लग्न केलं तरी ते एखाद्या तरुण मुलीशी करीन.''

शीलाचा तो आधारही निखळून पडतो...

ती घरी येते. नवरा म्हणतो, ''आपण पति-पत्नी म्हणून राहू. पण एकमेकात गुंतलेले कधीच राहणार नाही.''

ती नवऱ्याला सांगते, ''तुम्ही पुरुष आहात. पुरुष कधीच म्हातारा होत नाही. म्हातारी होते ती बाई... मी पुरी म्हातारी झाले नसेन, तरी पण...'' हेही

**पुरुषाचा बाहेरख्यालीपणा हा समाज काही प्रमाणात गृहीत धरून चालतो, स्त्री तसा काही प्रकार करू पाहते तेव्हा कुटुंबाचे अधिष्ठानच धोक्यात येते. स्त्रीला स्वतंत्रपणे जगण्यासाठीही समंजस पुरुषावरच अवलंबून राहावे लागते.**

कठोर सत्य ती पचवते.

'हद्पार'मध्ये ह. मो. मराठे यांनी तीस वर्षांपूर्वी मराठी मध्यमवर्गीय कुटुंबात निर्माण होऊ शकणाऱ्या एका समस्येची उकल करून दाखवण्यासाठी या कथाचक्राची उभारणी केली.

लग्नानंतर पुरुष आपल्या बौद्धिक क्षेत्रात, व्यावसायिक पातळीवर प्रगती करीत राहतो. स्त्री मुलाबाळांचे संगोपन आणि घरप्रपंच यात गुंतून पडते. नवऱ्याने अन्य कोणा स्त्रीमध्ये रस घेऊन, पत्नीला तुच्छतेची वागणूक देणे सुरू केले, घटस्फोटाचे भय दाखवले तर तिने काय करावे? स्वत: आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी जॉब करून, स्वत:चे वेगळे घर थाटण्याची हिंमत दाखवावी; तसे आव्हान स्वीकारावे... नव्याने आयुष्याची घडी बसवावी... परंतु तसे करणे पती काय किंवा पत्नी काय, दोघांनाही वास्तवात आणणे शक्य न झाले तर? ज्या नव्या स्त्रीचा बौद्धिक सहवास प्रिय वाटतो, ती एरव्ही प्रतिसाद देत असली तरी लग्नाचा विचार मात्र फेटाळून लावते तेव्हा पिंपुटकरचा होणारा तेजोभंग आणि भ्रमनिरास; तर नोकरीमुळे मिळालेल्या आर्थिक स्थैर्याचा आधार उन्मळून पडल्याने शीलाला अनुभवावा लागणारा अगतिकपणा– या पति-पत्नीच्या विसंवादात मुलांची होणारी कुतरओढ आणि नापसंतीची प्रतिक्रिया– परस्पर भांडणामुळे दुरावलेली मने– तरीही एकत्र राहण्यातील अपरिहार्य अवघड असहायता... या सर्वांतून आजच्या वैवाहिक जीवनातील असुरक्षिततेचे एक प्रलयंकारी स्वरूप पुढे येते. पुरुषाचा बाहेरख्यालीपणा हा समाज काही प्रमाणात गृहीत धरून चालतो, स्त्री तसा काही प्रकार करू पाहते तेव्हा कुटुंबाचे अधिष्ठानच धोक्यात येते. स्त्रीला स्वतंत्रपणे जगण्यासाठीही समंजस पुरुषावरच अवलंबून राहावे लागते.

ह. मो. मराठे यांनी या कथावस्तूची उभारणी करताना शीलाला केंद्रस्थानी ठेवले आहे आणि आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या अस्मिताशोधाच्या प्रयत्नावर भर दिला आहे असे मानता येईल. परंतु पुरुषप्रधान समाजव्यवस्थेबद्दलच्या वर्चस्वाचे वास्तव त्यांना डावलता येत नाही. त्यामुळे एक मिसेस घाटे गेली तरी दुसरी कोणी मिसेस श्रीवास्तव बौद्धिक कंपनीसाठी पिंपुटकरांना मिळते आणि तिच्याबरोबर सेमिनारच्या निमित्ताने परगावी जाण्याची, तिच्या सहवासाची संधीही त्यांना उपलब्ध



असते. बौद्धिक कंपनी देणाऱ्या स्त्रिया ही जमात या कथाचक्रात प्लेटॉनिक पातळीवर वावरताना दिसते; परंतु जॉब करणाऱ्या स्त्रीबाबत तिचे तारुण्य आणि तिचे शरीर हेच पुरुषांना अधिक मोहात पाडते असे कारखानदार सावंत किंवा त्यांचे श्रीमंत दोस्त यांच्याबाबत आढळते.

**वर्षानुवर्षे एकत्र राहिल्याने कौटुंबिक नात्यात येणारा तोचतोचपणा, आर्थिकदृष्ट्या परावलंबी राहिल्यास होणारी स्त्रीची कुचंबणा, ताणतणाव. आजचा पुरुष वा स्त्री यांनाही जाणवत राहतातच.**

समाजव्यवस्थेतील हे असंतुलन तीस वर्षांपूर्वी होते; तसेच आजही दिसते. तरीही या तीस वर्षांत खूप फरक पडला आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील भरपूर संधींमुळे व उत्तम वेतनश्रेणीमुळे आजच्या नवीन जीवनशैलीत 'शीला'प्रमाणे अगतिक होण्याची पाळी येण्यापेक्षा मानसिकता बदलण्याची शक्यता जास्त दिसते. 'लग्न', 'कुटुंब', 'संसार' याकडे बघण्याच्या दृष्टीतही त्यामुळे फरक पडत जाईल. आजच्या संदर्भात पिंपुटकर-शीला दांपत्याची कथा लिहिली गेली तर तिची उभारणी अगदी वेगळ्या प्रकारे होऊ शकेल.


परंतु 'हद्पार'मधील तीस वर्षांपूर्वीची जी मूलभूत मांडणी आहे, ती आजही तितकीच वैध व वास्तव आहे. वर्षानुवर्षे एकत्र राहिल्याने कौटुंबिक नात्यात येणारा तोचतोपणा, आर्थिकदृष्ट्या परावलंबी राहिल्यास होणारी स्त्रीची कुचंबणा, नवऱ्याच्या वा पत्नीच्या घराबाहेर असणाऱ्या मित्रपरिवाराचे ताणतणाव– आजचा पुरुष वा स्त्री यांनाही जाणवत राहतातच. वैवाहिक जीवनाशी आणि योनिशुचितेशी संबंधित नीतिमूल्यांच्या सामाजिक चौकटीत, व्यक्तीच्या स्वातंत्र्याला आणि मुक्त विचारांना स्थान मिळणे आजही दुरापास्तच आहे हे विसरता येत नाही.

'हद्पार'चा एकूणच पात्र-पसारा मर्यादित आहे; परंतु ज्या मूलभूत समस्येचा मागोवा ह. मो. मराठे घेतात, तिचे वेगवेगळे पैलू, तिच्यातील वेगवेगळ्या शक्यता यांचा धांडोळा घेण्यात हे कथानक कुठेही कमी पडत नाही. ह.मों.च्या चित्रदर्शी शैलीची आणि प्रसंग उभे करण्याच्या कौशल्याची हातोटी वाचकाला खिळवून ठेवते.

ह.मों.च्या आज बाजारात उपलब्ध नसलेल्या सर्वच कादंबऱ्या पुर्नप्रकाशित करण्याची गरज आहे.

❐

**पृष्ठे : ८८ ● किंमत : ७० रु. ● सभासदांना :५०रु. ● पोस्टेज :२०रु.**




झटपट

**व्यक्तिमत्वविकास**

स्वपरिवर्तनाचे नवीन तंत्र

**संजीव परळीकर**

**५०रु. पोस्टेज २०रु.**

या 'इन्स्टन्ट'च्या जमान्यात यशसुद्धा इन्स्टन्ट हवे आहे. पण तसे ते मिळत नाही... कारण त्यासाठी परिश्रम करावे लागतात,

पण इथे कोणालाही थांबायला वेळ नाही...

स्पर्धेत टिकून राहण्यासाठी स्वत:मध्ये कोणते बदल करावेत व ते कसे करावेत हेही कित्येकांना माहीत नाही. यासाठीच हे पुस्तक. यातील सूचना अंमलात आणल्यात, तर कमीतकमी दिवसात तुम्ही स्वत:मध्ये अनेक महत्वाचे बदल घडवून यश खेचून आणू शकता.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**चित्रनगरी आणि चित्रपट कलावंत यांच्यावरील काव्यमय टीकाटिप्पणी**

## ब्लॅक अँड व्हाइट

**संजय चुरमुरे**




'ब्लॅक अँड व्हाइट' हा एक कवितासंग्रह आहे. चित्रपट कलावंत आणि चित्रनगरीतील भिन्नविभिन्न घटना-प्रसंग यावर प्रकाश टाकणाऱ्या या अल्पाक्षरी रचना गीतलेखक संजय चुरमुरे यांच्या लेखणीतून उतरलेल्या आहेत.

'रात्रआरंभ' या पुरस्कारप्राप्त चित्रपटाचे गीतकार म्हणून प्रथम पदक्षेपातच प्रभावी ठरलेले संजय चुरमुरे यांना गीतलेखनाचे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. 'एक होती वादी' या दुसऱ्या चित्रपटाच्या गीतलेखनासाठी त्यांनी तीन पुरस्कार मिळवून हॅटट्रिक साधली. 'शोधयात्रा', 'योगा फॉल दि सोल' हे त्यांचे अल्बमही प्रसिद्ध आहेत.

निरनिराळ्या कलावंतांच्या भेटीगाठी, चित्रपटनिर्मितीतील अनेकविध पैलू व पेचप्रसंग यांचे नित्य अवलोकन घडत असल्याने त्याबद्दलही त्यांना काव्यस्फुरण होणे स्वाभाविक आहे.

छोट्या छोट्या कवितांतून मोजक्या शब्दांत व्यक्तिचित्रे वा व्यक्तिमत्त्वे उभी करण्याचा त्यांना लळा आहे. विनोदी अंगाने चारोळ्या वा वात्रटिका लिहिणे व कोणाची तरी खिल्ली उडवणे यासाठी एक वेगळी खट्याळ, खोडकर प्रतिभा लागते. संजय चुरमुरे यांना तशा खोडकरपणाचे आकर्षण नाही. त्यांना कोणाच्या फिरक्या घेणे फारसे मानवत नाही. त्यांना व्यक्तिमत्त्वाचे सकारात्मक पैलू विशेष भावतात आणि त्याबद्दल वाटणारे आश्चर्य वा नवल कौतुकभरल्या शब्दांत प्रकट करावेसे वाटते. त्याच भावनेतून ते अमिताभ बच्चन, देव आनंद, राजेश खन्ना, नाना पाटेकर, सलमान खान, शाहरूख खान, माधुरी, गुलजार, नूतन, आमीर खान, स्मिता पाटील, मल्लिका, वहिदा, संजय दत्त, हेलन, अमोल पालेकर, ऐश्वर्या, सैफ अली, डॉ. लागू, व्ही. शांताराम, किशोरकुमार, मधुबाला अशा

**मल्लिका म्हणजे सेक्सची अख्खी मालिका... भूमिका छोटी असली तरी ती सर्व दाखवते. तसे तिने दाखवावे ही पब्लिकची अपेक्षा. वहिदा तिच्या उलट. आपला मान आणि शान सांभाळणार. नो चुंबन हे तिचे इमान.**

डझनावारी कलावंतांवर शब्दांची खैरात करतात. त्यावेळी त्यांच्या मनात आदर-कौतुक-आत्मीयता हेच भाव अधिक असतात. उणेदुणे काढण्याकडे त्यांचे लक्ष नसते. व्यंग्यावर वार करणे त्यांच्या वृत्तीत नाही. विसंगती शोधतानाही सकारात्मकतेवर त्यांचा जास्त डोळा असतो.

गणपत पाटील नाच्याची भूमिका करतो; पण ती करताना त्या भूमिकेत कारुण्याची किनार तो विनोदाच्या अंगाने देतो याकडे ते लक्ष वेधतात. पडद्यावर व्हिलनची भूमिका करणारा प्राण हा जीवन सच्चेपणाने, सज्जन म्हणून जगला; प्रत्यक्ष आणि मुखवटा यातली सीमारेषा तो जपत असे. घरी जाताना मुखवटा स्टुडिओतच ठेवून जात असे, असे चुरमुरे दाखवतात.

निळू फुले हे फुलाप्रमाणे फुलले, दरवळले; कुठलाही रोल दिला तरी त्याला ते चारचांद लावत राहिले असे प्रशस्तिपत्र ते देतात.

नूतन म्हणजे अभिनयाची सौंदर्यसम्राज्ञी. मऊ मेणाहून मुग्ध, मधुर हावभाव, तिचे अधरच नव्हे तर देह, आत्मा आणि मन सारे एकवटून हसतात; अंगांगावर एक अलगद, रेशमी मोरपिसारा फुलून आलेला– अशीच तिची अभिनयशैली!

राजकुमार म्हणजे हिटलरचा अवतार! समोरचा माणूस थंडगार पडावा असा डॉयलॉग तो मारणार! एकेकाळचा तो राजकुमार; त्यामुळे त्याच्या सगळ्या अटी प्रोड्युसर मानणार!

आमीर खान म्हणजे बुद्धी-कीर्तीचा परीस. त्याच्या आकांक्षांपुढे गगन ठेंगणे. ऑस्करसाठी 'लगान'चे नामनिर्देशन– आव्हानासाठी हजर त्याची जान.

दादा आणि गोविंदा– ॲक्टिंगमध्ये डावे-उजवे– विनोदाचे गनिमी कावे त्यांच्याकडून शिकावे. मनोरंजन त्यांनीच करावे.

मल्लिका म्हणजे सेक्सची अख्खी मालिका. भूमिका छोटी असली तरी ती सर्व दाखवते. तसे तिने दाखवावे ही पब्लिकची अपेक्षा.

वहिदा तिच्या उलट. आपला मान आणि शान सांभाळणार. नो चुंबन हे तिचे इमान.

संजय दत्तचा प्रवास नायक ते खलनायक असा! भरकटत चालला पोरगा म्हणून बापाने रॉकी काढून त्याला हीरो केले. दुर्जन असो वा सज्जन, त्याची



दृष्टी सारखीच! मित्रासाठी जीव देणारा, हृदयाने श्रीमंत असणारा! (टाडा कोर्टात खेटे घालण्याची पाळी बिचाऱ्यावर यावी ना! तो उल्लेख चुरमुरे यांनी टाळला आहे उदारपणे!)

**'ऐश्वर्या राय'चे डोळे निळ्या आसमंताशी स्पर्धा करणारे. जादूचे जणू जाळे. कांती इतकी नाजूक की स्वप्नातली जणू परी. नजरेतला भारही न सोसावा अशी नजाकत! लाखोंना दिवाणे करण्याच्या, लाख कळा तिला अवगत!**

हेलन कवीला निर्व्याज पाखरासारखी वाटते. सारखी तिची स्थलांतरे चालू असतात.

चंकी पांडे सारखा चालत असतो. त्याच्या चालण्याला अंत नाही. मंजिलाचा नाद सोडूनही लाभ झाला नाही. जीवनाला दोष कशासाठी द्यायचा?

अमोल पालेकर– अंधार पिऊन स्वत: जळून प्रकाश देतो. चंद्रासारखा उदात्त आकान्त घेऊनही शांत राहतो.

दिलीपकुमार– दगडालाही देवपण देणारा समर्थ कलावंत. त्याचा व्याकुळपणा इतका की समुद्रही अपुरा पडावा.

शशी कपूर– गालावर खळी पडून मिस्किल हसणारा. सहकलाकारांशी बिनधास्त नाचगाणे करणारा. हिरोपण जपत घरंदाजपणा दाखवणारा.

'ऐश्वर्या राय'चे डोळे निळ्या आसमंताशी स्पर्धा करणारे. जादूचे जणू जाळे. कांती इतकी नाजूक की स्वप्नातली जणू परी. नजरेतला भारही न सोसावा अशी नजाकत! लाखोंना दिवाणे करण्याच्या, लाख कळा तिला अवगत!

किशोरकुमार– गाण्यातून क्षणात दु:खाचा सागर उभा करणारा तर क्षणात सुखाची झालर फुलणारा सप्तसुरांचा राजकुमार. फुलपाखरू होऊन सात सुरांवर आयुष्यभर स्वैर झेपावत राहणारा!

मधुबाला– गोड हसणं, निरागस बघणं, पाहताक्षणी प्रेम जडणं, हृदयात पासपोर्ट साइज फ्रेम करून वर्षानुवर्ष तसंच राहणं.

ललिता पवार– सुनेला छळणारी चेटकीण. दु:खाची पाठराखीण. पण हृदय मऊ मेणाहून. भूमिका उंच शिखरावर नेण्यात सराईत.

आशा भोसले– साठीची झाली तरी सर्वांना अशी बेहोष करते की बाविशीतली वाटावी; असा स्वर तिचा झिंगलेला!

नर्गिस– चित्रपटसृष्टीत चंदनी उदबत्तीसारखी झिजली. तेवत राहिली. मदर इंडियात विलीन झाली.

काजोल– सावळ्या सौंदर्याची कस्तुरी. लोभस, अल्लड, खट्याळ स्वप्ने

**ही चित्रनगरी म्हणजे एक चक्रव्यूह आहे. या नगरीत येण्याचे मार्ग अनेक आहेत; पण बाहेर पडण्याचे मार्ग दुर्धर आहेत. प्रत्यक्ष भगवान कृष्ण तुमच्या मदतीला आला तरी तो डमी ठरावा इतके सारे मुत्सद्दी!**

तिच्या हसऱ्या डोळ्यांत काजळरात्री नटली.

राज कपूर– ज्याच्या कामात सत्त्व होतं, काहीतरी दिव्यभव्य करावं याचं स्वप्न होतं, असं चित्रपट नसानसात भिनलेलं व्यक्तिमत्त्व.

गुरुदत्त– दुःखाचं अंतिम टोक धरून घरातून निघालेला गुरुदत्त– सागरानंही मागं वळून बघावं इतका प्यासा– अतृप्त... बरेच काही सांगून व्यवहारी जगापासून दूर जाणारा. कथा-पटकथा, गाणी यांचे अद्‌भुत मिश्रण करणारे वेगळेच रसायन.

आशुतोष गोवारीकर– बर्फासारख्या थंडगार समाजाला जागं करणारी, वेदना-संवेदनांनी भावविश्व उभं करून सातसमुद्रापलीकडे घेऊन जाणारा, सामाजिक आशय मांडून अव्यक्ताला व्यक्त करणारा.

मेहमूद– ह्या कॉमेडी किंगची पडद्यावरची हलकीफुलकी मस्ती बघून कुठलाही हीरो त्याच्यासह काम करायला घाबरत असे.

भालजी पेंढारकर– जमिनीवरून नाही, जमिनीच्या दोन फूट आतून चालणारा 'स्वयंप्रकाशी' साधा माणूस– प्रतिष्ठेचं कवच मुखावर न चढवता मुक्त, मनमोकळं होऊन प्रत्येकाशी वागणारा.

## चित्रनगरी : एक चक्रव्यूह

चित्रपटातील नटनट्यांबरोबर चित्रनगरीच्या दुनियेतील विविध दृश्ये टिपण्यातही संजय चुरमुरे स्वतःला मनःपूर्वक झोकून देतात.

या चित्रपटनगरीत लोक येत-जात असतात; नव्या उमेदीनं ती लखलख उजळत राहते. घेणारा घेत जातो. तिला त्यात आनंद असतो. कधी मृगजळ बनून ती चकवते; कधी गगनातील सूर्याप्रमाणे तेजस्वी प्रकाशाने सारे आसमंत उजळून टाकते. (चित्रनगरी, ८७)

ही चित्रनगरी समुद्राप्रमाणे अफाट. गंगोत्री येवो वा गटार, ती स्वागताला सदैव तयार! वादळवारा, मोडके होडके, विशाल गलबते– सर्वांना ती सामावून घेते. विशाल दृष्टी असणारी चित्रसृष्टी द्रष्टेपणातही अग्रेसर. (१३९)

ही चित्रनगरी म्हणजे एक चक्रव्यूह आहे. या नगरीत येण्याचे मार्ग अनेक आहेत; पण बाहेर पडण्याचे मार्ग दुर्धर आहेत. तुम्हाला चक्रव्यूहात फसवण्यासाठी



**या चित्रनगरीत नटी होण्यासाठी प्रवेश करणारी नवयौवना नट दिग्दर्शकांच्या प्रेमचाळ्यांमध्ये आणि मद्य, रेस, पार्ट्यांमध्ये झुलत राहते आणि वय झाल्यावर 'बाई कर तोंड काळं. नवीन चेहरे लोकांना हवेत'**

सारेच टपून बसलेले; प्रत्यक्ष भगवान कृष्ण तुमच्या मदतीला आला तरी तो डमी ठरावा इतके सारे मुत्सद्दी! इथली माणसे अनपेक्षित वार करण्यात पटाईत; टाइट फिल्डिंग करण्यात सराईत, पाठीमागून हल्ला चढवण्यात निष्णात. (चक्रव्यूह, १०२)

मात्र कायमस्वरूपी शत्रू कुणीच नसतो. आजचा शत्रू उद्याचा मित्र होतो, आजचा मित्र उद्या शत्रू होतो. स्पर्धा जबरदस्त; कोणीच माणूस कधी स्थिर नसतो. प्रत्येकजण मुखवटा घालून फिरतो. ज्याला शत्रू जास्त तो येथे सर्वाधिक यश मिळवतो. शत्रूच्या खांद्यावर हात ठेवून गोड बोलून त्याचा काटा काढणे हा येथला शिरस्ता असतो. (शत्रू, ९८)

प्रत्येक कलाकार येथे कधी ना कधी जमाखर्चाचा आढावा घेतो. अनुभवाने जीवनाचा अर्थ कळू लागतो; पण त्यात कितीतरी वर्षे निघून जातात. त्यानंतर स्वार्थाचा खरा हे त्याला उमजते. वजा झालेल्या क्षणांची बेरीज म्हणजे स्वार्थ– हे कळले की जमाखर्चाची गरजही संपते. (जमाखर्च, ९३)

कीर्ती, धनसंपत्ती, ग्लॅमर यांच्या स्वप्नात रममाण होऊन या चित्रनगरीत नटी होण्यासाठी प्रवेश करणारी नवयौवना नट-दिग्दर्शकांच्या प्रेमचाळ्यांमध्ये आणि मद्य, रेस, पार्ट्यांमध्ये झुलत राहते आणि वय झाल्यावर 'बाई कर तोंड काळे. नवीन चेहरे लोकांना हवेत' असे शेरे ऐकत हैराण होते. (नटी, १३३)

येथे कलाकार येतो तो मनस्वी, तपस्वी; शून्यातून विश्व निर्माण करण्याची उमेद बाळगून. क्षितिज शोधता शोधता भरकटत जातो; संघर्ष करीत कोवळ्या सावल्यांची वाट बघत राहतो.

कला आणि व्यवहार यांची सांगड घालणे जमले तरच कलाकाराला येथे लोक सलाम करतात. आपल्याच धुंदीत मशगूल असणाऱ्याला इथे कुणी विचारत नाही. मागचा इतिहास आठवायला येथे वेळ नाही कुणाला. (समझ, ५६)

येथे हलक्या कानाचे कलाकार आहेत आणि चमचेगिरी करून पोट भरणारेही भरपूर आहेत. ज्याचे दुकान चाललेय त्याच्याकडे जायचे आणि लावालावीचे धंदे करायचे– याला येथे अंत नाही. (चमचे, ५५)

येथे निर्लज्ज सदा सुखी असतो. प्रसंग पाहून चेहरे बदलायचे, हावभाव बदलायचे, हाजी हाजी करायची, ही कला साधली की खाली हात घेऊन

> **आजचा हीरो म्हणजे दीड दमडीचा रबर ताणून फुगवलेला क्षणभंगुर फुगा. प्रेक्षकवर्गाने या फुग्याला टाचणीने टोचले की हा हीरो होतो भुईसपाट! इथं सगळं कसं अर्धवट! दिग्दर्शक, नट, विदूषक, लेखक-कुणीच धड नाही.**

आलेल्याची झोळी भरायला वेळ लागत नाही. (निर्लज्ज, ४९)

प्रत्येक दिवस हा येथे ब्लाइंड गेम असतो. पोटाची आग विझवण्यासाठी सूर्य गिळावासा वाटतो; ते न जमल्याने ज्याला त्याला शिव्यांची लाखोली वाहून वेळ भागवावी लागते. कधीतरी चित्र बदलेल या आशेनं शून्यात रंग भरत राहावं लागतं. (ब्लाइंड गेम, ४२)

या ग्लॅमरच्या विश्वात सारेच कसे चकचकीत! छोटी जीत झाली तरी या मायानगरीत नित्यच चालतो उत्सव. गोड बोलून याचा त्याचा पत्ता कट करायचा खेळ इथे महत्त्वाचा! (ग्लॅमर, ३७)

या नगरीत तग धरून राहणे, आपले वेगळेपण जपणे एवढे सोपे नसते. मागे सावज, पुढे शिकारी... जरा चूक झाली की तुमचे अस्तित्वच गोता खाते. लाखो-करोडो लोकांमधून तुम्हालाच यश मिळणे आणि ते पुढे टिकून राहणे– एकूण अवघडच! (यश, ३६)

स्ट्रेसकडून सेलिब्रेशन– ही येथील व्यथा सोसायची वेगळी रीत! एका विषाला उतारा म्हणून दुसरे जहर प्यायचे! (सेलिब्रेशन, ३५)

हे स्वप्नसुंदर जग– पण येथे शाश्वती कशाचीच नाही. (शाश्वती, ३०)

इथं एकदा एखाद्या भूमिकेत तुम्ही गाजला की तोच शिक्का बसतो कायमचा तुमच्यावर! तशाच भूमिका करीत प्रगतीचा झोका उंच उंच घ्यायचा– हेच तुमचे भागधेय. वेगळं काही करायला बघाल तर घरी बसावे लागेल सोसत बेकारीच्या झळा! (भूमिका, २१)

मी यशस्वी– मी सम्राट या सृष्टीचा. सगळे नम्र होऊन झेलतात शब्द माझा– हा येथील दिग्दर्शकाचा अभिमान– अहंकार!... पण यश दुरावत गेले की हे सर्व संपते. (दिग्दर्शक, ११)

जमिनीवर पाय ठेवून चाललं तर भरभर चालता येतं. पायांना पंख लावले तर क्षण दोन क्षण तेवढं उडता येतं... आपण काय निवडायचं– हे आपणच ठरवायचं. (किंमत, २)

आजचा हीरो म्हणजे दीड दमडीचा रबर ताणून फुगवलेला क्षणभंगुर फुगा. प्रेक्षकवर्गाने या फुग्याला टाचणीने टोचले की हा हीरो होतो भुईसपाट! (आजचा हीरो, ८९)



> **या नगरीतले बेभरवशाचे जिणे, यशाचे पोकळपण, मानवी नात्यातले कारुण्य- हेच जास्त नजरेत भरते... त्यामुळेच चित्रपटातील नटनटी, तंत्रज्ञ यांची खिल्ली उडवण्यात,त्यांना रस वाटत नाही.**

इथं सगळं कसं अर्धवट! दिग्दर्शक, नट, विदूषक, लेखक– कुणीच धड नाही. काहीही करायला मिळावं हीच इथली धडपड! (धड, १२६)

संजय चुरमुरे यांच्या नजरेला दिसलेले हे चित्रनगरीचे वेगवेगळे कोपरे– रंजनापेक्षा अस्वस्थच अधिक करतात. त्यांना तेथील ग्लॅमरचा भव्य झगमगाट दिसतो; पण तो क्षणभंगुर आहे याचे त्यांचे भान सुटत नाही. येथे भल्याभल्यांना प्रचंड संघर्ष करावा लागतो आणि खूप संघर्षानंतर मिळालेले यश टिकवून धरतानाही अमाप धावपळ करावी लागते. यश टिकवून ठेवणे हीही सोपी गोष्ट नसते. या नगरीतले बेभरवशाचे जिणे, यशाचे पोकळपण, मानवी नात्यातले कारुण्य– हेच जास्त नजरेत भरते... त्यामुळेच चित्रपटातील नटनटी, तंत्रज्ञ यांची खिल्ली उडवण्यात, त्यांची टवाळी करण्यात, त्यांच्या फिरक्या घेण्यात त्यांना रस वाटत नाही. चित्रपट कलावंतांचे मोठेपण जाणून घेण्यात त्यांना आनंद वाटतो. त्याबद्दल सकारात्मक लिहिण्यात त्यांना संतोष वाटतो. कलावंतांमधील विसंगती शोधून ती विनोद-वात्रटिकेसाठी कच्चा माल म्हणून वापरणे हा मोह त्यांना होत नाही. उलट ही विसंगती शोधूनही कलावंताच्या मोठेपणाचेच त्या विसंगतीतून ते दर्शन घेतात. या संग्रहाला 'ब्लॅक अँड व्हाइट' असे नाव आहे. यातील चित्रनगरी काहीशी ब्लॅक असली तर कलाकारांची चित्रणे व्हाइट जास्त आहेत. त्यामुळे तरुण वाचकांना याचा आनंद अधिक घेता येईल.

**पृष्ठे: १४८ ● किंमत : ९० रु. ● सभासदांना: ६३ रु. ● पोस्टेज: २० रु.**


रत्नाकर मतकरींचे 'रंगभरले' नाटक

जादू ______ तेरी ______ नजर ______

**किंमत : ६०रु.**

**पोस्टेज: २० रु.**

# नुकतेच...

## स्पॉ ट ला ई ट

**तारिक असलम 'तस्नीम'**
**अनु. उज्ज्वला केळकर**

**१२०रु. पोस्टेज २०रु.**




तारिक असलम 'तस्नीम'. बिहार मधील तरुण उमदा लेखक. लहानपणी आजोबांकडून ऐकलेल्या, राजे-राण्यांच्या, पऱ्यांच्या लांबच लांब कहाण्यांनी आणि पुढच्या काळात फुटपाथवरच्या आणि ग्रंथालयातील पुस्तकांनी त्यांच्या मनाचं पोषण केलं.

जीवनातील अनेकानेक अनुभवांचे खत-पाणी जसं पडत गेलं, तसं लहानपणी मनात पेरलेलं कथांचं बियाणं तस्नीमच्या मनात तरारुन उगवलं.

आपल्या अवती-भवती डोळसपणे, सतर्कतेने पाहणारा आणि सामाजिक बांधिलकी मानणारा हा लेखक... जिथं जिथं व्यक्तीचं पतन, चारित्र्याचं स्खलन आणि अगतिकाचं शोषण झालेलं दिसतं तिथं तिथं आपल्या धारदार लेखणीद्वारे तुटून पडतो.




**सद्‌भावनांची रुजवण करणाऱ्या कल्पनारम्य बालकथा**

**गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी**

**बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी**

**उज्ज्वला केळकर**




सांगलीच्या सुप्रसिद्ध साहित्यिक उज्ज्वला केळकर यांच्या बालकथांची दोन पुस्तके 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रकाशित केली आहेत. एक आहे– 'बदकाचे बूट व गंमत गोष्टी', दुसरे आहे 'गर्विष्ठ सूर्यफूल व गंमत गोष्टी'.

दोन्ही संग्रहांत शीर्षककथांशिवाय आणखी चार-चार कथा समाविष्ट आहेत.

मुलांसाठी लेखन करताना त्यांच्या वयोगटाचा आणि त्यांच्या मानसशास्त्राचा नीट विचार करावा लागतो. आपण काय वाचावं याची निवड मुलांना स्वत:ला करता येत नाही. म्हणून लेखक, प्रकाशक, शिक्षक, पालक ह्या सर्वांनीच त्यांच्या हाती 'बालहितवादी' साहित्यच द्यावं लागतं.

उज्ज्वलाताईंचे हे दोन्ही बालकथासंग्रह दहा-बारा या वयाच्या म्हणजे 'बाल' ह्या वयोगटासाठी योग्य आहेत. ह्या कल्पनारम्य परीकथांमध्ये उत्तमोत्तम मूल्यांची रुजवण करण्याचं सामर्थ्य निश्चितच आहे.

'गर्विष्ठ सूर्यफूल' ही शीर्षककथाच बघूया ना! सूर्यफूल खूप मोठं! त्याचं तोंड नेहमी सूर्याकडे. ते आपल्या आकारामुळे, रूपामुळे, रंगामुळे गर्विष्ठपणे वागतं. त्याच्यामुळे छोट्याशा गवतफुलाला सूर्य दिसत नाही. ''सूर्य कसा आहे?'' रानफूल त्याला विचारतं. सूर्यफूल त्याला सांगत तर नाहीच, उलट झिडकारतं. छोट्याशा हिरव्या अळीला गवतफुलाची दया येते. ती सूर्यफुलाच्या पाकळ्या कुरतडते. एक छिद्र तयार करते. त्यातून सूर्यकिरण येतो नि थेट गवतफुलावर पडतो.

बालकवींच्या 'फुलराणी'च्या जातीतली ही काव्यात्म कथा मुलांवर मैत्री, सहकार्य, गर्व न करणे अशा मूल्यांचा संस्कार करील. सूर्यफुलाचा सूर्याकडे वळण्याचा नैसर्गिक– गमतीदार गुण मुलांच्या जाता जाता लक्षात राहील असा!

'एक कळी उमलेच ना!' ही एका कोत्या मनाच्या फुलाची कथा! आपला

**परी फुलातून बाहेर येते. तिच्या प्रवासात तिला वेगवेगळी पात्रे भेटतात. भटकत भटकत ती खूप दूर जाते. रस्ता चुकते. पतंगाच्या दोरीच्या जिन्यावर चढते. उतरते. तिला वाट सापडत नाही.**

रंग, गंध, मध कोणी घेऊ नये म्हणून हे फूल आपल्या पाकळ्या उघडत नाही. फुलपाखरं, भुंगे, झुळूक सगळी तिच्यापाशी येतात. तिला फुलण्याचा आग्रह करतात; तरी ती ढिम्मच! बागेत मग मुलं येतात; पण ती कळीशी कशी खेळणार? कळीला वाईट वाटतं– फुलायला हवं होतं असंही वाटतं. पण तोपर्यंत सूर्य मावळलेला. मग तिचं मन जाणून चंद्रकिरण तिला फुलवतो. तेच रात्री फुलणारं ब्रह्मकमळ! त्याच्या रात्री फुलणाऱ्या नैसर्गिक गुणावर आधारलेली ही कथा! हट्टी आणि तुसड्या मुलांना त्यांच्यातल्या दोषांची जाणीव देईल. आपल्याजवळ जे आहे ते दुसऱ्याला देण्यात किती आनंद भरला आहे हे सांगेल.

'बदकाचे बूट' ही शीर्षककथा अशीच! चंदाराणी ही रुपेरी मासळी! बदक तिला खायला टपलेला असतो. ती त्याला 'खाऊ नको रेऽ' असं विनवते. बदक म्हणतं, ''मला तरंगणारे बूट दे. मग मी तुला खाणार नाही. का? तर माझे पिवळे पाय पाण्यात ओले होऊ नयेत.'' चिमुकली चंदाराणी कुठून आणणार तरंगणारे बूट? ती विचारात पडते. घाबरते. मग फुलपाखरू गोगलगाय हे मित्र तिला मदत करतात. मोहरीच्या पिवळ्या फुलातून धागे काढून ते विणून त्याचे बूट बदकाला देतात. मोहरी तेलकट, त्यामुळे बूट तरंगतात. चंदाराणी बदकाच्या खाण्यापासून वाचते! ह्या कथेतून विज्ञान कळत मैत्रीचं मूल्य समजतं नि काव्यात्म चित्र उभं राहतं.

जास्वंदीच्या फुलात राहणाऱ्या फुलपरीचा प्रवास– ही एक रम्यकथा. परी फुलातून बाहेर येते. तिच्या प्रवासात तिला वेगवेगळी पात्रे भेटतात. भटकत भटकत ती खूप दूर जाते. रस्ता चुकते. पतंगाच्या दोरीच्या जिन्यावर चढते, उतरते. तिला वाट सापडत नाही. ती गोंधळते. रडवेली होते. रेशमाच्या कोशातली अळी– (तिला पहिल्याने फुलपरीने चिडवलेलं असतं;) पण तीच पुन्हा फुलपरीच्या मदतीला धावते. आपल्या शरीरातून अळी एक रेशीमधागा काढते. तो लांबलांब सोडते. तो पार जास्वंदीच्या फुलापर्यंत पोचतो. त्या धाग्याला धरून फुलपरी आपल्या घरी म्हणजे जास्वंदीच्या फुलात पोचते. अद्‌भुताच्या वाटेवरचा हा नाजूक प्रवास मुलांना कल्पनारम्य वाटेल.

निसर्ग हा सर्वांचाच सखा असतो. त्याने दिलेले रंग, गंध, देह हे सगळं त्याने विचारपूर्वकच दिलेलं असतं– ते किती योग्य असतं हे 'निळू' फुलपाखराला




त्याच्यावर आलेल्या संकटातून समजतं.

आणखी काही कथांमध्ये असेच नायक, उपनायक, खलनायक मुलांना आवडतील असेच आहेत. साहसी पिंगू झुरळ, दुसऱ्याला छळणारी चंदापरी, फुलातल्या मधाचं कारंजं, इंद्रधनुष्याची शिडी अशा काव्यमय कल्पनांनी सर्वच दहा कथा मनमोहक झाल्या आहेत.

**ह्या कथांतली भाषा छुमछुमणाऱ्या पैंजणांसारखी नादमधुर आहे. ह्या कथांतले प्राणी, पक्षभ, कीटक, अळया यांच्यावर मानवी भावनांचं आरोपण करून मुलांना अद्‌भुत जगात घेऊन जाण्याची किमया लेखिकेला साधली आहे.**

ह्या कथांतली भाषा छुमछुमणाऱ्या पैंजणांसारखी नादमधुर आहे. सहज जुळणाऱ्या कवितांच्या ओळी मुलांच्या कवीमनाला रिझवणाऱ्या आहेत. ह्या कथांतले प्राणी, पक्षी, कीटक, अळ्या यांच्यावर मानवी भावनांचं आरोपण करून मुलांना अद्‌भुत जगात घेऊन जाण्याची किमया लेखिकेला साधली आहे.




ह्या पुस्तकांतली रंगीत, मोठमोठी कार्टूनसारखी चित्रं ही तर मुलांच्या मनाला आनंद देणारी पर्वणी आहे. चित्र आणि गोष्ट यांचा सुंदर रंगमेळ बरसत राहतो.

साहित्याचं प्रयोजन हे चार घटका करमणूक एवढंच नसावं. बालसाहित्यात तर मुलांची मनं संस्कारित करण्याची अपेक्षा असतेच. पण त्याचबरोबर संस्कार हे चिकटवून होत नाहीत. तीळावर साखरेच्या पाकाचे थर चढावेत नि त्याचा पांढराशुभ्र हलवा व्हावा तसं मुलांचं शीलसंवर्धन व्हावं लागतं– ह्या कथांच्या वाचनातून तसं घडण्याची प्रसादचिन्हं आहेत.

मुलांच्या भावविश्वाला आणि ज्ञानविश्वाला समृद्ध करणारे हे कथासंग्रह आहेत.

**–मीनाक्षी सरदेसाई**

**पृष्ठे प्रत्येकी: ३२ ● किंमत प्रत्येकी: ३० रु. ● सभासदांना प्रत्येकी : २१रु. ● पोस्टेज प्रत्येकी : २०रु.**

T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादीत पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

## सभासद फी ५०रु.

**क्लबचे सभासद व्हा आणि**
**क्लबची पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!**

### टी बुक क्लब म्हणजे दर्जेदार अनुवादाची हमी

या बुक क्लबचे सभासद **५० रु.** भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. **ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.** या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके २५% सवलतीत मिळतात.

### टी बुक क्लब १५ प्रकाशित झालेली पुस्तके

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक !**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रे (सावज) | मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३०० |
| कसिनो रॉयल | इयान फ्लेमिंग | अनु. सुभाष जोशी | १२० |
| द लास्ट फ्रन्टियर | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | |
| सीज्र | रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३०० |
| परवाना-शौझिया (२पुस्तकांचा संच) | डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | २३० |
| साम्राज्य बुरख्यामागचे | कारमेन बिन लादेन | अनु. अविनाश दर्प | १५० |

**पोस्टेज खर्च वेगळा राहील**




सार्थसुधं...

# जत्रा

प्रमोदिनी वडके-कवळे

तळगावची जत्रा चैत्रातल्या पौर्णिमेला भरायची. पण आम्हाला मात्र होळीपौर्णिमेपासूनच तिचे वेध लागायचे. तळगाव आमच्या गावापासून सहा मैलाच्या अंतरावर होतं. तिथं जायला कोणतंही वाहन नव्हतं. कारण मुळात आमच्या गावापासून तिथपर्यंत असा सरळ रस्ताच नव्हता. खाचखळगे आणि एक छोटीशी टेकडी ओलांडून पुढे जावं लागायचं.वाटेत एक ओढा होता. त्याचं नाव 'चक्रम ओढा'; कारण मधेच खड्डा आणि मधेच उतार असी त्याची विचित्र रचना होती. त्याला पावसाळ्यातसुद्धा फारसं पाणी नसायचं. या चक्रम ओढ्याखेरीज तळगावापाशी दुसरं कोणतंही वैशिष्ट्य नव्हतं. त्यामुळे अकरा महिन्यात आमच्या मनाच्या नकाशावर तळगाव कुठेही नसायचं, पण होळीनंतर मात्र बोलण्यात सारखा तळगावचा विषय यायचा. कारण एकच...तळगावच्या महादेवाची जत्रा!

घराघरातून तळगावच्या जत्रेला जायचे बेत महिनाभर आधी शिजायचे. यात महिला आणि मुलं यांचाच सहभाग जास्त असायचा. पुरुष माणसं केवळ मान्यता देण्यापुरती आणि जाण्यासाठी बैलगाडी ठरवण्यापुरती.... हो.... तळगावला जाताना बैलगाडीनेच जावं लागायचं. आणि बैलगाडीचा तो धडधडता प्रवास हेच आम्हा मुलांचं मुख्य आकर्षण होतं. चैत्रातल्या रणरणत्या दुपारी तळगावच्या पायवाटेवरून धुरळा उडवत निघालेल्या बैलगाड्या, त्यांची गमतीगमतीत लावलेली शर्यत, पुढे जाणाऱ्या गाडीतल्या मंडळींचा विजयी गलका.. सगळं तसंच... नेमेचि घडणारं.

गाडीतल्या सगळ्यांच्याच डोळ्यापुढे केवळ जत्रा तरळत असायची.

रंगीबेरंगी कापडांचे तंबू उभारून दुकानं थाटलेली असायची. महादेवाच्या देवळाच्या जवळच्या भागात मिठाईची दुकानं. त्यात मोठाले साखरफुटाणे, खाजा आणि जिलब्यांनी भरलेल्या पराती, साखरेच्या गाठ्यांच्या लांबलांब माळा पांढऱ्या आणि केशरी रंगाच्या चौकोनी साखरवड्या, शेवखंडांचा ढीग, सुबकपणे मांडलेला रंगीत नारळीपाक... मिठाईची दुकानं संपली की, इतर वस्तूंची दुकानं. त्यात रंगीबेरंगी प्लॅस्टिकच्या वस्तूंचा आणि खेळण्यांचा भरणा जास्त असायचा. त्यातली बहुतेक देशी खेळणी आज बाजारातून गायब झालेली आहेत. पण त्यावेळी मुलांना त्याचं फार आकर्षण असायचं. कारण ही खेळणी फक्त जत्रेतल्या दुकानातच मिळायची. रबरी दोरीला लावलेले पाण्याचे चेंडू, पिपाण्यांचे फुगे, फिल्मचे तुकडे बदलून पहाता येणारा बाईस्कोपचा खोका, तारेवरून उड्या मारत वरखाली जाणारी

माकडं, वरून हाताने दाबलं की खाली पांढरंशुभ्र (प्लॅस्टिकचंच) अंडं देणारी कोंबडी, हिरव्या गुलाबी रंगाचे खण असलेला भातुकलीतला चारपुडांचा टिफीन कॅरियर. याशिवाय प्लॅस्टिकच्या बांगड्या आणि खोट्या चकचकीत दागिन्यांचा सुळसुळाट असायचा. काही दुकानं तर जमिनीवरच गोणपाटं अंथरून मांडलेली असायची. माळारानाच्या खडबडीत जमिनीमुळे त्यांचा पृष्ठभाग सपाट नसायचा, पण जत्रेत मिळणाऱ्या वस्तूंचं एवढं अप्रूप असायचं की दुकानांच्या या वेड्यावाकड्या इंटिरियरचा गिऱ्हाइकांवर काहीही परिणाम व्हायचा नाही.

ही दुकानं संपली की, गुरांचा बाजार, उसाच्या रसाचं फिरतं गुऱ्हाळ, लालपिवळ्या सरबताच्या बाटल्यांची गाडी, जादूच्या आरशांचा तंबू, फोटो स्टुडिओ (या स्टुडिओत मोटरसायकल, कार किंवा चंद्रकोरीत बसलेले फोटो काढून घेणं हेही वर्षभराचं उत्साहवर्धक टॉनिक असायचं.) कलिंगडाचे ढीग, आकाशपाळणे, संगीत बारीचे दिमाखदार तंबू, त्यातून ऐकू येणारी घुंगरांची छुनछुन आणि 'लहान मुलांनी तिकडे जायचं नाही' या नियमामुळे त्याबद्दल वाटणारं गूढ आकर्षण. दरवर्षीची जत्रा म्हणजे असा सगळा ठराविक मामला असायचा.

संध्याकाळी परत येताना गाड्या त्याच. पण दृश्य बदललेलं असायचं. अंधार पडायला लागलेला. चैत्रातल्या सुखद वाऱ्याने लहान मुलं पेंगूळलेली असायची. मधल्या वयातली मुलं हातातले फुगे, पिपाण्या आनंदाने मिरवत असायची. बायका गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी जत्रेत काय नवं होतं यावर चर्चा करत असायच्या. थकलेले बैल धीम्या पावलांनी चालत असायचे. गाडीवानही हातातला चाबूक नुसता धरून असायचा. सगळयांच्याच डोळ्यात पुढल्या वर्षीच्या जत्रेची स्वप्नं असायची.

कारण पन्नास वर्षांपूर्वी दळणवळणाची साधनं आणि हातातला पैसा मर्यादित असताना, जगण्याचा वेग संथ असताना आणि राहणीमानाच्या कल्पना भाबड्या असताना सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात जत्रा हीच मोठा 'इव्हेंट' असायची.

कधीकधी जत्रेला जाताना किंवा येताना एखादी बैलगाडी उलटून नाहीतर बैल उधळून अपघात व्हायचा. मग ही इव्हेंट आणखी रंगतदार आणि संस्मरणीय होऊन जायची. तसं अपघाताचं स्वरूप फारसं गंभीर नसायचं. कुणाला खरचटणं, एखाद्याचा गुडघा फुटणं, खोक पडणं इतपतच रक्तपात व्हायचा. तरीही त्या अपघाताच्या आठवणी आणि कहाण्या पुढची काही वर्ष रंगवून रंगवून सांगितल्या जायच्या.

साधारणपणे चैत्र महिना उजाडला की, जत्रांची सुरुवात व्हायची. गावोगावच्या जत्रांच्या तिथी आणि जागा ठरलेल्या असायच्या. साधारणपणे एखाद्या देवळाच्या पटांगणात किंवा गावाबाहेरच्या माळरानावर जत्रा भरायची. तिथींचंही वैशिष्ट्य असं की, सर्वसाधारणपणे पंचक्रोशीतल्या गावांच्या जत्रा कधीच एका दिवशी यायच्या नाहीत. दुकानदारांना आपापली पालं उचलून सहजपणे दुसरीकडे तोच डाव मांडता यायचा.

जत्रा कुणी आणि कधी सुरू केल्या हे मला माहिती नाही. पण या जत्रांमधे समाजकारण, छोट्या व्यापारउदिमांचं अर्थकारण, लोककला आणि मनोरंजन या



सगळयाचा मेळ अतिशय उत्तम रीतीने साधलेला होता. त्यानिमित्ताने त्या त्या परिघातल्या गावचे लोक एकत्र यायचे. त्यातून जशी भांडणं पेटायची, वैरं धगधगायची तशाच सोयरिकीही जुळायच्या ग्रामीण आणि नागरी संस्कृतीची देवाणघेवाणही व्हायची. मुख्य म्हणजे जत्रेच्या निमित्ताने लोकांच्या संथ जीवनात तरंग उठायचे. उल्हासाचे,उत्साहाचे आणि आनंदाचे!

रानावनात टोळ्या करून रहाणाऱ्या आणि गरजेच्या एकेका वस्तूपायी मैलोनमैल पायपिटी करावी लागणाऱ्या एखाद्या आदिमानवाच्या मेंदूत आपल्याजवळच्या सगळ्या चीजांचा विनिमय एकाच ठिकाणी करण्याची कल्पना आली असावी असं मला वाटतं. तेव्हा केवळ गरज भागवण्याचाच हेतू असावा. कदाचित तेव्हा मानवाला खरेदीतला आनंद सापडलेला नसावा म्हणून सुरुवातीच्या जत्रेत केवळ टोकदार दगड, खारवलेलं मांस आणि जनावरांची कातडी एवढ्याच वस्तूंची दुकानं मांडली गेली असतील. ही कल्पना अपेक्षेपेक्षा यशस्वी झाल्यावर हळूहळू तिचं स्वरूप बदलत गेलं असेल आणि आठवड्याच्या बाजाराचा जन्म झाला असेल.

मोठ्या प्रमाणातला आठवड्याचा बाजार म्हणजेच जत्रा.

आज आपण पुरोगामित्वाच्या मोठमोठ्या गप्पा मारतो. सामाजिक, सांस्कृतिक जाणिवांच्या आपल्या कल्पना अगदी आधुनिक असल्याचा दावा मांडतो. पण त्याचं मूळ जत्रेतच सापडतं. थोडं खोल जाउन विचार केला तर लक्षात येईल लावणी महोत्सवापासून ते तऱ्हेतऱ्हेच्या फेस्टिव्हल्सपर्यंत सगळयांचं स्वरूप जत्रेसारखंच आहे. एका छत्राखाली अनेक प्रकार. वेगळा उच्चार न करता जत्रेतही सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव जपली जायचीच की! बैलगाड्यांच्या शर्यती, तमाशांचे फड, ही सांस्कृतिक आकर्षणंच होती प्रत्येक जत्रेतली.

जत्रेचा शोध ज्याने कुणी लावला त्याने हिंदी सिनेमाच्या लेखकांवर तर फारच मोठे उपकार करून ठेवले आहेत. जुळे भाऊ, आईवडील आणि मुलं यांना बिछडण्यासाठी आणि कालांतराने पुन्हा हमखास भेटण्यासाठी जत्रेइतकी योग्य जागा दुसरी कुठलीही नाही. जत्रेच्या पार्श्वभूमीवर सिनेमातल्या सूडाप्रेमाच्या कलहाचे रंगही जरा जास्तच खुलतात.

जत्रेचंच जुळं भावंड उरूस. त्याचं वेगळेपण म्हणजे कव्वाल्यांचा कार्यक्रम. आमच्या गावाला जत्रा नसायची पण उरूस मात्र भरायचा. नदीच्या काठावरच्या मोकळ्या पटांगणात रात्री दुकानांच्या दिव्यांची रंगीबेरंगी आरास फुलायची. त्यांचं पाण्यात पडलेलं प्रतिबिंब आणि पाण्याच्या हलक्या लाटांबरोबर तरंगत पुढे जाणारे कव्वालीचे सूर ते दृश्य आजही माझ्या मनात जसंच्या तसं कोरलेलं आहे. कव्वालीत मला फारसा रस नव्हता. त्या गाण्यांचे अर्थ आणि सौंदर्यही कळत नव्हतं. तरीही उरुसाचं वातावरण मनावर एक हळवा थरार उठवून जायचं.

माझ्या आजोळच्या गावी तर दोनदोन जत्रा असायच्या. एक भैरीभवानीची आणि दुसरी दत्ताची. चैत्र पौर्णिमेला भरणारी दत्ताची जत्रा बिचारी साधीसरळ. इतर चार

गावच्या जत्रांसारखीच. पण भैरीची जत्रा म्हणजे बडा ख्याल. भैरीच्या देवळापुढच्या सहा पुरुष उंच खांबावर एक आडवी तुळई ठेवली जायची. ही लाट. लाटेच्या एका टोकाला बांधलेली दोरी खालपर्यंत आलेली असायची आणि त्यात भक्कम लोखंडी हूक अडकवलेला असायचा. भैरीच्या मानकऱ्यांचं घराणं ठरलेलं होतं. त्यांच्यापैकी एखादा या लाटेला लावलेला हूक स्वतःच्या कमरेच्या वस्त्राला अडकवून घेउन लाटेला लोंबकळत गोल चक्राकार फिरायचा. या फेऱ्यांची संख्या ठरलेली असायची.

त्याच्या फेऱ्या संपल्या की, नवस फेडणाऱ्यांच्या फेऱ्या. लाटेचा हूक स्वतःच्या खांद्यागळ्यात अडकवून या फेऱ्या चालायच्या. कधी वंशवृद्धीसाठी, कधी खटल्याकज्ज्यासाठी तर कधी केवळ देवीवरच्या श्रद्धेसाठी.

एखादेवेळी ही लाट मधेच मोडून काडकन तुटायची. भाविक त्याखाली चेंगरून जखमी व्हायचे. देवीच्या प्रसादासारखाच हा कोपही मुकाटपणे स्वीकारला जायचा आणि या प्रसंगाच्या कथाकहाण्या पुढल्या पिढीसाठी जपून ठेवून जत्रेतला उत्साह तसाच पुढे वहात रहायचा.

या लाटेसारख्याच कितीतरी प्रथा वेगवेगळ्या गावच्या जत्रेत रूढ होत्या. अजूनही आहेत.

अजूनही ठरलेल्या तिथीला गावोगावी जत्रा भरतात. पण त्यात आता पूर्वीची गंमत उरलेली नाही. शॉपिंग मॉलच्या आक्रमणामुळे नव्या पिढीला जत्रेतल्या वस्तूचं नावीन्य राहिलं नाही. कोक आणि बिस्लेरीने ओल्या झालेल्या जिभांना गाडीवरच्या सरबताची चव मोहवत नाही. यूज ॲंड थ्रो च्या युगात एका जत्रेतली खेळणी दुसऱ्या जत्रेपर्यंत जपण्याचा वेडेपणा कोणीही करत नाही. कालाय तस्मै नमः ...

पण काहीही असलं तरी, जत्रेची जादू अजून संपलेली नाही. नवं काही मिळण्याची आशा डोळ्यात घेउन केलेल्या अवघड प्रवासाचे रोमांच, रोजच्या नीरस जीवनक्रमापलिकडचं काही शोधण्याची उत्सुकता, आनंदाचे आकाशपाळणे, आशानिराशेला गरागरा फिरवणारी चक्रं, खरेदीचा आनंद, हवं ते न मिळाल्याची निराशा, अपेक्षेपेक्षा चांगलं काही गवसल्याचं समाधान, अवचित अपघाताचं भय हे सारं देऊन जाणारी जत्रा अजून संपलेली नाही. कालप्रवाहात आपलं स्वरूप बदलून ती गावोगावी, मनोमनी फिरतेच आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यात अजूनही जत्रा साजरी होतेच आहे.

आपलं रोजचं जगणं म्हणजे तरी जत्रेपेक्षा वेगळं काय आहे?

———————————

*प्रमोदिनी वडके-कवळे*
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८






एक अनोळखी इसम बहामा बेटावर येतो.....
'कॅसिनोत पैसे उधळायला आलेलं गिऱ्हाईक' याच
नजरेनं सर्व रहिवासी त्याच्याकडे पाहतात...
...पण बाँडच्या मनात पैसे उधळण्यापेक्षाही
वेगळे विचार असतात.
एमिलिओ लार्गो या गूढ व्यक्तीनं पळवून आणलेले
आणि तिथल्याच प्रवाळ बेटांमध्ये दडवलेले दोन
अणुबाँब शोधण्यासाठी बाँडकडे आठवड्यापेक्षाही कमी
वेळ उरला होता....
शह-काटशह, कपट-कारस्थानं, रहस्यानं भारलेलं
आणखी एक दमदार बाँड-नाट्य.... **'थंडरबॉल'**


# थंडरबॉल

**अनु. जयंत कर्णिक**

**१६०रु. पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# पहिली पावलं




**वि. स. खांडेकर**

**९०रु. | पोस्टेज २०रु.**

मराठी सारस्वतातलं हे पहिलं साहित्यिक आत्मकथन.

यात वि. स. खांडेकरांनी आपण साहित्याकडे का आकर्षित झालो इथपासून ते अनुवादाच्या माध्यमातून आपण भारतीय लेखक कसे झालो, इथवरचा सारा प्रवास आत्मसंवादाच्या रुपात व्यक्त केला आहे.

कथा, काव्य, कादंबरी, लघुनिबंध, अनुवाद, संपादन, पटकथा - रुपककथा लेखन अशा सर्वच क्षेत्रांत त्यांनी टाकलेल्या पहिल्या पावलांची ही कहाणी.

मराठी सारस्वतात साहित्यिक आत्मकथनांची परंपरा यानं सुरु झाली नाही तरच आश्चर्य!

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**






### * संगीत नाटक अकादमी पुरस्कार

कलाकारांनी गायन, नृत्य, अभिनयातून नवीन भारत उभारण्याचे प्रयत्न करावेत, असे आवाहन राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी संगीत नाटक अकादमी पुरस्कार सोहळ्यात केले. मणिपूरमधील ज्येष्ठ साहित्यिक एन. खेलचंद्र सिंग यांच्यासह इतर काही मान्यवरांना संगीत नाटक अकादमी पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

‘काही लोकनृत्य कलाकारांनी जेट्रोफासंबंधी जनजागृती केल्यानंतर छत्तीसगढमधील शेतकऱ्यांनी प्रकल्प उभारला. मल्लिका साराभाई यांनी नृत्यनाट्याच्या माध्यमातून अहमदाबादमध्ये महिला अत्याचारविरोधी जनजागृती मोहीम सुरू केली. अशा प्रकारचे काम प्रत्येक कलाकाराने करायला हवे. यातून शेती, आरोग्य, शिक्षण अशा बाबतीत लोकांना साक्षर करता येईल, अशी सूचना कलाम यांनी केली.

या सोहळ्यात पंजाबमधील नाट्य अभिनेते गुरुशरण सिंग, वाराणसीतील तबलावादक किशन महाराज, पुण्यातील कथक नर्तिका रोहिणी भाटे, चेन्नईतील व्हायोलिन पंडित, कर्नाटकी संगीत गायक टी. एन. कृष्णन आणि मणिपूर कलाकार एन. खेलचंद्र सिंग यांचा गौरव करण्यात आला. याचबरोबर ३३ कलाकारांना गौरवण्यात आले.

### * डॉ. घाणेकर पुरस्कार

‘मराठी नाट्यगृहांना राजकीय पुढाऱ्यांची नावे देण्यापेक्षा रंगमंचावर आपली कारकीर्द अजरामर करणाऱ्या नाट्य कलावंतांची नावे देऊन शासनाने त्यांची स्मृती तेवत ठेवावी,’ अशी सूचना ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर पणशीकर यांनी पुणे येथे केली.

डॉ. काशिनाथ घाणेकर स्मृती विश्वस्त प्रतिष्ठान आणि ‘आशय’ यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा ‘डॉ. काशिनाथ घाणेकर स्मृती पुरस्कार’ प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले, अभिनेत्री आशा पाटील आणि रंगभूषाकार प्रभाकर भावे यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते देण्यात आला.

पणशीकर म्हणाले, “अगदी अपवाद म्हणून काही नाट्यगृहांना नाट्य कलावंतांची नावे आहेत. इतर सर्रास नाट्यगृहांना पुढाऱ्यांचीच नावे आहेत. किमान नव्याने उभारण्यात येणाऱ्या नाट्यगृहांना तरी शासनाने नाट्यकलावंतांची नावे देऊन

त्यांची आठवण ताजी ठेवावी.'

'जोपर्यंत रंगमंचावर आहे, तोपर्यंत उत्तम काम करीन,' अशी ग्वाही देत प्रशांत दामले यांनी पुरस्काराविषयी कृतज्ञता व्यक्त केली. आशा पाटील आणि प्रभाकर भावे यांनीही मनोगते व्यक्त केली. नरेंद्र जाधव यांनी पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

## * आसावरी काकडे यांना अनुवाद पुरस्कार

चंद्रप्रकाश देवल यांच्या 'बोलो माधवी' या काव्यसंग्रहाच्या मराठी अनुवादाबद्दल साहित्य अकादमीचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रसिद्ध मराठी कवयित्री आसावरी काकडे यांना जाहीर झाला. 'हा पुरस्कार म्हणजे आपण आत्तापर्यंत केलेल्या कामाला मोठी दाद आहे, अशी प्रतिक्रिया काकडे यांनी व्यक्त केली.

देवल यांचा काव्यसंग्रह १९९६ मध्ये प्रकाशित झाला. महाभारतातील गालवउपाख्यानावर आधारित सुमारे ४० कविता त्यामध्ये आहेत.

'महाभारता'तील माधवी या व्यक्तिरेखेवर आधारित आजचे समकालीन स्त्रीचे वास्तव त्यातून अतिशय परिणामकारकरित्या मांडण्यात आले आहे. भारतीय स्त्रीच्या संवेदनांचे ते प्रातिनिधिक स्वरूप असल्यामुळेच आपल्याला विशेष भावले. म्हणूनच हा संग्रह मराठीत अनुवादित करण्यासाठी दोन वर्षे त्यावर काम केले. मूळ कवितांना समकालीन राजस्थानी स्त्रीच्या वास्तवाची पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रातली स्त्री राजस्थानपेक्षा विचारांनी पुढारलेली आहे, हा फरक सोडला तर मराठी स्त्रीची मानसिकता आणि संवेदना ही तिच्याशी तेवढीच मिळतीजुळती असल्यामुळे मराठी अनुवादातही ती प्रतिबिंबित झाली आहे.

स्त्रीविषयक जाणीवांवर लेखन करणाऱ्या काकडे यांचे गेल्या पस्तीस वर्षांमध्ये सात कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यामध्ये 'आरसा', 'आकाश', 'लाहो', 'मी एक दर्शन बिंदू' आणि 'स्त्री असण्याचा अर्थ' इत्यादींचा समावेश आहे.

## * 'मराठी माध्यम रत्न' पुरस्कार

'मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठान'तर्फे दिला जाणारा 'मराठी माध्यम रत्न' पुरस्कार या वर्षी दै. 'लोकसत्ता' पुणे चे निवासी संपादक मुकुंद संगोराम, दै. सकाळचे मुख्य उपसंपादक शशिकांत भागवत, चित्रपट समीक्षक व लेखिका सुलभा तेरणीकर, मुंबई दूरदर्शनच्या वृत्तनिवेदिका स्वाती पाटणकर आणि चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांना जाहीर झाले आहेत.

मराठी दैनिके भाषेची वाहक आहेत. ती क्रांतिकारक कामे करीत आहेत. याचबरोबर विविध प्रकारची माध्यमे मराठी भाषा जिवंत ठेवीत आहेत व वृद्धिंगत करीत आहेत. त्यामुळेच वृत्तपत्र व विविध माध्यमांत कार्यरत असणाऱ्या मान्यवरांना हा पुरस्कार दिला जातो. आतापर्यंत हा पुरस्कार सुधीर गाडगीळ, अरविंद गोखले, सतीश कामत, प्रल्हाद सावंत, मृणालिनी ढवळे, चारुहास पंडित, गोपाळराव



पटवर्धन आदींना देण्यात आला आहे.

## * रेहमान राही यांना 'ज्ञानपीठ'

ज्येष्ठ कवी रेहमान राही यांना २००४ साठीचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार जाहीर झाला आहे. राही यांच्या रूपाने काश्मिरी भाषेला प्रथमच 'ज्ञानपीठ' मिळत आहे. शारदेची मूर्ती, पाच लाख रुपये रोख आणि मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. राही यांचा जन्म १९२५ मध्ये झाला. त्यांच्या साहित्यकृतींमध्ये 'नवरोझ-ए-सबा', 'सनवेनी साझ', 'सियाह रुदा जरेन मंझ' या कवितासंग्रहांचा समावेश आहे. 'कहवत' हा त्यांचा निबंधसंग्रहही गाजला. 'शार शिनाझी' आणि 'कशीर शायरी त वझून्क सुरती हल' हे समीक्षाग्रंथही प्रसिद्ध आहेत. यापूर्वी त्यांना 'पद्मश्री' (१९८४), 'साहित्य अकादमी पुरस्कार' तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालयाची 'फेलोशिप' मिळाली आहे.

## * 'वसंतसिंधू' पुरस्कार

व्यावसायिक रंगभूमीवरील ज्येष्ठ प्रथितयश नाटककार, साहित्यिक वसंतराव कानेटकर आणि त्यांच्या पत्नी सिंधूताई कानेटकर यांच्या नावाने देण्यात येणारा वसंतसिंधू पुरस्कार ज्येष्ठ नाटककार प्रभाकर लक्ष्मण मयेकर यांना मिळाला आहे. ११ हजार रुपये रोख, मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे यंदाचे हे दुसरे वर्ष आहे. वसंतराव कानेटकरांच्या जन्मदिनी २० मार्च रोजी नाशिकमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## * रवीन्द्र केळकर यांना साहित्य अकादमी फेलोशिप

नामवंत कोकणी लेखक रवीन्द्र केळकर यांना केन्द्रीय साहित्य अकादमीने फेलो म्हणून गौरविले आहे.

त्यांच्याबरोबर बंगलोरच्या इंग्रजी लेखिका अनिता देसाई व सुप्रसिद्ध पंजाबी लेखक कर्तारसिंग दुग्गल यांनाही हा बहुमान देण्याचा निर्णय नवी दिल्लीत झालेल्या अकादमीच्या सर्वसाधारण मंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. अग्रगण्य साहित्यिकांना ते हयात असताना हा बहुमान देऊन गौरविले जाते. एका वेळी जास्तीत जास्त २१ साहित्यिकांना हा बहुमान प्राप्त होऊ शकतो. हा बहुमान प्राप्त झालेले केळकर हे पहिले गोमंतकीय व कोकणी लेखक आहेत.

१९६८ मध्ये यासंबंधी निर्णय झाल्यावर फेलो बनण्याचा पहिला बहुमान भारताचे पहिले राष्ट्रपती, विचारवंत व लेखक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना प्राप्त झाला होता. त्यानंतर चक्रवर्ती राजगोपालचारी, ताराशंकर बंदोपाध्याय, आचार्य काकासाहेब कालेलकर, डी. आर. बेन्द्रे, मस्ती व्यंकटेश अय्यंगर, महादेवी वर्मा, मुल्क राज आनंद, पी. शिवशंकर पिल्ले, आर. के. नारायण व विद्या निवास मिश्रा यांनाही हा सन्मान प्राप्त झालेला आहे. दिवंगत साहित्यिक

अमृता प्रीतम, भीष्म सहानी, निर्मल वर्मा आणि कैफी आझमी या नामवंत साहित्यिकांनाही फेलोशीप मिळाली होती.

केळकर यांनी कोकणीत ५० वर पुस्तके लिहिली असून १९७६ साली त्यांना कोकणीसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला होता. त्यांनी हिंदी, मराठी व गुजरातीतही लेखन केले आहे. हिंदी पुस्तकांसाठीही त्यांना राष्ट्रीय पुरस्कार लाभले आहेत.

*** जगन्नाथ प्रसाद यांना सरस्वती सन्मान**

ओरिसातील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगन्नाथ प्रसाद दास यांच्या 'परिक्रमा' या काव्यसंग्रहास आज के. के. बिर्ला फाऊंडेशनचा सरस्वती सन्मान जाहीर करण्यात आला. २००६ या वर्षासाठी हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

उडिया साहित्यिक वर्तुळात ते 'जेपी' या नावाने ओळखले जातात. त्यांचे आतापर्यंत १० काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले असून त्यांचे ५ नाट्यसंहिता आणि ७ लघुकथा संग्रहही प्रकाशित झाले आहेत. 'परिक्रमा'मध्ये श्री. दास यांचे जीवन आणि मृत्यूविषयक चिंतन समाविष्ट आहे. त्यांची काव्यप्रतिभा भाषेचे बंधन ओलांडून मानवी जीवनाला भिडते. जीवनाच्या सर्वांगाचे समरसून अनुभव हे श्री. दास यांच्या काव्याचे आणखी एक वैशिष्ट्य. त्यांच्या काव्यसंग्रहांचे इंग्रजीसह अनेक भाषांत रूपांतर झाले आहे.

*** शरदचंद्र चट्टोपाध्याय पुरस्कार**

पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचा यंदाचा शरदचंद्र चट्टोपाध्याय पुरस्कार सांगली येथील साहित्यिक श्रीमती प्रा. तारा भवाळकर यांना जाहीर झाला आहे. २० मार्च रोजी पुणे येथे श्रीमती मृणालिनी गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. ख्यातनाम लेखिका श्रीमती ज्योत्स्ना देवधर यांनी मराठी साहित्य परिषदेच्या वतीने शरदचंद्र चट्टोपाध्याय यांच्या नावे लेखनविषयक लेखिका पुरस्कार पुरस्कृत केला आहे. रोख पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रा. तारा भवाळकर यांनी 'मधुशाला'चा अनुवाद केला आहे. 'माझिया जातीच्या' हा त्यांचा कथासंग्रह खूपच गाजला.

*** डॉ. अमर्त्य सेन यांना 'जीवनगौरव'.**

'नोबेल' विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांना आशिया आणि पॅसिफिक क्षेत्रासाठी नेमलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक आयोगाने (युनिस्कॅप) जीवनगौरव पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे. 'युनिस्कॅप'च्या वतीने देण्यात येणारा हा पहिलाच जीवनगौरव पुरस्कार आहे. बँकॉक येथे होणाऱ्या समारंभात डॉ. सेन यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



*** कुमार गंधर्व पुरस्कार**

प्रसिद्ध गायिका 'आरती अंकलीकर-टिकेकर यांना' मध्यप्रदेश सरकारचा 'कुमार गंधर्व पुरस्कार' जाहीर झाला आहे.

राष्ट्रीय पातळीवरील या पुरस्काराची घोषणा राज्य सरकारतर्फे नुकतीच करण्यात आली. पन्नास हजार रुपये आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कुमारजींच्या जयंतीनिमित्त ८ एप्रिलला देवास येथे होणाऱ्या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला गेला.

कुमारजींसारख्या मोठ्या कलाकाराच्या नावाने पुरस्कार मिळाल्याचा खूप आनंद वाटतो,कुमारजींसारखा सृजनशील आणि स्वयंभू गायक प्रत्येक रागाकडे स्वतंत्र दृष्टीने पाहत असे. त्यांच्या नावाचा पुरस्कार म्हणजे त्या मोठ्या माणसाने माझ्याकडून घेतलेले वचनच आहे. संगीताच्या साधनेचे कार्य असेच चालू ठेवीन.' अशा शब्दांत अंकलीकर-टिकेकर यांनी मनोगत व्यक्त केले. ❐

**मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा 'ऐका' आता थेट नभोवाणीवर...**

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे नभोवाणीच्या सहकार्याने सकाळच्या प्रहरी, दर गुरुवारी, ठीक सात वाजून पन्नास मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

या कार्यक्रमामध्ये वाचक-श्रोत्यांना एक प्रश्न विचारला जाईल. प्रश्नाचे उत्तर 'पोस्टकार्ड'द्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'पुणे' येथील पत्त्यावर पाठवावे. सहभागी स्पर्धकांमधून भाग्यवान विजेत्याची निवड केली जाईल व त्याला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दर्जेदार पुस्तक भेट मिळेल.

**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:५० वाजता 'पुणे नभोवाणीवर'.**

## वाचकांचा प्रतिसाद

मा.प्रकाशक,

'कॉलेज' वाचली. आवडली. अनेक कारणांनी.

आपण रंगवलेल्या व्यक्तिरेखा त्यांच्या आंतरिक मनोविश्वासह ठसठशीत उमटल्या आहेत. चंद्रात्रे, रीमा, प्राचार्य वाकडे, परमार, जयू, फ्रान्सिस मॅडम, रीमा ही पात्रे लक्षात राहतात.

अत्यंत सहज, सुंदर, आरस्पानी शैली याला लाभली आहे. वातावरणनिर्मिती विद्यालयानुरूप असा आकार घेत घेत वाचकांची उत्कंठा वाढवते. परमारचा मृत्यू कळस गाठतो.

मीही महाविद्यालयात आयुष्यभर काम केले. चौदा वर्षांपूर्वी १९९३ साली निवृत्त झाले. पण आपण रंगविलेले वातावरण फार भयावह आहे. त्यावेळी राजकारण होते; पण कर्तव्यनिष्ठा हा महत्त्वाचा भाग होता. तोच आता लोपत चाललाय!

या कादंबरीने रसिकांचे आणि समीक्षकांचे लक्ष वेधले गेले एवढं निश्चित.

**लीला दीक्षित, पुणे.**

मा.प्रकाशक,

'कॉलेज' या कादंबरीचे परीक्षण (महाराष्ट्र टाइम्स, संवाद, १४ जानेवारी) लिहिताना वृंदा भार्गवे यांनी नाव 'कॉलेज' असूनही त्यात तरुणाईचा जल्लोष नाही, असं म्हटलं आहे. मी स्वत: ही कादंबरी वाचली आहे. त्यामुळे स्वत:चं मत नोंदवावंसं वाटतं. सध्या कॉलेजेस नावापुरतीच उरली आहेत. तिथे उत्सवांपुरता जल्लोष दिसतो. उलट विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आणि संस्थाचालक आणि प्राध्यापकांचं स्वार्थी धोरण ही सद्य:स्थिती या कादंबरीने नेमकी पकडली आहे. कादंबरीतली व्यक्तिचित्रं आणि घटना अगदी जिवंत वाटतात. लेखिकेच्या ओघवत्या शैलीतून एखाद्या चित्रपटासारखी घटनांची शृंखला वाचकाच्या डोळ्यासमोरून जाते. पुढे कादंबरी चिंतनाच्या पातळीवर पोहोचते. विशेष उल्लेखनीय म्हणजे लेखिकेने पाळलेली अलिप्तता. लेखिका स्त्री असूनही तिने कादंबरीतली सर्व पुरुष पात्रं



पूर्णपणे विकसित केली आहेत. भार्गवे यांच्या मतानुसार यातले संवाद 'क्वचित वाचनीय' नसून 'खचितच वाचनीय' आहेत.

**मोरेश्वर देशमुख, औरंगाबाद.**

मा. प्रकाशक,


'कॉलेज' ही कादंबरी हातावेगळी करताना एक विचित्र घुसमट जाणवली. संक्रांतीच्या दिवशी 'संवाद'मध्ये परीक्षण वाचलं. (म.टा.). 'गोड गोड बोला' असे त्या दिवशी म्हणण्याचा प्रघात असला तरी चांगल्याला चांगले म्हणण्याचा प्रघात काही गैर नाही.

तरुणाईचा जल्लोष अपेक्षिणाऱ्यांना 'कॉलेज'चा कॅनव्हास मोठा आहे हे मान्य असावे. अन् डॉ. छाया महाजन ह्यांनी त्यातील त्यांना भावणारा किंवा खटकणारा भाग प्रामाणिकपणे रेखाटला आहे. तेव्हा हा 'फिल्मी' जल्लोष नेहमीच उद्घोषित व्हावा असे म्हणणे अनाकलनीय आहे.

एखाद्या व्यक्तीचं खच्चीकरण करणारी यंत्रणा त्या व्यक्तीच्या निकालाबरोबरच समांतर रेषेत होतानाची लेखिकेची तडफड, घुसमट वृंदा भार्गवे (कदाचित त्या प्राध्यापक असल्यामुळे) एकीकडे मान्य करतात. लगेच 'विद्यार्थी' ह्या घटकाची नकली आंदोलनाच्या मुखवट्याआडून त्या घटकाला प्राधान्य न दिल्याचा आक्रोश करतात अन् त्यामुळे हा संघर्ष त्यांना बहुपदरी वाटत नसावा.

मूल्यहीनतेचा सर्वंकष आलेख प्रकर्षाने जाणवत असतानाच 'कॉलेज' संबंधात निर्माण झालेल्या दुसऱ्या प्रश्नांचा ऊहापोह न झाल्याने वृंदा भार्गवे ह्यांना थोडासाच हादरा बसला– हे आपल्या सामाजिक जाणिवेच्या 'शॉकप्रूफते'चेच प्रदर्शन असावे– अन् कदाचित लेखिकेला हाच विषाद विशद करावासा वाटत असावा.

**मधुकर सासवडे.**




कॉलेज

**छाया महाजन**


२००रु. पोस्टेज २५रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




*** चंद्रशेखर प्रेमलाल शहा**

मिरज येथील प्रसिद्ध 'रत्नाकर बुक स्टॉल'चे संचालक चंद्रशेखर प्रेमलाल शहा यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ५८ वर्षांचे होते.



त्यांच्या मागे पत्नी, मुलगा व सून असा परिवार आहे.

'शेखरभाई' या नावाने सुपरिचित असणाऱ्या शहा यांनी आपल्या ज्येष्ठ बंधूंच्या साहाय्याने पुस्तकविक्री व्यवसाय भरभराटीस आणला. गेली ५५ वर्षे मिरजकरांच्या वाचनविषयक गरजांना तितक्याच उत्साहाने आणि प्रेमळ व मनमिळावू सुस्वभावाने पूर्ण करण्यात शहा यांनी यश मिळवले. आज 'रत्नाकर बुक स्टॉल' या पुस्तकविक्री केंद्राची स्वतंत्र ओळख मिरजनगरात आहे. शेखरभाईंनी आपल्या सचोटीपूर्ण प्रामाणिक प्रयत्नांतून ही ओळख निर्माण केली. त्यांची व्यवसायावरील निष्ठा आणि कामावरील श्रद्धा भावी पिढ्यांना प्रेरणादायक ठरेल.

'मेहता पब्लिशिंग हाऊस' परिवारातर्फे श्री. शहा यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली!

*** ज्येष्ठ पत्रकार 'शामलाल'**

टाइम्स ऑफ इंडियाचे माजी संपादक, देशातील आघाडीचे विचारवंत, मर्मभेदी समीक्षक म्हणून कीर्ती लाभलेले ज्येष्ठ पत्रकार 'शामलाल' यांचे २३ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, 'द हिंदू'च्या वरिष्ठ पत्रकार नीना व्यास या कन्येसह दोन कन्या आणि पुत्र असा परिवार आहे.

सुमारे चार पिढ्यांच्या पत्रकारांवर त्यांचा लेखनाचा प्रभाव होता. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण लाहोर येथे झाले होते. एम.ए. झाल्यावर त्यांनी लगेच लेखन आणि पत्रकारितेला सुरुवात केली. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात त्यांनी आपल्या लेखणीद्वारे समविचारी लोकांना एकत्र करण्याचे कार्य केले.

साहित्य समीक्षेबाबत नावाजलेले शामलाल नवी दिल्लीतील गुलमोहर पार्क वसाहतीत राहात होते. गेले काही दिवस त्यांची प्रकृती ठीक नव्हती. आज निवासस्थानी त्यांचे झोपेतच निधन झाले. १९१२ साली जन्मलेल्या शामलाल यांनी पत्रकारितेला अगदी तरुण वयातच प्रारंभ केला. 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये त्यांनी १९३४ मध्ये प्रवेश केला. तिथे ते १२ वर्षे कार्यरत होते. १९५० मध्ये ते 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या सेवेत रुजू झाले. मग १९६७ मध्ये ते या वृत्तपत्राचे संपादक झाले. संपादकपदाच्या ११ वर्षांच्या कारकीर्दीनंतर ते सेवानिवृत्त झाले. मात्र नंतरही ते 'लाइफ ॲण्ड लेटर्स' हा स्तंभ टाइम्समध्ये लिहीत होते. हाच स्तंभ नंतर त्यांनी टेलिग्राफमध्येही सुरू ठेवला होता. त्यांचे 'लाइफ ॲण्ड लेटर्स' आणि 'द नॅशनल सीन' हे स्तंभ राष्ट्रीय स्तरावर गाजले होते. त्यांच्या समीक्षात्मक लेखनाला आंतरराष्ट्रीय लेखकांनी मान दिला होता. अतिशय परखड आणि स्वतंत्र विचार व्यक्त करणारे पत्रकार म्हणून त्यांनी आपली मुद्रा पत्रकारिता क्षेत्रावर उमटवली. त्यांच्या टीकात्मक समीक्षणांचे संकलन असलेले 'ए हन्ड्रेड एन्काउंटर्स' आणि 'इंडियन रियालिटीज' हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ दिल्लीच्या 'रुपा' प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केले आहेत.

*** के. बी. कुलकर्णी**

स्वत:च्या आगळ्या शैलीने महाराष्ट्रीय कलावंतांची एक अस्सल व वेगळी परंपरा निर्माण करणारे आणि वेगळी सौंदर्यवृत्ती अखेरपर्यंत जपणारे विख्यात चित्रकार के. बी. कुलकर्णी यांचे बेळगाव येथे ९ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते.

'केबी' या नावानेच ते चित्रकलेच्या क्षेत्रात ओळखले जायचे. मुंबईत आल्यानंतर हळदणकर आर्ट स्कूलमध्ये त्यांनी कलेचे प्राथमिक धडे गिरवले. त्यानंतर जे जे स्कूल ऑफ आर्टमधून १९४५ साली त्यांनी कलाशिक्षकाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. १९४५ ते ४९ या कालावधीत त्यांनी बेळगावच्या मराठा मंडळ हायस्कूलमध्ये कलाशिक्षक म्हणून काम पाहिले. कर्नाटक सरकारच्या कलाशिक्षण विषयक धोरण निश्चित करणाऱ्या समितीचे ते मान्यवर सदस्य होते. १९७२ साली कर्नाटक सरकारने त्यांना राज्य पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

बेळगावमध्ये केबींनी १९५१ साली चित्रमंदिर ही चित्रशाळा सुरू केली. १९७७ पर्यंत केबींनी या चित्रशाळेत अनेक विद्यार्थी घडवले. आज नामवंत असलेले अनेक चित्रकार हे केबींचे विद्यार्थी आहेत. बेळगावच्या चित्रमंदिरामध्येच ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, प्रा. मंगेश राजाध्यक्ष, बिंदू कुलकर्णी, मारुती पाटील, नंदा शहापूरकर, संतोष पेडणेकर यांनी केबींच्या मार्गदर्शनाखाली चित्रकलेचे धडे गिरवले. ❐

# बालनगरी






## देव माणसाचा सदरा

कुशाबा नावाचा एक गरीब शेतकरी होता. त्याच्याजवळ जास्त जमीन नव्हती. जेमतेम चारपाच एकर असेल. त्यातच तो राबायचा, घाम गाळायचा. पण वर्षअखेर त्याच्या पदरात काहीच पडत नसे. कारण ऐन सुगीच्या वेळी शेतात ढोरे-वासरे शिरत; दाणागोटा



खाऊन टाकत. आपल्याच बाबतीत असे का घडावे हे त्याला कळेना. काकुळतीला येऊन त्याने अखेर भूमातेची प्रार्थना केली. भूमाता प्रसन्न होऊन म्हणाली,

''निराश होऊ नकोस. शेतात बुजगावणे उभे कर अन् त्याला देवमाणसाचा सदरा घाल. सर्व ठीक होईल.''

त्याला वाटले बुजगावणे उभे करणे सोपे आहे; पण देवमाणसाचा सदरा कसा मिळवायचा? ते कठीणच आहे.

पण आपल्या भल्यासाठी हे करायलाच हवं. कुशाबा कष्टाला भीत नव्हता. देवमाणूस शोधायला तो निघाला.

त्याला वाटले, श्रीमंत सावकार म्हणजे देवमाणूसच. तो रात्रंदिवस लोकांना पैसा देतो. अडीअडचणीला देवासारखा धावून जातो. तो नक्कीच देवमाणूस आहे. मनाची खात्री करून तो सावकाराकडे गेला आणि त्याचा सदरा मागितला.

कुशाबाच्या वेडेपणाला सावकार सुरुवातीला हसला. त्याने आपला सदरा कुशाबाला देऊन टाकला. कुशाबाने तो सदरा शेतातल्या बुजगावण्याला चढवला. पण काही उपयोग झाला नाही. नेहमीप्रमाणे गुराढोरांनी, पाखरांनी धान्य खाऊन टाकले. तो ओरडून भूमातेला म्हणाला,

''माझं काय चुकलं? तू सांगितलं तसं मी केलं.''





भूमाता म्हणाली, ''कुशाबा तुझं चुकलंच. अरे, तो पैसे देतो; पण गरिबांकडून दुपटीने व्याज घेतो. पैशासाठी त्यांना मागे भुणभुण लावतो. पुन्हा देवमाणूस शोध.''

कुशाबाने खूप विचार केला आणि ठरविले की, साधूपुरुष म्हणजेच देवमाणूस असला पाहिजे.

शोधाअंती त्याला एक साधूपुरुष सापडला. तो तेजःपुंज



होता. लोकांसमोर प्रवचन देत होता. प्रवचन मोठं विद्वत्तापूर्ण होतं. कुशाबाही रमून गेला.

प्रवचनानंतर तो त्या साधूपुरुषाला भेटला आणि त्याला दंडवत घालून त्याचा सदरा मागितला. साधू हसला अन् त्याने आपली कफनी देऊन टाकली. कुशाबाने ती कफनी बुजगावण्यावर चढवली. पण त्याही वर्षी काहीफायदा झाला नाही. देवी प्रगट होऊन म्हणाली,

''कुशाबा या वेळीही तू चुकलास. दिसतं ते सारं

खरं नसतं. ज्ञानदानात जो हातचे राखून ठेवतो, तो देवमाणूस कसला? तो जे सांगतो तसे त्याचे वर्तन हवे. पुन्हा प्रयत्न कर.'' कुशाबा हिरमुसला, पण नुकसान टाळण्यासाठी काही प्रयत्न करायला हवे होते. तो निघाला. रस्त्यात त्याला एक प्रचंड मिरवणूक दिसली. एका गाडीत हारांनी मढविलेला पुढारी हात जोडून उभा होता. कुशाबा दिसताच त्याने खाली उडी घेतली. अन् लोकांचे पाय धरीत म्हणाला, ''तुम्हीच आमचे देव. मला मतं द्या. तुम्हाला हवं ते मिळेल.''



''मला तुमचा सदरा द्या.'' एकदम कुशाबा म्हणाला. 'बस एवढंच',असे म्हणत पुढाऱ्याने आपला सदरा काढून दिला. मिरवणूक पुढे निघून गेली.

कुशाबाला वाटले, हाच खरा देवमाणूस. किती लोक मागे आहेत यांच्या! जो सर्वांना देव समजतो तोच खरा देव. किती सहजपणे सदरा काढून दिला.

बुजगावण्याला चढवलाच पाहिजे. फायदा होईल. तो सदरा चढवूनही फायदा तर झाला नाही. उलट दुप्पट नुकसान झाले. बुजगावण्याला हात लावला तोच



आवाज आला,

''कुशाबा, निराश होऊ नकोस. जगात देवमाणसं असतात. तुला नक्की सापडेल. सत्तेसाठी वाटेल ते करणारा सामान्य माणसाची सेवा करूच शकणार नाही. स्वार्थापेक्षा त्याग श्रेष्ठ असतो कुशाबा.''

देवीच्या सूचक बोलण्यातून कुशाबाला सूत्र सापडले. तो तडक निघाला. ठिकठिकाणी फिरला आणि दमून एका झाडाच्या पारावर बसला. बाजूला एक उघडाबंब शेतकरी बायकोशी बोलत न्याहरीचे गाठोडे सोडत होता. गाठोड्यातल्या काही भाकऱ्या काढून त्याने बायकोजवळ दिल्या. काहींची गाठोडी बांधून बाजूला ठेवली. दोन बैलांना दिल्या. एक कुत्र्याला टाकली. एकीचा काला करून दूर भिरकावून दिली. पाखरांनी पटापटा चोचीत ती टिपून घेतली. मग तो कुशाबाला म्हणाला, ''पाव्हणं, या जेवायला.''

कुशाबाला नाही म्हणताच आलं नाही. भूकपण सपाटून लागली होती. जेवताना कुशाबाने शेतकऱ्याच्या वागण्याचा अर्थ विचारला त्याने खुलासा केला, की आपले जे काही असते ते सर्व आपलेच नसते. घ्यावे तसे द्यावे. सगळेच देवाचे जीव. कुशाबाला वाटले, हा नक्कीच देवमाणूस! पण हा तर उघडा. पण याला सदरा आहे की नाही? मागून तर पहावा म्हणून कुशाबानेसदरा मागितला. तेव्हा शेतकऱ्याने सांगितले की तो नेहमी कामात दंग असतो. डोईला पागोटे अन् कमरेला धोतर असले की पुरे. सदरा कुठंतरी असेल पडलेला. शेतकऱ्याच्या बायकोने सदरा शोधून दिला. तो तर

जुनाट अन् चिंध्या झालेला होता. तोच सदरा कुशाबा घेऊन आला. अन् बुजगावण्याला चढवला. त्या वर्षी मात्र भरमाप पीक आलं. ढोरांनी-पाखरांनी नुकसान केलं नाही. देवी म्हणाली,''कुशाबा, आता कळलं का?''

कुशाबा खुशीत म्हणाला,'हो'! सारं सारं कळलं. माझा सदराही असाच कुणाला तरी उपयोगी येईल असं मी वागेन.'

**- लीला जोशी, जळगाव - जामोद**

## ओळखा पाहू



शेजारच्या चौकटीत छायाचित्र आहे एका महान भारतीय तत्त्वज्ञाचे.

इतिहासप्रसिद्ध 'थिऑसॉफिकल सोसायटी'चे हे काही काळ प्रवर्तक होते.

यांची ओळख पटवा व आम्हास कळवा.

**मार्च अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर**

**''मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर''**

अचूक उत्तर पाठवणारे वाचक

मनोहर चौबळ, अमरावती., कीर्तिकुमार शहा, कराड.


राजु मेहता,मालेगाव.



# शिबी राजा

अवंतिकानगरीचा राजा 'शिबी' हा दानशूरपणाबद्दल तिन्ही लोकी प्रसिद्ध होता. त्याच्या दानशूरपणाची परीक्षा घ्यायची असे ठरवून एकदा 'इंद्र' आणि 'अग्नी' स्वर्गातून पृथ्वीलोकावर येतात. 'अग्नी' कबुतराचं, तर 'इंद्र' गिधाडाचं रूप घेऊन शिबी राजाच्या दरबाराजवळ जातात.

गिधाडरुपी इंद्र कबुतररुपी अग्नीचा पाठलाग करण्याचे



नाटक करतो आणि ते दोघेही सिंहासनावर बसलेल्या 'शिबी' राजाच्या जवळ जातात.

कबुतर शिबी राजाला म्हणते, ''हे राजा, मला वाचव. हे गिधाड माझा पाठलाग करत आहे. हे मला खाल्ल्याशिवाय राहणार नाही. कृपा करून मला वाचवा. आश्रयाला आलेल्या कोणत्याही प्राण्याला दयाबुद्धी दाखवणं आणि त्याला वाचवणं, हे राजा या नात्यानं

तुझं कर्तव्य आहे.''

शिबी राजा गोंधळात पडतो. तेवढ्यात गिधाड शिबी राजाला म्हणते, ''हे राजा, कबुतर हे माझं नैसर्गिक खाद्य आहे. मला भूक लागली असता मी कोणत्याही जिवाला, मग तो जिवंत असो की मेलेला, खाऊ शकतो. या कबुतराचे प्राण वाचवून माझी भूक मारण्याचा तुला काहीही अधिकार नाही. या कबुतराला तुला माझ्या हवाली करावंच लागेल.''

कबुतराचे आणि गिधाडाचे म्हणणे ऐकल्यानंतर राजा शिबी अधिकच पेचात पडतो. 'कोणाचं ऐकावं? असा प्रश्न त्याला पडतो. 'आश्रयाला आलेल्या कोणत्याही माणसाचा किंवा प्राण्याचा जीव सांभाळणं, हे माझं कर्तव्यच आहे. तसेच एखाद्याला जाणीवपूर्वक उपाशी ठेवणं हे देखील योग्य नाही.' काय करावं बरं?... असा विचार करत असताना शिबीला एक युक्ती सुचते.

तो गिधाडाला म्हणतो, ''हे बघ, तुला जेवढे मांस हवे तेवढे मी तुला आमच्या राजप्रासादाच्या स्वयंपाकगृहातून देईन. पण या कबुतराला तू सोडून दे.''

पण गिधाड आपल्या मागणीवर अडून राहले. ते शिबीला म्हणाले, ''हे पहा, हे कबुतर मला प्रत्यक्ष देवाकडूनच खाद्य मिळाल्यासारखे आहे. शिवाय जिवंत कबुतराचे मांस ताजे असणार. म्हणून मला हेच कबुतर हवे.''


''मी याऐवजी दुसऱ्या एखाद्या जिवंत कबुतराची



तुझ्यासाठी व्यवस्था करीन, पण तू याला सोडून दे!'' शिबी राजाने गिधाडाला आग्रहाची विनंती केली.

पण गिधाड अधिक आक्रमक होत म्हणले, ''हे राजा, एका भुकेल्या जिवाला तू अधिक ताणू नकोस. एकतर मला हे कबुतर दे, अन्यथा या कबुतराच्या वजनाइतके तुझ्या शरीराचे मांस काढून दे.''

गिधाडाच्या त्या अजब मागणीने दरबारातील सर्व अमात्य, अधिकारी आश्चर्यचकित झाले; पण राजा शिबी किंचितही डगमगला नाही. त्याने सेवकाला बोलावून तराजू आणण्यास सांगितले. सेवकाने तराजू आणल्यावर शिबीने कबुतराला एका पारड्यात बसण्याची विनंती केली आणि हातात धारदार सुरी घेऊन त्याने हळूहळू



आपल्या मांडीचे मांस काढण्यास सुरुवात केली.

हा प्रकार पाहून दरबारात उपस्थित असलेल्या सर्व अमात्य-प्रधानांसह गिधाडरुपी इंद्र आणि कबुतररुपी अग्नीही अचंबित झाले.

'दिलेल्या शब्दाला जागणारा आणि एखाद्याचे प्राण

वाचवण्यास प्रसंगी स्वतःचे शरीर देणारा राजा शिबी' पाहून इंद्र आणि अग्नीला धन्यधन्य वाटले. त्यांनी त्वरित आपल्या मूळ रूपात परत येऊन राजा शिबीला दर्शन दिले. आणि म्हटले, ''हे शिबी, तू धन्य आहेस. आम्ही तुझ्या दानशूरत्वाबद्दल जे काही ऐकले त्याहीपेक्षा तू अधिक श्रेष्ठ निघालास. आम्ही तुझी परीक्षा पाहिली. त्यात पुरेपूर कसोटीवर उतरलास. तुझ्या दानशूरपणाची कीर्ती दिगंत राहो आणि युगानुयुगे या कीर्तीचा स्मरणरुपी सुगंध दरवळो.''

असा आशीर्वाद देऊन इंद्राने आपल्या अद्‌भुत मंत्राद्वारे राजा शिबीची जखम भरून काढली आणि अवंतिकानगरीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारून अग्नी व इंद्र दोघेही स्वर्गाकडे कृतकृत्य मनाने परतले.

धन्य तो राजा शिबी... आणि धन्य त्याचे दातृत्व.


## बालकुमारवाङ्मय

| | |
|---|---|
| **पंचरंगी खार आणि इतर गोष्टी** | शरद दळवी |
| **इमानी मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी |
| **सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर |
| **ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर |
| **घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे |
| **गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे |

**किंमत प्रत्येकी ३०रु.**
**पोस्टेज प्रत्येकी २० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





**अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कारासाठी निवड झालेली मेहता पब्लिशिंग हाऊसची एकूण १८ पुस्तके पुढीलप्रमाणे**

**बालसाहित्य विभाग - प्रथम पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| १) | मजेदार लोककथा | मंजुषा आमडेकर |
| २) | आदर्श लोककथा | मंजुषा आमडेकर |
| ३) | गम्मत गोष्टी | मंजुषा आमडेकर |
| ४) | धमाल गोष्टी | मंजुषा आमडेकर |
| ५) | टिंबक टू | मंजुषा आमडेकर |
| ६) | चतुर बोकोबा | वृषाली पटर्वधन |
| ७) | नशीबवान शेखर | वृषाली पटर्वधन |
| ८) | लोखंड खाणारे उंदीर | वृषाली पटर्वधन |
| ९) | बुडबुड्याचे विमान | अर्चना ओक |
| १०) | चालणारा हिमपुतळा | अर्चना ओक |
| ११) | छोटूसा पांढरा ससुकला | अर्चना ओक |
| १२) | छोटू किल्लीवाला उंदीर | अर्चना ओक |
| १३) | गंपू चिंपू | उमा खरे |
| १४) | मैत्रीचे मोल | उमा खरे |
| १५) | सिंड्रेला | उमा खरे |
| १६) | सुंठ बिस्कीटाचा माणूस | चारुता पुराणिक |
| १७) | निद्राराणी | विजया देशपांडे |
| १८) | जादूचं खीरपात्र | अरुंधती पंडीत |

**किंमत प्रत्येकी ३०रु.**
**पोस्टेज प्रत्येकी २० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**